म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ८५८

# एव्हरेस्टच्या कुशींत – 'मी'

तेनझिंग नोर्गे यांचें आत्मचरित्र

श्रीपाद कृष्ण केळकर

REFBK-0009850

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें

२८३८३
८५८ ३०।७।५८

सर्व शेरपा आणि जगांतील सारे गिर्यारोहक
यांच्या वतीनें


## ' चो मो लुं ग मा ' ला

अर्पण


# दोन शब्द

'TIGER OF THE SNOWS' या शेरपा श्री. तेनझिंग नोर्गे यांच्या मूळ इंग्रजी आत्मवृत्ताचा हा संक्षिप्त मराठी अनुवाद आहे. एक विख्यात अमेरिकन लेखक व कसलेले गिर्यारोहक मि. जेम्स रॅम्से उलमन यांच्या सहकार्यानें तेनझिंग यांनीं १९५४ सालीं मूळ पुस्तक लिहिलें. तेनझिंग यांना इंग्रजी चांगलें समजतें आणि पुष्कळसें बोलतांहि येतें. लिहिण्यांत मात्र अडचण वाटते. आत्मकथेचा जवळ जवळ सर्व भाग त्यांनीं स्वतःच निवेदन केला आहे.

—श्रीपाद केळकर




एव्हरेस्ट शिखरमाथ्याकडे जाणारा मार्ग : तेनझिंगनें स्वतः काढलेला नकाशा




एव्हरेस्टवरील शेवटच्या यशस्वी प्रयत्नाचा मार्ग

## अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| १ | " चोमोलुंगमा, मी तुझा ऋणी आहें " | १ |
| २ | जीवनयात्रेचा दीर्घ मार्ग | ३ |
| ३ | आमचा देश : आमचें घर | १० |
| ४ | नव्या जगाकडे धांव | १४ |
| ५ | " अजून कितीदां तरी तुला संधि मिळेल ! " | २२ |
| ६ | ' टायगर ' तेनझिंग | २७ |
| ७ | एव्हरेस्टपासून हिंदुकुशकडे | ३२ |
| ८ | येती : हिममानव, नव्हे हिमपशु | ३५ |
| ९ | आंग ल्हामू | ३९ |
| १० | पवित्र भूमीची यात्रा | ४६ |
| ११ | आम्ही शेरपा | ५१ |
| १२ | बंदर पूंछ आणि नंतर नंगा पर्वत | ५८ |
| १३ | आणखी दोन साहसें | ६४ |
| १४ | पुन्हा एव्हरेस्ट : पांचवा प्रयत्न | ७० |
| १५ | पुन्हा एव्हरेस्ट : सहावा धाडसी प्रयत्न | ८१ |
| १६ | आणि शेवटचा सातवा प्रयत्न | ८४ |
| १७ | बस्स, आतांच नाहीं तर कधींच नाहीं ! | ८७ |
| १८ | स्वप्नपूर्ति ! | ९१ |
| १९ | थोडें कडू व पुष्कळ गोड | ९८ |
| २० | नवीन जीवनक्रम | १०५ |

# एव्हरेस्टच्या कुशींत, मी

## " चोमोलुंगमा, मी तुझा ऋणी आहे "

आम्ही वर चढलों आणि तेथें पोंचलों. अखेर, आमचें स्वप्न साकार झालें....

अत्यानंदानें एकमेकांचे हात आम्हीं हातांत घेतले. पण एव्हरेस्टवर पोंचल्याचा आनंद एवढ्यानें कसा व्यक्त होणार ? मीं हात उंच करून हवेंत हलविले आणि नंतर हिलरीच्या भोंवतीं ते टाकले. एकमेकांच्या पाठीवर जोरानें थापा मारल्या; इतक्या जोरानें कीं कृत्रिम ऑक्सिजन घेत असूनहि आमचा श्वासोच्छ्वास बंद होण्याची वेळ आली.

सभोंवतालीं नजर टाकली. सकाळचे साडेअकरा वाजले होते. सूर्य तळपत होता. आकाश गाढ निळें होतें. इतकें निळें आकाश मीं पूर्वीं कधींच पाहिलें नसेल. तिबेटच्या दिशेनें मंद वारा येत होता. एव्हरेस्टच्या शिखरावरून नेहमीं वाहणारा बर्फकणयुक्त वारा त्या वेळीं विशेष नव्हता.

शिखराच्या खालीं पर्वताच्या एका बाजूस दूरवर दृष्टि टाकली. मीं पूर्वीं केलेल्या गिर्यारोहणाच्या वाटेवरील सर्व परिचयाच्या खुणा तेथें दिसत होत्या. नंतर दुसरीकडे वळून आम्ही ज्या मार्गानें शिखरावर आलों तो मार्ग पाहिला.

त्याच्या पलीकडे, बाजूला आणि सर्व अंगांना महान् हिमालयाचीं शिखरें पसरलीं होतीं. नेपाळ व तिबेट त्यांनीं व्यापून टाकलें होतें. ल्होत्से, नप्त्से, मकालू यांच्यासारखीं गगनचुंबी शिखरें शोधण्यासाठींसुद्धां आम्हाला खूप खालीं पाहावें लागलें, इतक्या उंचीवर आम्ही उभे होतों. जरा आणखी दूर पाहिलें तेव्हां तेथें दिसणाऱ्या जगांतील सर्वांत मोठ्या पर्वतराशी——कांचन-गंगासुद्धां——विस्तीर्ण आकाशाखालीं असलेलीं जणु टेकाडें वाटत होतीं.

असें दृश्य मीं पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें; आणि पुढेंहि कधीं दिसणार नाहीं. भयंकर आणि विस्मयजनक ! पण तेथें माझ्या मनाला भयाचा स्पर्शहि झाला नाहीं. कारण हिमालयावर व एव्हरेस्टवर माझें नितान्त प्रेम होतें. ज्या महान् क्षणाची मी जीवनभर वाट पाहात होतों तो आला. त्या वेळीं मला माझा हिमगिरि म्हणजे केवळ एक बर्फाच्छादित व निर्जीव खडक नाहीं वाटला; तर एक सजीव आणि प्रेममय वस्तु भासली. तें शिखर जणु एक कोंबडी आहे आणि बाकीचे लहानमोठे पर्वत म्हणजे तिच्या पंखाखालील पिलें आहेत असें वाटलें. मलाहि क्षणभर वाटलें कीं, आपणहि आपले पंख पसरावेत व आपल्या पिलांना पांखर घालावी....

आम्हीं ऑक्सिजनच्या नलिका काढून टाकल्या. जगांतील त्या सर्वांत उंच ठिकाणीं ऑक्सिजनशिवाय राहणें शक्य होतें. कारण आम्ही त्या वेळीं स्वस्थ उभे होतों; कांहीं श्रम करीत नव्हतों. चेहऱ्यावर घेतलेल्या बुरख्यावर बर्फ चिकटलें होतें. हातानें तें झाडून टाकलें; आणि पट्कन खाऊचा एक तुकडा तोंडांत टाकला आणि पुन्हा बुरखा पांघरला. पण शिखरावरून खालीं उतरण्यास निघेपर्यंत ऑक्सिजन मात्र घेतला नाहीं.

कपड्याखालीं झाकून आणलेला कॅमेरा हिलरीनें बाहेर काढला. माझ्या कुऱ्हाडीभोंवतीं गुंडाळलेलीं चार निशाणें मीं उलगडलीं आणि कुऱ्हाड उंच करून तीं फडकविलीं. हिलरीनें त्यांचीं तीन छायाचित्रें घेतलीं; आणि शिखरावरील एवढ्या प्रतिकूल प्रकाशांत त्यांपैकीं एक तरी सुदैवानें चांगलें आलें. प्रथम संयुक्त राष्ट्र संघटनेचें, नंतर ब्रिटिश आणि त्यानंतर भारतीय व नेपाळी अशा क्रमानें तीं निशाणें एकाखालीं एक बांधलीं होतीं.

मीं हिलरीला खुणविलें आणि सांगितलें कीं, आतां मी त्याचीं छायाचित्रें घेतों. परंतु कां कोणास ठाऊक तो तयार होईना. उलट त्यानें स्वतः माझीं आणि आवतींभोंवतीचीं आणखी अनेक चित्रें घेतलीं.

एव्हरेस्टवर पोंचल्यानंतर मला जी गोष्ट करावयाची होती त्याचें स्मरण झालें. खिशांतून बरोबर आणलेला खाऊचा पुडा मीं बाहेर काढला. माझ्या मुलीनें – निमानें – मुद्दाम दिलेली निळी-तांबडी पेन्सिलहि काढली. टणक बर्फाच्या जमिनींत लहानसा खड्डा खणला आणि त्यांत त्या दोन्ही वस्तु ठेवल्या. हिलरीनें मी काय करतों आहे तें पाहिलें आणि

त्यानें पांढरें लुकलुकीत डोळे असलेलें काळें कापडी मांजर मला तेथें ठेवण्यास दिलें. मीं तें त्या दोन वस्तूंजवळ ठेवलें.

"प्रेमाच्या व जवळच्या माणसाला आपण खाऊ देतों." माझ्या मनांत विचार आला, "मीं एव्हरस्टेला खाऊ दिला. कारण तें मला प्रिय आहे आणि आतां जवळचेंहि झालें आहे." मीं बर्फ टाकून त्या वस्तु झाकल्या आणि शांतपणें परमेश्वराची प्रार्थना केली. त्याचे अनंत आभार मानले. माझ्या स्वप्नींच्या त्या एव्हरेस्टवर मी पूर्वी सहादां आलों होतों. परंतु शेवटीं या सातव्या वेळीं देवाच्या कृपेनें मी त्याच्या शिखरावर पोंचलों. माझें स्वप्न खरें झालें. मीं मनांत म्हटलें,

"चोमोलुंगमा, मी तुझा ऋणी आहें."

आम्ही शेरपा एव्हरेस्टला चोमोलुंगमा म्हणतों.

जवळ जवळ पंधरा मिनिटें आम्ही चोमोलुंगमाच्या शिखरावर होतों.

* *

## जीवनयात्रेचा दीर्घ मार्ग : २ :

सहस्र योजनें ओलांडून आणि कित्येक वर्षे वाट पाहिल्यानंतर मी तेथें पोंचलों होतों. मी मोठा भाग्यवान् आहें. उरीं चितारलेला मनोरथ सत्यसृष्टींत उतरला होता. असें भाग्य सहसा माणसाला लाभत नाहीं. एव्हरेस्टवर चढून जाणें ही माझी जन्माची मनीषा होती. सात वेळां मीं एव्हरेस्टवर चढण्याचा प्रयत्न केला; परत आलों आणि पुन:पुन्हा गेलों. तेथें जातांना मनांत गर्वाची किंवा स्वसामर्थ्याचें प्रदर्शन करण्याची भावना नव्हती; कोणा शत्रूशीं लढाई द्यावी तशी वृत्ति नव्हती. प्रेममय हृदयानें ही धडपड चालली होती. मातेच्या मांडीवर चढण्याचा लेकराचा तो प्रयत्न होता.

शेवटीं मला यश आलें. मी ऋणी आहें. आमच्या शेरपा भाषेंत म्हणतात, "थुजी चे" — मी ऋणी आहें. म्हणून माझें हें आत्मवृत्त मीं 'चोमोलुंगमाला' अर्पण केलें आहे. त्याच्याशिवाय कोणाला मी तें अर्पण करणार? त्यानें मला सर्व कांहीं दिलें आहे.

परंतु अद्याप अनेक गोष्टी मला शिकायच्या आहेत असें वाटतें. जगाचें मला जसजसें अधिक ज्ञान होत आहे तशी माझ्या या उणिवेची मला अधिकच जाणीव होते. मी निरक्षर आहें. मला खूप शिकावेसें वाटतें. पण आतां माझ्या वयाला चाळीस वर्षें झालीं आहेत. म्हणून तें कसें जमणार? माझ्या दोन मुलींना मात्र मी शिकवितों आहें. त्या एका चांगल्या शाळेंत शिकतात. आधुनिक जगाचें त्यांना चांगलें ज्ञान मिळेल.

" निदान मला माझी सही तरी करतां येते " मी मनाशीं समजूत करून घेतों आणि म्हणतों, " आपणाला सर्वच गोष्टी कशा मिळतील? " पुष्कळशा लोकांनीं सबंध आयुष्यांत जेवढीं अक्षरें लिहिलीं नसतील तेवढीं अक्षरें एव्हरेस्टवर जाऊन आल्यानंतर माझी सही अनेक वेळां करून मीं लिहिलीं आहेत.

तुम्हाला आश्चर्य वाटेल; पण माझ्याजवळ अनेक पुस्तकें आहेत. लहानपणीं एकाहि पुस्तकाचें मीं तोंड पाहिलें नव्हतें. कदाचित् आमच्या धर्माच्या मठांतील धर्मग्रंथ पाहिले असतील तेवढेच. पण जसजसा मोठा झालों आणि गिर्यारोहणासाठीं जाऊं लागलों तसतशी पुस्तकांची आवड निर्माण झाली. ज्यांच्या बरोबर मीं गिर्यारोहणांत भाग घेतला व प्रवास केला ते मला अनेक पुस्तकें भेट म्हणून पाठवीत. तीं पुस्तकें मला वाचतां येत नसत. पण त्यांत काय लिहिलें असेल तें मला अंदाजानें कळे. त्याचें मला खूप महत्त्व वाटे. आणि आतां तर मीं स्वतःच हें पुस्तक लिहिलें आहे. मला त्याचें फार वाटतें. माणूस कसा होता व त्यानें जीवनांत काय काय केलें याचें वृत्त म्हणजे आत्मकथा होय. माझी ही आत्मकथा आहे. यांत मी आहें तसा दिसेन.

कांहीं गोष्टींचा प्रथम थोडा खुलासा करतों. माझी मायबोली शेरपा भाषा आहे. पण तिला लिपी नाहीं. म्हणून या भाषेंत लिखाण नाहीं. त्याचप्रमाणें माझ्या जन्मगांवीं आम्ही तिबेटी पंचांगाप्रमाणें कालगणना करीत होतों. त्यामुळें माझ्या प्रारंभीच्या जीवनांतील कांहीं घटनांसंबंधीं व तारखांविषयीं थोडी अनिश्चितता आहे.

माझ्या नांवांतहि अनेकदां बदल आणि त्यामुळें घोटाळाहि झाला आहे. माझें मूळ नांव तेनझिंग नाहीं. पाश्चिमात्य भाषेंत माझ्या नांवाचें स्पेलिंग

कधीं ( Tenzing ) तर कधीं ( Tensing ) करतात. कधीं कधीं तर शेवटची ' g ' हि गाळतात. आडनांवें तर मला अनेक मिळालीं आहेत ' खुमजुंग ' ( म्हणजे माझ्या मायभूमींतील एका खेड्याचें नांव ), ' भोतिया ' ( म्हणजे तिबेटी ) आणि ' नॉर्के ' ' किंवा ' नोर्के ', ' नॉग्यां ' किंवा ' नोर्गे '. या शेवटच्या आडनांवाचा अर्थ ' धनवान् ' किंवा ' भाग्यवान् ' असा आहे. मला अनेकदां त्याचें हसूं येतें.

माझ्या घराण्याचें खरें नांव आहे ' घांगला. '. शेरपा भाषेंत याचा अर्थ आहे " बर्फमय घाट ". परंतु आम्ही शेरपा लोक बहुधा आडनांवें लावत नाहीं. माझ्या या आडनांवाचा उपयोग मीं दार्जिलिंगमधील माझ्या घराला देण्यांत आतां केला आहे. आमच्या जमातींत पंडित म्हणून ओळखले जाणारे जे लामा आहेत त्यांनीं ' तेनझिंग नोर्गे ' अशीं माझ्या नांवाचीं अक्षरें व उच्चार करणें सर्वांत बरोबर आहे असें आतां सांगितलें आहे, म्हणून मी आतां असाच त्याचा वापर करीत असतों. व्यावहारिक सोईसाठीं आणि माझ्या जमातीचा मला अभिमान वाटतो म्हणून मी माझ्या नांवापुढें ' शेरपा ' लावतों. परंतु माझे मित्र व घरचे लोक मला ' तेनझिंग ' म्हणूनच ओळखतात. याच नांवानें मला पुढेंहि ओळखलें जावें अशी माझी इच्छा आहे.

जितकीं माणसें तितक्या भाषा जणु असतात. भारतांत तर हें विशेष आहे. म्हणून तेथील अनेकभाषी लोकांसाठीं एक समान भाषा शोधणें हा एक मोठा प्रश्न भारतांत होऊन बसला आहे. आज अशी स्थिति आहे कीं, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं आपण गेलों कीं, तेथें भाषा बदललेली दिसते. त्यामुळें माझ्यासारखा निरक्षर परंतु भटक्या माणूससुद्धां आज अनेक भाषा जाणू शकतों. माझी मातृभाषा शेरपा ही तिबेटी भाषेची बोली आहे. लहानपणापासून मला तिबेटी भाषाहि समजते. दुसरी माझ्या अधिक परिचयाची भाषा म्हणजे नेपाळी. कारण सोलोखुंबू या नेपाळमधील गांवीं माझा जन्म झाला आणि अनेक वर्षें मी तेथें राहिलों आहें. अव्वल प्रतीचें हिंदी मी शिकलेलों नाहीं. पण मला कामचलाऊ हिंदुस्तानी येतें. कारण त्या भाषेंत उर्दू व हिंदीचें मिश्रण आहे व ती नेपाळी भाषेस जवळची आहे. मला इतरहि अनेक भाषा समजतात. गढवाली, पंजाबी,

सिक्किमी, याल्मो ( नेपाळी ), पुश्तु, चित्रळी आणि थोड्याशा दक्षिण भारतांतील भाषा.

ब्रिटिशांच्या बरोबर अनेकदां मीं पर्वतारोहणाच्या मोहिमेंत भाग घेतला आहे आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिशांशीं माझा बराच संबंध आला आहे. त्यामुळें मला इंग्रजी भाषा बऱ्यापैकीं येते. या पुस्तकांतील मजकूर दुभाष्याच्या मदतीशिवाय मींच इंग्रजींत सांगितला आहे. इतर अनेक पाश्चात्य राष्ट्रीकांबरोबर मीं पुष्कळ प्रवास केला असल्यानें त्यांच्या भाषांचें—फ्रेंच, जर्मन, इटालिअन यांचें—मला थोडेंसें ज्ञान झालें आहे. बरें झालें मी पोलिश आणि जपानी लोकांबरोबर हिंडलों नाहीं आहे तें. नाहींतर त्या भाषाहि मला आल्या असत्या आणि मला कदाचित् एव्हांना थोडें वेड लागण्याची पाळी आली असती.

मीं खूप प्रवास केला आहे. हिंडावें, फिरावें, पाहावें आणि शिकावें हा माझा छंदच आहे. माझ्या रक्तांतच तें आहे. सोलोखुंबूंत राहात होतों तेव्हां लहानपणीं मी घरांतून दूर काटमांडूला, नेपाळच्या राजधानीला पळालों होतों. नंतर एकदां दार्जिलिंगला गेलों होतों; आणि तेथून पुढील आयुष्यांत अनेकदां गिर्यारोहणाच्या निमित्तानें कित्येकदां सारा हिमालय फिरलों आहें. जवळच्या सिक्किमला अनेकदां जाऊन परत नेपाळला आलों आहे. पुष्कळदां गढवाल, पंजाब आणि काश्मीरपर्यंत भ्रमण केलें आहे; आणि त्याहिपुढें अफगाणिस्तान व रशियापर्यंत तिबेटमधील पर्वतांतून आणि ल्हासा आणि त्याहि पलीकडे भटकलों आहें. एव्हरेस्टवर जाऊन आल्यापासून तर मीं आणखीनच प्रवास केला. एकदां इंग्लंडला, दोनदां स्वित्झर्लंडला आणि थोडा वेळ रोमला गेलों होतों, परंतु बाकीचें युरप आणि अमेरिका मीं अजूनपर्यंत पाहिलेली नाहीं. भटकणें, अनुभवणें आणि शिकणें म्हणजेच जगणें होय. पण जग खूप विशाल आहे. एव्हरेस्टवरूनसुद्धां तें सारें दिसणार नाहीं.

मी फारसा आजारी पडत नाहीं आणि मला अपघातहि क्वचितच झाले आहेत. त्या बाबतींत मी विशेष दैववान् आहें. इतर शेरपांचें तसें नाहीं. पर्वतावर चढतांना त्यांच्यापैकीं अनेक मृत्युमुखीं पडले आहेत. पर्वतावर मी कधीं पडलों नाहीं किंवा बर्फामुळें माझे पाय कधीं सुजले नाहींत. कारण

पर्वतावर विश्रांतीच्या वेळींहि मी कधीं स्वस्थ बसत नाहीं. कांहींतरी काम करीत असतों. त्यामुळें माझ्या अंगांत उष्णता राहते. पर्वतावर चढल्यावर तुम्ही स्वस्थ बसलांत आणि तुम्हांला घामाच्या धारा येऊं लागल्या कीं, बर्फानें शरीर सुजलेंच म्हणून समजा. पर्वतावरून घसरत येणाऱ्या बर्फ-राशीखालीं मात्र मी तीन वेळां सांपडलों आहें. पण त्यामुळें मला फारशी दुखापत झाली नाहीं. माझ्या तुकडींतील एका सहयात्रीला वांचावितांना माझें एका बोटाचें हाड एकदां मोडलें होतें हाच काय तो गिर्यारोहणांत मला झालेला अपघात आहे.

कांहीं वेळां विनोदानें लोक मला म्हणतात कीं, तुला दोनऐवजीं तीन फुफ्फुसें असलीं पाहिजेत. कारण कितीहि उंचीवर चढलों तरी मला श्वासोच्छ्वास करतांना फारसा त्रास होत नाहीं. मला लोकांच्या या विनोदाची खूप मजा वाटते, पण त्यांचें म्हणणें खरें आहे. मी सहजपणें पर्वत चढतों. कारण मी डोंगरांत केवळ जन्मलेलों नाहीं तर डोंगरा-साठींच माझा जन्म आहे. उंच पर्वत हें माझें घर आहे. मी तेथलाच आहें. एव्हरेस्टच्या विजयानंतर हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं मीं दौरा केला. तेथील गर्दीनें व गर्मीनें माझा जीव अगदीं थकून गेला. उंच पर्वतावरहि सबंध आयुष्यांत मी इतका कधींच थकलों नसेन.

पर्वतांची माझ्यावर कृपा आहे. तेथें मी आनंदांत असतों. ज्यांच्या बरोबर अनेक वेळां पर्वतावर गेलों आणि झगडलों व पडलों, आशानिराशा अनुभवली, ते माझे सह-गिर्यारोहकहि चांगले होते. त्यांच्या सहवासांत मीं आनंदाचे अनेक क्षण घालविले आहेत. माझे अनेक सहयात्री शेरपा आहेत. त्यांच्याबद्दल तर मला विशेष अभिमान वाटतो. हिंदी, नेपाळी आणि इतर अनेक आशियाई मित्र व इंग्रज, फ्रेंच, जर्मन, स्विस, ऑस्ट्रियन, इटालियन, कॅनॅडियन आणि अमेरिकन यांच्याबरोबर मीं पर्वतांचा प्रवास केला आहे. त्यांची भेट झाली आणि त्यांची मैत्री लाभली हें माझें थोर भाग्य होय. एकमेकांसारखे असणारे लोकच मित्र होतात असें नाहीं. रेमंड लॅबर्टचेंच उदाहरण देतों. तो स्विस आणि त्याची भाषा फ्रेंच. आम्ही एकमेकांशीं मोडकेंतोडकें इंग्रजी बोलतों आणि बाकीचें काम खुणांनीं करतों. पण एकाच गांवच्या दोघांची असावी त्याप्रमाणें आमची दाट दोस्ती आहे.

आपण कोणीच पूर्ण नाहीं; कोणीच परमेश्वर नाहीं. गिर्यारोहणाच्या प्रयत्नांत आमच्यामध्यें कांहीं कटकटी व कुरबुरी होतात. १९५२ सालीं आम्ही एव्हरेस्टवर ब्रिटिश तुकडींत गेलों तेव्हांहि कांहीं कटकटी झाल्या. नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. परंतु त्याला अवास्तव महत्त्व देण्यांत येतें. स्वार्थी हेतूनें कांहींजणांनीं त्याचा मुद्दाम विपर्यास केला आहे. माझ्या या पुस्तकांत जशा घटना घडल्या तशाच मी सांगणार आहें. मला कोणाबद्दल ना राग ना कोणाविषयीं माझी तक्रार !

एव्हरेस्टवर मी आधीं पोंचलों कीं हिलरी अगोदर गेला आणि मी भारतीय आहें कीं तिबेटी आहें कीं नेपाळी आहें याबद्दल खूप वाद व चर्चा झाली. एका यार्डानें किंवा फुटानें का होईना पण हिलरीच्या आधीं मी एव्हरेस्टवर पोंचलों असें कित्येक आग्रहानें सांगूं लागले. कांहींच्या मतें मी भारतीय आहें तर कांहींना वाटतें मी नेपाळी आहें. पण भारतीय असलों काय, नेपाळी असलों काय किंवा तिबेटी असलों काय, एव्हरेस्ट विजयाशीं त्याचा काय संबंध आहे ? एव्हरेस्ट इतकें उत्तुंग आहे कीं असले वाद त्यापुढें क्षुद्र आहेत. त्या शिखरावर पोंचणें हें महत्त्वाचें आणि मोलाचें आहे. ब्रिटिश व आशियाई गिर्यारोहकांत झालेले मतभेद आम्हांला ज्या एका समान अनुबंधानें एकत्र जोडलें होतें त्यापुढें क्षुल्लक होते. एका समान ध्येयानें आणि त्यासंबंधींच्या निष्ठेनें आम्ही एकत्र बांधले गेलों होतों. जगांतील साऱ्या गिर्यारोहकांत हा अनुबंध असतो आणि त्यामुळेंच ते एकमेकांशीं बंधुप्रेमानें वागतात.

या प्रकरणांत उगीचच इतकें राजकारण घुसडलें गेलें; माझ्या राष्ट्रीयत्वासंबंधीं वाद माजविण्यांत आला. पर्वतावर चढून गेल्यावर तेथें कांहीं राजकारण नसतें. तेथें जीवन हें सत्य असतें आणि मृत्यु समीप असतो. तेथें माणूस हा फक्त माणूस असतो. बस्स. पण नंतर राजकारण सुरू होतें; कटु भावना निर्माण केल्या जातात. एव्हरेस्टहून मी खालीं आलों नाहीं तोंच माझ्या वांट्याला दुर्दैवानें या गोष्टी आल्या.

एव्हरेस्टवर आधीं कोण पोंचलें हें मी यथाक्रम सांगेनच. माझ्या राष्ट्रीयत्वाविषयीं मी एवढेंच सांगेन कीं मीं एक शेरपा आहें; गिरिनिवासी आहे; थोर हिमालयाचा आहे. मला कांहींजण नेपाळी समजतात तर कांहीं

भारतीय मानतात. माझ्या कुटुंबांतील कांहीं लोक नेपाळमध्यें राहतात. कारण माझा जन्म तेथें झाला. पण सध्यां मी माझ्या बायकोमुलींसह भारतांत—दार्जिलिंगला राहतों. मला भारतीय व नेपाळी सारखेच आहेत. मी शेरपा आहें, नेपाळी आहें आणि भारतीयहि आहें. आम्ही सर्व एकच असावें असें मला वाटतें. हिलरी आणि मी—भारतीय, नेपाळी आणि सर्व राष्ट्रांचे नागरिक असावयास पाहिजे.

माझा जीवनमार्ग लांब आहे. एव्हरेस्टच्या पायथ्यापासून शिखरापर्यंत. नेपाळमधील सोलोखुंबूच्या यॅक चारण्याच्या गवतमाळापासून पं. नेहरूंच्या दिल्लीमधील बंगल्यापर्यंत व इंग्लंडच्या राणीच्या बकिंगहॅम राजवाड्यापर्यंत माझ्या जीवनयात्रेचा मार्ग दीर्घ आहे. विलायती साहेबांचे बोजे पर्वतावर वाहून नेणारा हमाल मी प्रथम होतों. आतां कोटावर बक्षिस मिळालेल्या पदकांच्या माळा घालून विमानांतून हिंडतों आणि इन्कमटॅक्स भरतों. कांहीं वेळां या दीर्घ मार्गावरील प्रवासांत इतर कोणत्याहि प्रवासाप्रमाणें अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी एकंदरीनें हा प्रवास सुखकर झाला आहे. कारण हा प्रवास माझ्या आवडत्या पर्वतामधून मीं केला आहे.

माझ्या जीवनांत मी अनेक ठिकाणीं भटकलों असलों तरी शेवटीं माझ्या घरीं——पर्वताकडे मी परत आलों आहें. त्या दिवशीं, त्या मे २९ तारखेच्या सकाळीं हिलरीबरोबर मी एव्हरेस्टवर पोंचलों त्यावेळींहि मला याची तीव्रतेनें जाणीव झाली. बुद्धाच्या धर्मचक्राप्रमाणें माझें जीवन परत पूर्व ठिकाणीं पोंचलें. ‘ चोमोलुंगमा ’ पासून म्हणजे एव्हरेस्टपासून जीवनांतील माझ्या धडपडीस मीं प्रारंभ केला आणि पुन्हा तेथें येऊन पोंचलों. हेंच स्वप्न बालपणीं रानावनांतून यॅक चारीत असतांना मीं मनाशीं रेखाटलें होतें. इतक्या प्रदीर्घ काळानंतर आतां तें सत्यसृष्टींत अवतरलें आहे.

* *

आपण कोणीच पूर्ण नाहीं; कोणीच परमेश्वर नाहीं. गिर्यारोहणाच्या प्रयत्नांत आमच्यामध्यें कांहीं कटकटी व कुरबुरी होतात. १९५३ सालीं आम्ही एव्हरेस्टवर ब्रिटिश तुकडींत गेलों तेव्हांहि कांहीं कटकटी झाल्या. नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. परंतु त्याला अवास्तव महत्त्व देण्यांत येतें. स्वार्थी हेतूनें कांहींजणांनीं त्याचा मुद्दाम विपर्यास केला आहे. माझ्या या पुस्तकांत जशा घटना घडल्या तशाच मी सांगणार आहें. मला कोणाबद्दल ना राग ना कोणाविषयीं माझी तक्रार!

एव्हरेस्टवर मी आधीं पोंचलों कीं हिलरी अगोदर गेला आणि मी भारतीय आहें कीं तिबेटी आहें कीं नेपाळी आहें याबद्दल खूप वाद व चर्चा झाली. एका यार्डानें किंवा फुटानें का होईना पण हिलरीच्या आधीं मी एव्हरेस्टवर पोंचलों असें कित्येक आग्रहानें सांगूं लागले. कांहींच्या मतें मी भारतीय आहें तर कांहींना वाटतें मी नेपाळी आहें. पण भारतीय असलों काय, नेपाळी असलों काय किंवा तिबेटी असलों काय, एव्हरेस्ट विजयाशीं त्याचा काय संबंध आहे? एव्हरेस्ट इतकें उत्तुंग आहे कीं असले वाद त्यापुढें क्षुद्र आहेत. त्या शिखरावर पोंचणें हें महत्त्वाचें आणि मोलाचें आहे. ब्रिटिश व आशियाई गिर्यारोहकांत झालेले मतभेद आम्हांला ज्या एका समान अनुबंधानें एकत्र जोडलें होतें त्यापुढें क्षुल्लक होते. एका समान ध्येयानें आणि त्यासंबंधींच्या निष्ठेनें आम्ही एकत्र बांधले गेलों होतों. जगांतील साऱ्या गिर्यारोहकांत हा अनुबंध असतो आणि त्यामुळेंच ते एकमेकांशीं बंधुप्रेमानें वागतात.

या प्रकरणांत उगीचच इतकें राजकारण घुसडलें गेलें; माझ्या राष्ट्रीयत्वासंबंधीं वाद माजविण्यांत आला. पर्वतावर चढून गेल्यावर तेथें कांहीं राजकारण नसतें. तेथें जीवन हें सत्य असतें आणि मृत्यु समीप असतो. तेथें माणूस हा फक्त माणूस असतो. बस्स. पण नंतर राजकारण सुरू होतें; कटु भावना निर्माण केल्या जातात. एव्हरेस्टहून मी खालीं आलों नाहीं तोंच माझ्या वांट्याला दुर्दैवानें या गोष्टी आल्या.

एव्हरेस्टवर आधीं कोण पोंचलें हें मी यथाक्रम सांगेनच. माझ्या राष्ट्रीयत्वाविषयीं मी एवढेंच सांगेन कीं मीं एक शेरपा आहें; गिरिनिवासी आहे; थोर हिमालयाचा आहे. मला कांहींजण नेपाळी समजतात तर कांहीं

भारतीय मानतात. माझ्या कुटुंबांतील कांहीं लोक नेपाळमध्यें राहतात. कारण माझा जन्म तेथें झाला. पण सध्यां मी माझ्या बायकोमुलींसह भारतांत–दार्जिलिंगला राहतों. मला भारतीय व नेपाळी सारखेच आहेत. मी शेरपा आहें, नेपाळी आहें आणि भारतीयहि आहें. आम्ही सर्व एकच असावें असें मला वाटतें. हिलरी आणि मी–भारतीय, नेपाळी आणि सर्व राष्ट्राचे नागरिक असावयास पाहिजे.

माझा जीवनमार्ग लांब आहे. एव्हरेस्टच्या पायथ्यापासून शिखरापर्यंत. नेपाळमधील सोलोखुंबूच्या यॅक चारण्याच्या गवतसाळापासून पं. नेहरूंच्या दिल्लीमधील बंगल्यापर्यंत व इंग्लंडच्या राणीच्या बकिंगहॅम राजवाड्यापर्यंत माझ्या जीवनयात्रेचा मार्ग दीर्घ आहे. विलायती साहेबांचे बोजे पर्वतावर वाहून नेणारा हमाल मी प्रथम होतों. आतां कोटावर बक्षिस मिळालेल्या पदकांच्या माळा घालून विमानांतून हिंडतों आणि इन्कमटॅक्स भरतों. कांहीं वेळां या दीर्घ मार्गावरील प्रवासांत इतर कोणत्याहि प्रवासाप्रमाणें अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी एकंदरीनें हा प्रवास सुखकर झाला आहे. कारण हा प्रवास माझ्या आवडत्या पर्वतामधून मीं केला आहे.

माझ्या जीवनांत मी अनेक ठिकाणीं भटकलों असलों तरी शेवटीं माझ्या घरीं––पर्वताकडे मी परत आलों आहें. त्या दिवशीं, त्या मे २९ तारखेच्या सकाळीं हिलरीबरोबर मी एव्हरेस्टवर पोंचलों त्यावेळींहि मला याची तीव्रतेनें जाणीव झाली. बुद्धाच्या धर्मचक्राप्रमाणें माझें जीवन परत पूर्व ठिकाणीं पोंचलें. ‘ चोमोलुंगमा ’ पासून म्हणजे एव्हरेस्टपासून जीवनांतील माझ्या धडपडीस मीं प्रारंभ केला आणि पुन्हा तेथें येऊन पोंचलों. हेंच स्वप्न बालपणीं रानावनांतून यॅक चारीत असतांना मीं मनाशीं रेखाटलें होतें. इतक्या प्रदीर्घ काळानंतर आतां तें सत्यसृष्टींत अवतरलें आहे.

★ ★

आपण कोणीच पूर्ण नाहीं; कोणीच परमेश्वर नाहीं. गिर्यारोहणाच्या प्रयत्नांत आमच्यामध्यें कांहीं कटकटी व कुरबुरी होतात. १९५३ सालीं आम्ही एव्हरेस्टवर ब्रिटिश तुकडींत गेलों तेव्हांहि कांहीं कटकटी झाल्या. नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. परंतु त्याला अवास्तव महत्त्व देण्यांत येतें. स्वार्थी हेतूनें कांहींजणांनीं त्याचा मुद्दाम विपर्यास केला आहे. माझ्या या पुस्तकांत जशा घटना घडल्या तशाच मी सांगणार आहें. मला कोणाबद्दल ना राग ना कोणाविषयीं माझी तक्रार !

एव्हरेस्टवर मी आधीं पोंचलों कीं हिलरी अगोदर गेला आणि मी भारतीय आहें कीं तिबेटी आहें कीं नेपाळी आहें याबद्दल खूप वाद व चर्चा झाली. एका यार्डानें किंवा फुटानें का होईना पण हिलरीच्या आधीं मी एव्हरेस्टवर पोंचलों असें कित्येक आग्रहानें सांगूं लागले. कांहींच्या मतें मी भारतीय आहें तर कांहींना वाटतें मी नेपाळी आहें. पण भारतीय असलों काय, नेपाळी असलों काय किंवा तिबेटी असलों काय, एव्हरेस्ट विजयाशीं त्याचा काय संबंध आहे ? एव्हरेस्ट इतकें उत्तुंग आहे कीं असले वाद त्यापुढें क्षुद्र आहेत. त्या शिखरावर पोंचणें हें महत्त्वाचें आणि मोलाचें आहे. ब्रिटिश व आशियाई गिर्यारोहकांत झालेले मतभेद आम्हांला ज्या एका समान अनुबंधानें एकत्र जोडलें होतें त्यापुढें क्षुल्लक होते. एका समान ध्येयानें आणि त्यासंबंधींच्या निष्ठेनें आम्ही एकत्र बांधले गेलों होतों. जगांतील साऱ्या गिर्यारोहकांत हा अनुबंध असतो आणि त्यामुळेंच ते एकमेकांशीं बंधुप्रेमानें वागतात.

या प्रकरणांत उगीचच इतकें राजकारण घुसडलें गेलें; माझ्या राष्ट्रीयत्वा-संबंधीं वाद माजविण्यांत आला. पर्वतावर चढून गेल्यावर तेथें कांहीं राजकारण नसतें. तेथें जीवन हें सत्य असतें आणि मृत्यु समीप असतो. तेथें माणूस हा फक्त माणूस असतो. बस्स. पण नंतर राजकारण सुरू होतें; कटु भावना निर्माण केल्या जातात. एव्हरेस्टहून मी खालीं आलों नाहीं तोंच माझ्या वांट्याला दुर्दैवानें या गोष्टी आल्या.

एव्हरेस्टवर आधीं कोण पोंचलें हें मी यथाक्रम सांगेनच. माझ्या राष्ट्रीयत्वाविषयीं मी एवढेंच सांगेन कीं मीं एक शेरपा आहें; गिरिनिवासी आहे; थोर हिमालयाचा आहे. मला कांहींजण नेपाळी समजतात तर कांहीं

भारतीय मानतात. माझ्या कुटुंबांतील कांहीं लोक नेपाळमध्यें राहतात. कारण माझा जन्म तेथें झाला. पण सध्यां मी माझ्या बायकोमुलींसह भारतांत–दार्जिलिंगला राहतों. मला भारतीय व नेपाळी सारखेच आहेत. मी शेरपा आहें, नेपाळी आहें आणि भारतीयहि आहें. आम्ही सर्व एकच असावें असें मला वाटतें. हिलरी आणि मी–भारतीय, नेपाळी आणि सर्व राष्ट्राचे नागरिक असावयास पाहिजे.

माझा जीवनमार्ग लांब आहे. एव्हरेस्टच्या पायथ्यापासून शिखरापर्यंत. नेपाळमधील सोलोखुंबूच्या यॅक चारण्याच्या गवतसाळापासून पं. नेहरूंच्या दिल्लीमधील बंगल्यापर्यंत व इंग्लंडच्या राणीच्या बकिंगहॅम राजवाड्यापर्यंत माझ्या जीवनयात्रेचा मार्ग दीर्घ आहे. विलायती साहेबांचे बोजे पर्वतावर वाहून नेणारा हमाल मी प्रथम होतों. आतां कोटावर बक्षिस मिळालेल्या पदकांच्या माळा घालून विमानांतून हिंडतों आणि इन्कमटॅक्स भरतों. कांहीं वेळां या दीर्घ मार्गावरील प्रवासांत इतर कोणत्याहि प्रवासाप्रमाणें अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी एकंदरीनें हा प्रवास सुखकर झाला आहे. कारण हा प्रवास माझ्या आवडत्या पर्वतामधून मीं केला आहे.

माझ्या जीवनांत मी अनेक ठिकाणीं भटकलों असलों तरी शेवटीं माझ्या घरीं––पर्वताकडे मी परत आलों आहें. त्या दिवशीं, त्या मे २९ तारखेच्या सकाळीं हिलरीबरोबर मी एव्हरेस्टवर पोंचलों त्यावेळींहि मला याची तीव्रतेनें जाणीव झाली. बुद्धाच्या धर्मचक्राप्रमाणें माझें जीवन परत पूर्व ठिकाणीं पोंचलें. ‘ चोमोलुंगमा ’ पासून म्हणजे एव्हरेस्टपासून जीवनांतील माझ्या धडपडीस मीं प्रारंभ केला आणि पुन्हा तेथें येऊन पोंचलों. हेंच स्वप्न बालपणीं रानावनांतून यॅक चारीत असतांना मीं मनाशीं रेखाटलें होतें. इतक्या प्रदीर्घ काळानंतर आतां तें सत्यसृष्टींत अवतरलें आहे.

* *

## आमचा देश, आमचें घर : ३ :

शेरपा या नांवाच्या अर्थासंबंधीं कांहीं गैरसमज आहेत. पर्वतावर हमाल किंवा वाटाडे म्हणून काम करणारे लोक ते शेरपा असें समजलें जातें. पण तें खरें नाहीं. शेरपा ही एक वन्य जमात आहे. या जमातीचे सुमारें एक लाख लोक असावेत. पूर्व हिमालयांत उंच पठारावर त्यांची वस्ती आहे.

शेरपाचा अर्थ पूर्वेकडील माणूस. आमची जमात मंगोलियन वंशाची असून फार वर्षांपूर्वीं आमचे पूर्वज तिबेटमधून येथें आले. पुष्कळ बाबतींत तिबेटी लोकांशीं आमचें साम्य आहे. आमची भाषा, राहणी, कपडे आणि खाणेंपिणें त्यांच्यासारखेंच आहे. तिबेटी लोकांप्रमाणें आम्ही बौद्ध धर्माचे आहोंत. तिबेटांत मात्र आतां शेरपांची वस्ती नाहीं.

हिमालयांतील अवघड खिंडी ओलांडून आमचे पूर्वज दक्षिणेस आले आणि ईशान्य नेपाळमधील सोलोखुंबूंत वस्ती करून राहिले. तीच आतां आमची मातृभूमि आहे. सोलो व खुंबू हे दोन निरनिराळे प्रदेश आहेत. सोलो सखल आहे. तेथील लोकांची राहणी नेपाळी लोकांसारखी आहे. आणि खुंबू डोंगरपठारावर आहे. तेथील लोक तिबेटी लोकांना जवळचे आहेत. मी आणि गिर्यारोहणांत भाग घेणारे बहुतेक शेरपा खुंबूंतील उत्तर जिल्ह्यांतील आहोंत.

सोलोखुंबूंतून अनेक लहान लहान उपनद्यांना पाणी देत देत दूधी कोसी ( दुधाची कोसी नदी ) एव्हरेस्टला वळसा घालत वाहात जाते. तिच्या दऱ्याखोऱ्यांतून दाक्षिणेकडे जाणारा मुख्य रस्ता आहे. त्या रस्त्यानें नेपाळची राजधानी काटमांडूला जायला जवळ जवळ दोन आठवडे लागतात. हें शहर बाहेरील जगापासून पर्वतराशींनीं बहुतेक तोडलें गेलें आहे. सोलोखुंबू तर त्याहून दूर आणि अलग व मागासलेलें आहे.

गेल्या कांहीं वर्षांत नेपाळचा बाह्य जगाशीं संबंध येऊं लागला असून नवीन नवीन सुधारणा तेथें पोंचत आहेत. पण सोलोखुंबू दूर खोलांत असल्यानें तेथें बाह्य जगांतील सुधारणा पोंचण्यास आणि मोटरनें तेथपर्यंत प्रवास सुलभ होण्यास कित्येक वर्षें लागतील.

२७३७३ ८५८ ३०।७।५८

आमच्या सोलोखुंबूची भूमि कठीण व पाषाणमय आहे. तथापि तेथें आम्ही शेती करतों, गवतहि उगवितों. गहूं, बार्ली, बटाटे यांचें पीकहि पिकवितों. बटाटे हें आमचें मुख्य पीक आणि खाद्यान्न आहे. शेळ्या, मेंढ्या आणि यॅक (एक प्रकारचें दुभतें जनावर) हें आमचें मुख्य पशुधन; विशेषतः यॅक. त्यांच्यापासून आम्हाला सर्व कांहीं मिळतें—–लोंकर, दूध, चामडे, जळणासाठीं शेण. या जनावरांचे तांडे घेऊन शेरपा लोक भटकत असतात.

सोलोखुंबूंत मोठीं शहरें नाहींत. इतकेंच काय मोठीं खेडेंगांवेंहि नाहींत. सर्वांत मोठें गांव 'नामचे बाजार'. एव्हरेस्टवर वारंवार होणाऱ्या स्वाऱ्यांमुळें तें प्रसिद्धीस आलें आहे. शेरपांचीं घरें दगडांनीं बांधलेलीं, दुमजली वर लाकडाचीं छपरें असलेलीं असतात; आणि दारें-खिडक्याहि पण लाकडाच्याच असतात. खिडक्यांना कोठें काचेचीं तावदानें सांपडणार नाहींत.

सोलोखुंबूंतील मकालू पर्वतावर असलेल्या त्साचू या गांवीं माझा जन्म झाला. एव्हरेस्टपासून एक दिवसाच्या अंतरावर हें खेडें आहे. त्साचू म्हणजे 'पवित्र झरा.' तें धार्मिक क्षेत्र आहे. पुष्कळ दंतकथा त्या गांवा-संबंधीं आमच्या जमातींत प्रचलित आहेत. तेथें बुद्धाच्या मस्तकाच्या आकाराची एक मोठी शिळा आहे. पवित्र माणसानें तिला स्पर्श केला आणि प्रार्थना केली कीं तिच्यांतून जलप्रवाह वाहूं लागतो आणि पापी माणसानें स्पर्श केला कीं ती शिळा कोरडी पडते अशी एक आख्यायिका आहे. अनेक औषधी वनस्पति या भागांत सांपडतात. तेथें अनेक तळीं आहेत. त्यांपैकीं एकाला 'चहाचें तळें' म्हणतात. आख्यायिका अशी आहे कीं, या तळ्याच्या कांठीं भगवान् बुद्ध ध्यानस्थ बसत असत. शीण आला कीं ते या तळ्याचें पाणी प्यावयाचे. अशा अनेक कथा आहेत. अशा ठिकाणीं माझा जन्म झाला. माझ्या आईवडिलांना व लामांना त्यांत मोठें भाग्य वाटे. मोठा झाल्यावर माझ्या आईवडिलांनीं एकदां असें सांगितलें कीं, मी तीन वर्षांचा होईपर्यंत माझी खूप काळजी घ्यावी असें लामांनीं त्यांना बजाविलें होतें. कारण मी जिवंत राहिलों तर पुढें मोठा माणूस होणार आहे असें त्यांनीं भविष्य वर्तविलें होतें.

माझ्या जन्माचें वर्ष व वेळ सांगणें कठीण आहे. कारण सोलोखुंबूंत आम्ही तिबेटी पंचांगाप्रमाणें कालगणना करतों. त्या पंचांगांत वर्षांचे आंकडे नसतात. वर्षांना प्राण्यांचीं नांवें फक्त असतात. घोड्याचें वर्ष, बैलाचें वर्ष, सापाचें वर्ष इत्यादि. अशीं बारा नांवें आहेत. तीं संपलीं कीं नवीन कालखंड सुरू होतो. अजूनपर्यंत मला माझें निश्चित वय सांगतां येत नसे. मला इतकेंच माहीत होतें कीं, माझा जन्म 'योआ' म्हणजे 'सशा'च्या वर्षीं झाला. परंतु पाश्चात्य पंचांग मला समजूं लागल्यानंतर मीं असें अनुमान काढलें कीं, हें सशाचें वर्ष १९१४ सालीं आलें होतें. माझ्या जन्मकाळची हवा व पिकें यावरून माझा जन्म मेच्या उत्तरार्धांत झाला असावा. हा काळ माझ्या सबंध जीवनांतील सर्वांत शुभ समय असला पाहिजे. याच काळांत मीं मोठमोठीं गिर्यारोहणें केलीं आहेत. एव्हरेस्टवर पोंचण्याचा सहावा प्रयत्न मि. लँबर्टबरोबर १९५२ सालीं याच महिन्याच्या २८ तारखेस केला. जवळजवळ आम्ही शिखरापर्यंत गेलों होतों. त्यानंतर बरोबर एक वर्ष एक दिवसानें शेवटचा आणि यशस्वी प्रयत्न हिलरीबरोबर मीं केला आणि एव्हरेस्टवर पोंचलों.

माझ्या आईचें नांव किंझॉन आणि वडिलांचें घांग ला मिंग्मा. आम्ही तेरा भावंडें होतों. सात भाऊ व सहा बहिणी. या तेरांपैकीं मी अकरावा. सोलोखुंबूंतील जीवन इतकें कष्टमय आणि मृत्यूच्या इतकें समीप असतें कीं, आम्हां तेरा भावंडांपैकीं आम्ही फक्त चार भावंडें जिवंत आहोंत. मी आणि माझ्या तीन बहिणी. माझ्या कुटुंबांत अगदीं अलीकडच्या काळापर्यंत मीच काय तो बाहेरच्या जगांत हिंडून आलों आहें. माझे वडील नेपाळ व तिबेटच्या पलीकडे गेलेले नाहींत. माझ्या तिन्ही बहिणी, त्यांचे पति आणि मुलें व माझी आई दार्जिलिंगला माझ्याकडे नुकते आले तेव्हांच त्यांनीं प्रथम आपलें गांव सोडून एवढा मोठा प्रवास केला.

माझें पाळण्यांतील नांव तेनझिंग नाहीं. तें आहे नामग्याल वांगडी. एकदां बालपणीं मला एका लामाकडे नेण्यांत आलें. त्यानें माझ्या वडिलांना सांगितलें कीं, हा मुलगा सोलोखुंबूंतील नुकत्याच मृत्यु पावलेल्या एका धनिकाचा अवतार आहे आणि म्हणून त्याचें नांव बदला. त्या लामानें तेनझिंग नोर्गे हें नांव सुचविलें. तेनझिंग म्हणजे धर्माधार आणि नोर्गे

म्हणजे श्रीमंत. त्या लामाचें तेंच नांव होतें आणि अनेक लामा तें नांव धारण करतात. या लामानें त्या वेळीं पुन्हा एकदां भविष्य वर्तविलें कीं, हा पोरगा फार मोठें नांव कमाविणार आहे.

पुढें मी थोडा मोठा झालों तेव्हां माझ्या वडिलांनीं मला लामा बनविण्याचें योजिलें. मला मठांत शिक्षणासाठीं पाठविण्याचें ठरलें. माझ्या डोक्याची चंपी करण्यांत आली आणि मठांतील नवागत शिष्याला घालावयास देतात तसा झगा माझ्या अंगावर चढविण्यांत आला. पण मला मठांत जाऊन कांहीं दिवस झाल्यावर एका लामानें माझ्या उघड्या मस्तकावर एक लाकडी फळी रागाच्या भरांत मारली म्हणून जो मी तेथून पळालों तो थेट घर गांठलें. आईवडिलांना परत मीं मठांत जाणार नाहीं असें साफ सांगितलें. ते कनवाळू होते म्हणून माझें त्यांनीं ऐकलें. नाहीं तर माझें काय झालें असतें देव जाणें. मी कदाचित् एखादा लामा झालों असतों. ही गोष्ट माझ्या मित्रांना मीं सांगितली तेव्हां ते म्हणाले, " ती फळी तुझ्या टाळक्यांत बसली म्हणूनच तुला हें पर्वताचें वेड लागलें असावें. "

मठांतून मी पळून आल्यामुळें माझ्या शिक्षणाचें मात्र नुकसान झालें. कारण आमच्या सोलोखुंबूंत मठांतील लामांनाच फक्त लिहितां वाचतां येतें. परंतु तेंहि तिबेटींत. कारण शेरपा भाषेला लिपी नाहीं. सोलोखुंबूंतील कोणत्याहि गांवीं शाळा नव्हती. त्यामुळें इतर पोरांप्रमाणेंच माझे दिवस खेळण्यांत आणि घरचीं कामें करण्यांत गेले. माझ्या वडिलांचा मला फार ळळा होता. मी त्यांचीं कामें आनंदानें करीत असें. माझ्या थोरल्या बहिणीवर लहमू किपावर माझें खूप प्रेम होतें. तीहि माझे पुष्कळ लाड करीत असे.

आमच्या गांवाजवळील हिमपर्वताच्या उत्तरेकडे दिसणारें तें उंच गगनचुंबी एव्हरेस्ट लहानपणीं अनेकदां मीं पाहिलें होतें. परंतु त्या वेळीं मी त्याला ' एव्हरेस्ट ' या नांवानें ओळखत नव्हतों. आम्ही त्याला ' चोमोलुंगमा ' म्हणत असूं. चोमोलुंगमा याचा अर्थ 'विश्वाची मातृदेवता' किंवा ' वायूची मातृदेवता '; परंतु माझ्या बालपणीं " ज्यावर पक्षीहि उडूं शकत नाहीं इतकें उंच शिखर " म्हणून या शिखराचा परिचय माझ्या आईनें मला करून दिला होता. मला हेंच वर्णन अधिक प्रिय वाटतें.

इतर मुलांप्रमाणें बालपणींचें माझें जग लहान होतें. आई-वडील, भाऊ-बहिणी, आमचें गांव व घर, शेतें आणि रानमाळ व यॅक जनावरें. बस्स. गांवाच्या उत्तरेस, पूर्व-पश्चिमेस असलेले मोठमोठे पर्वत आणि दक्षिणेस वाहात जाणारी दुधी कोसी हेंच काय तें आमचें भूगोलज्ञान. त्या पलीकडील जग मला माहीत नव्हतें. थोडा मोठा झाल्यावर तिबेट व त्याची राजधानी ल्हासा यांचीं नांवें वडिलांकडून व लामांकडून माहीत झालीं.

इतर शेरपा लोकांपेक्षां माझ्या आवडीनिवडी निराळ्या आहेत असें माझ्या मोठेपणीं लक्षांत आलें. लहानपणीं मी एकलकोंडा होतों. इतर मुलें जेव्हां पाठशिवणी किंवा इतर खेळ खेळत असत त्या वेळीं मी एकटाच कोठें तरी जाऊन स्वस्थ बसत असें आणि कोठेंतरी दूरदूरच्या ठिकाणीं आपण प्रवास करावा अशीं स्वप्नचित्रें मनाशीं रंगवीत असें. एखादवेळीं आपण एखाद्या सैन्याचे सेनापति आहोंत असें मनाशीं मी चित्र चितारी तर कधीं कधीं ल्हासांतील एखाद्या मोठ्या माणसानें आपणांस तिकडे बोलावून न्यावें म्हणून मनांत झुरत राही. कधीं कधीं वडिलांकडे ‘ घोडा द्या ’ म्हणून हट्ट धरीत असें. बालपणीं, नंतर कुमार वयांत आणि त्यानंतर प्रौढपणीं मला कोठेंतरी हिंडावें, जावें, पाहावें आणि समजून घ्यावें असा सतत ध्यास वाटत आला आहे. माझ्या जीवनांत पुढें जें घडलें त्याचें मूळ माझ्या या स्वभावांत आहे असें वाटतें.

* *

## नव्या जगाकडे धांव : ४ :

तिबेटची राजधानी असलेल्या ल्हासाला जाण्याची माझी फार दिवसांपासून मनीषा होती. दार्जिलिंग व इतर मोठ्या शहरांचींहि नांवें मीं ऐकिलीं होतीं. सोलोखुंबूतील शेरपा लोक कित्येक वर्षें दार्जिलिंग येथें जाऊन चहाच्या मळ्यांत मजूर म्हणून किंवा हमाल व रिक्षामजूर म्हणून काम करीत असत. त्यांच्याकडून मी दार्जिलिंगसंबंधीं ऐकत असें. त्यानंतर विलायती साहेबांच्या बरोबर निरनिराळ्या गिर्यारोहणांत ते मदतनीस किंवा हमाल म्हणून शेरपा

जाऊं लागले. त्या वेळेपासून चांगले गिर्यारोहक म्हणून आमच्या जमातीचा लौकिक आहे आणि आज मितीपर्यंत आम्हीं तो राखला आहे.

१९२१, १९२२ व १९२४ सालीं एव्हरेस्टवर स्वारी करण्याचे पहिले तीन प्रयत्न झाले. त्या सर्वांत शेरपा लोक सामील होते. ते परत आले कीं 'चिलिग्ना' विषयीं म्हणजे विलायती साहेबांविषयीं अनेक गोष्टी आम्हांस सांगत. आपण जवळ जवळ पर्वतावर आकाशापर्यंत उंच चढून गेल्याचेंहि ते अभिमानानें सांगत असत. हे शेरपा स्वारीहून परत आल्यावर येतांना पायांत मोठे उंच बूट व अंगांत चित्रविचित्र कपडे बरोबर घेऊन येत. मला त्या वस्तूंचें फारच आकर्षण वाटे; इतकें कीं मीं एकदां एका शेरपाकडून एक बूटजोडी विकत घेतली आणि ती पायांत घातली. पण ती इतकी बोजड व मोठी होती कीं, मला चालतां येईना. शेरपांच्या तोंडीं वरचेवर एव्हरेस्टचें नांव येत असे. मी प्रथमच त्या वेळीं 'एव्हरेस्ट' हें नांव ऐकलें. मी त्यांना विचारीत असें, "हें एव्हरेस्ट काय आहे?" "अरे एव्हरेस्ट म्हणजे आपले 'चोमोलुंगमा'," त्यांचें उत्तर मिळे, "चिलिंग्मा म्हणतात कीं, तो जगांतील सर्वांत उंच पर्वत आहे."

१९२२ च्या एव्हरेस्ट-स्वारींत सात शेरपा मृत्युमुखीं पडल्याची बातमी आली तेव्हां सर्व शेरपा जमातीवर दुःखाची छाया पसरली. पण १९२४ च्या स्वारींत पूर्वीपेक्षां अधिक शेरपा गेले होते. याच स्वारींत मि. मॅलरी आणि मि. आयर्व्हिन बळी पडले. ते शिखराच्या अगदीं नजीक पोंचले होते. शेरपांच्याकडून मीं त्यांचीं नांवें ऐकलीं. आयुष्यभर मला त्यांची आठवण राहील. त्यानंतर एकोणतीस वर्षांनीं मी व हिलरी एव्हरेस्टवर गेलों त्यावेळीं या दोन थोर गिर्यारोहकांचा ठाव-ठिकाणा लागतो आहे काय तें आम्हीं पाहिलें. पण व्यर्थ.

माझ्या कुटुंबांतील कोणीहि या स्वाऱ्यांत कधीं गेलें नव्हतें. मला जावयाची खूप इच्छा होत असे. पण लहान पोर म्हणून कोणी परवानगी देईना. या स्वाऱ्यांनंतर कांहीं वर्षे हिमालयांत स्वाऱ्या झाल्या नाहींत. सोलोखुंबूंतील जीवन नेहमींप्रमाणें स्तब्ध होतें. मी माझ्या घरांत कामाला लागलों. शेतींत राबूं लागलों.

माझ्या अगदीं बालपणींच्या काळांत आमचें कुटुंब फारच दरिद्री होतें.

परंतु माझ्या जन्मानंतर कुटुंबाला चांगले दिवस आले. म्हणून मला चांगल्या पायाचा म्हणतात. माझा जन्म झाल्यावर आमच्या गोठ्यांतील शंभर यॅक व्याल्या आणि त्यांना शंभर छानदार वासरें झालीं. आतां आमच्याजवळ सगळीं मिळून तीन-चारशें जनावरें झालीं. खाण्यापिण्याची कधीं मला ददात पडली नाहीं. कपडे, बूटहि पुरेसे मिळत. यॅकच्या केसांचे गरम कपडे आम्ही वापरीत असूं. कारण सोलोखुंबूंत थंडी कडाक्याची व खूप दिवस असते. त्यामुळें मला बूटहि घालावे लागत. पाश्चात्यांइतकीच मला त्यांची संवय झाली आहे.

यॅकच्या कळपांमागून हिमालयाच्या पायथ्याशीं स्वच्छंदपणें आणि एकट्यानें हिंडणें हा माझा लहानपणींचा आवडता छंद. खूप कडाक्याची थंडी आणि दाट बर्फ असल्यानें हिवाळ्यांत पर्वतावर गुरें घेऊन जातां येत नसे. परंतु इतर ऋतूंत मी वरपर्यंत जाऊन तेथील गवत यॅकना यथेच्छ चारी. नामचे बाजार १० हजार व थामे १२ हजार फूट उंचीवर आहे. मी तेथें जात असें. पण १८ हजार फूट उंचीपर्यंतहि मी अनेक वेळां गेलों आहें. म्हणजे उंच हिमालयाच्या भिंतीपर्यंत पोंचलों आहें.

या प्रदेशांत ‘ येती ’ ( हिममानव ) राहतात असें म्हणतात. तो फार भयंकर असतो म्हणे. सोलोखुंबूंत त्याच्याविषयींच्या अनेक कथा लोकांच्या तोंडीं आहेत. त्यामुळें अगदीं बाळपणींहि मीं त्यासंबंधीं ऐकलें होतें. माझ्या जन्मापूर्वीं माझ्या वडिलांची एका हिममानवाशीं एकदां भेट झाली होती. मीं स्वतः कधीं अद्याप त्याला पाहिलेलें नाहीं. पण लहानपणीं पर्वतांतून हिंडत असतांना कांहीं वेळ कोणा तरी विचित्र पशूची विष्टा पडलेली मीं पाहिली आहे.

या हिममानवाची मला थोडीशी भीति वाटे. पण त्यापेक्षां त्याविषयीं कुतूहल अधिक होतें. असेंच कुतूहल मला आजूबाजूला उभ्या असलेल्या धीरगंभीर व उत्तुंग पर्वतांसंबंधीं वाटे. हे पर्वत आणि त्यावरील बर्फ याविषयींच्या भयंकर कथा सांगून लामा लोक आम्हाला भेडसावीत. त्या पर्वतांवर देव, दानव आणि ‘ येती ’पेक्षांहि उग्र प्राणी असून ते त्यांचे संरक्षण करीत असतात व जो कोणी या पर्वतांवर जाण्याचा प्रयत्न करील तो जिवंत येणेंच शक्य नाहीं अशी लामा भीति घालीत. परंतु मला त्याचें

कांहीं वाटत नसे. कारण ' चोमोलुंगमा 'च्या दुसऱ्या बाजूनें आमच्यापैकीं अनेक शेरपा हिमपर्वतावर गेल्याचें व त्यांपैकीं कित्येक जिवंत परत आल्याचें मीं ऐकलें होतें. म्हणून मला स्वतःलाच एकदां तेथें जाऊन पाहून यावयाची इच्छा होती. फार फार पूर्वीपासून माझी ती आकांक्षा होती. मकालू, ल्होत्से, नप्त्से, अमा डब्लाम, गौरीशंकर, चो ओय् हीं शिखरें आणि त्या सर्वांपेक्षां उंच चोमोलुंगमा या शिखरांचें मला नित्य दर्शन होत असे. ' जेथें पक्षीसुद्धां पोंचत नाहीं ' त्या शिखरावर पोंचण्याची माझी इच्छा होती. पण काय करणार !

जग किती मोठें आणि सोलोखुंबू किती छोटें होतें. म्हणून मला तें सोडून कोठें तरी जावें असें वाटे. मी तेरा वर्षांचा झालों तेव्हां मी एक दिवस घरांतून पळालों आणि काटमांडूला गेलों. आईवडिलांचा मी फार लाडका होतों. त्यांना वाईट वाटेल याची मला कल्पना होती. पण बाहेर पडण्यासाठीं मी इतका उतावीळ झालों होतों कीं, माझा कांहीं इलाज चालेना. मकालूच्या वाटेनें दोन आठवड्यांपेक्षां अधिक प्रवास करीत मी काटमांडूस पोंचलों. एका बौद्ध मठांत मी राहिलों.

दोन आठवडे काटमांडूंत होतों. शहरभर खूप हिंडलों. खूप गर्दी पाहिली. बाजार, प्रचंड इमारती, देवालयें आणि कित्येक गोष्टी पाहिल्या. मला हें सर्वच नवीन होतें. माणसें नवीन, सर्वच नवखें. त्यामुळें मला घराची ओढ लागली. सोलोखुंबूहून कांहीं प्रवासी आले होते. त्यांच्याबरोबर मी परत घरीं गेलों. आई-वडील माझ्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. मला पाहतांच त्यांनीं मला कडकडून मिठी मारली; आणि नंतर चांगला चोपहि दिला.

नंतरचीं पांच वर्षें मी घरींच होतों. परंतु मला वाटे कीं, एखादा शेतकरी होऊन राहण्यासाठीं किंवा ढोरें वळण्यासाठीं माझा जन्म नाहीं. म्हणून १९३२ सालीं मी पुन्हा एकदां घरांतून पळालों. दार्जिलिंगाला गेलों. मला वाईट वाटलें. कारण आई-वडिलांना सोडून जात होतों. विशेषतः माझ्या आईबद्दल मला अधिक वाटे. ती धार्मिक वृत्तीची, दयाळू आणि साधी माता होती. खरी आई, माझी ' अमा ला ' होती. तिच्या आशीर्वादानें आणि माझ्यासाठीं परमेश्वराजवळ तिनें भाकलेल्या करुणेनेंच मला जीवनांत

यश मिळवून दिलें आहे. खरें पाहिलें तर 'चोमोलुंगमा'पासून दूर मी चाललों होतों. परंतु माझी अशी श्रद्धा होती कीं, त्या शिखरराजाकडे परत येण्यासाठींच मी दार्जिलिंगला जात आहें. कारण अशी एक बातमी पसरली होती कीं, १९३३ मध्यें एव्हरेस्टवर आणखी एक स्वारी होणार आहे; आणि माझा तिच्यांत सामील होण्याचा निश्चय होता.

आम्ही बारा सवंगडी घरांतून पळालों. त्यांत मुलें, मुली दोन्ही होते. महिनाभर आधीं गुप्त बैठकी घेऊन पळून जाण्याची योजना आम्ही आखीत होतों; धान्यधुन्य आणि प्रवासाची सामग्री जमवीत होतों. मी फक्त एक ब्लँकेट बरोबर घेतलें होतें. माझ्याजवळ पैसे नव्हते. इतर कोणापाशींहि नव्हते. खरें म्हणजे पैसे मिळविण्यासाठीं आम्ही सर्वजण बाहेर पडलों होतों. बाहेरचें जग पाहण्याची तर इच्छा होतीच.

दावा थोंडुप हा या मित्रांत होता. तो नंतर एक नांवाजलेला शेरपा झाला. माझ्यापेक्षां तो वयानें मोठा होता, तो पूर्वीं कधीं दार्जिलिंगला गेला नव्हता. परंतु त्याला त्या शहराविषयीं खूप माहिती होती. एव्हरेस्टवर जाणाऱ्या तुकडीविषयीं तो आम्हाला खूप सांगे. त्या तुकडींतून आपणांस निश्चित जातां येईल असा त्याचा विश्वास होता त्यामुळें मी इतका उत्साहित झालों कीं, पक्ष्याच्या वेगानें दार्जिलिंगला जावें आणि त्या तुकडींत सामील व्हावें असें मला वाटे. पण जंगलें, दऱ्याखोऱ्या आणि नद्यांच्या त्या नेपाळी प्रदेशांतून जलद प्रवास कसा होणार ? या दीर्घ प्रवासांत प्रारंभीं आम्ही सर्व एकत्र होतों. पण भारताच्या हद्दीपाशीं माझी व इतरांची चुकामूक झाली. मी एकटाच राहिलों. माझ्याजवळ अन्नहि नव्हतें. परंतु मी नशिबवान् खरा.

एका जवळच्या गांवीं मी पोंचलों, तेव्हां सुदैवानें एका चांगल्या सधन गृहस्थाशीं माझी गांठ पडली. त्यानें मला घरीं नेलें आणि आश्रय दिला. त्याच्या घरांतील माणसें दयाळू होतीं. त्यांनीं मला नवे कपडे दिले, खाऊं घातलें. मी तेथें राहिलों आणि त्या गृहस्थाचें काम करूं लागलों. पण मी कष्टी होतों. कारण माझे सगळे सवंगडी मला सोडून गेले आणि मी एकटा एकटा झालों. अनेकदां दूर जंगलांत जाऊन झाडाखालीं बसून मी शोक करीत बसत असें. स्वप्न आणि सत्य यांत किती अंतर असतें याची मला प्रथम जाणीव त्या वेळीं झाली.

एक दिवस मीं त्या श्रीमंत गृहस्थाला माझी मनोव्यथा बोलून दाखविली. मला दार्जिलिंगला जावयाचें आहे असें सांगितलें आणि काय सांगावें ? त्यानें मला तेथें घेऊन जावयाचें कबूल केलें. त्याला दार्जिलिंगला धंद्याच्या कामासाठीं जावयाचें होतें. त्यानें मला बरोबर नेलें. आम्ही मोटरींतून गेलों. मीं त्या वेळीं आयुष्यांत प्रथमच मोटर पाहिली आणि तीमधून प्रवास केला. दार्जिलिंगला गेल्यावर मीं अनेक नव्या गोष्टी पाहिल्या. आगगाडी पाहिली. तेथें बरेच पाश्चात्य लोक विशेषतः इंग्रज लोक दिसले. पाश्चात्य साहेबाला—चिलिंग्साला प्रथमच त्या वेळीं मीं पाहिलें.

आलुबारी नांवाच्या दार्जिलिंगजवळील एका गांवीं त्या श्रीमंत गृहस्थानें आपल्या चुलतभावाकडे मला कामासाठीं ठेवलें. दार्जिलिंगला दूध विकायला घेऊन मला नेहमीं जावें लागे. त्यामुळें मी खुश होतों. कारण मला तेंच पाहिजे होतें. दार्जिलिंगपासून सुमारे पन्नास मैलांवर सिक्किमच्या खोऱ्या-पलीकडे हिमालयाच्या पूर्वेकडील रांगा आहेत. त्याच्या मधोमध तें उंच व शुभ्र कांचनगंगा शिखर चमकतें. हिमालयाच्या कुशींतून मी दूर या शहरांत आलों होतों. तथापि कांचनगंगा पाहिल्यावर आपण आपल्या प्रिय हिमगिरीपासून अगदींच दूर नाहीं असें वाटून मनाला दिलासा मिळत असे. दार्जिलिंग शहर मला अद्‌भुत वाटे. अरुंद पण गर्दीनें भरून वाहणारे रस्ते, देवळें आणि बाजार — मला हें सर्व नवलाईचें होतें. नवें दार्जिलिंग तर मला फारच आगळें आणि विचित्र वाटत असे. तेथें श्रीमंत भारतीय आणि इंग्रज राहात असत. मोठमोठीं स्टोअर्स आणि हॉटेल्स, सिनेमागृह व कोणा एका महाराजाचा भव्य प्रासाद आणि सरकारी बंगला यांच्याकडे मी पाहातच राही आणि मला माझ्या दूध घालण्याच्या कामाचें विस्मरण होई.

कांहीं दिवसांनीं एव्हरेस्टवरील स्वारीची तयारी करण्यासाठीं १९३३ च्या प्रथमार्धांत इंग्रज गिर्यारोहक दार्जिलिंगमध्यें दाखल झाले. साऱ्या गांवांत या तयारीनें धमाल उडवून दिली होती. त्या वातावरणानें मीहि भारून गेलों. मि. ह्यू रटलेज नांवाचा एक इंग्रज साहेब या स्वारीचा प्रमुख होता. कित्येक शेरपा त्याला भेटून स्वारीबरोबर आपणास घेऊन जाण्यासाठीं विनवीत होते. मी माझा उद्योग विसरून गेलों. आपणहि या स्वारींत सामील झालें पाहिजे, असा मनानें एकच ध्यास

घेतला. माझा मित्र दावा थोंडुप याला मीं मला साहेबाकडे घेऊन जावयास विनविलें. पण तो तयार होईना. त्याला स्वतःला स्वारींत नोकरीवर घेण्यांत आलें होतें. 'पण तूं अजून फार लहान आहेस' असें सांगून त्यानें व इतर शेरपांनीं माझ्यासाठीं कांहींहि प्रयत्न करण्याचें साफ नाकारलें. मला फार राग आला. मीं स्वतःच साहेबाला भेटावयाचें ठरविलें, परंतु स्वारींत सामील होण्यासाठीं लागणारी कांहींहि तयारी माझी नव्हती. सोलोखुंबूंतील इतर शेरपा ठेवीत असत तसे लांब केस मीं ठेवले होते. स्वारींत जाण्याच्या दृष्टीनें ते अयोग्य होते, म्हणून मीं ते कापून लहान केले. माझ्या अंगावर लांब खमीस होता. नेपाळी लोक तसा खमीस घालतात. त्यामुळें लोक मला शेरपा समजत नसत. नेपाळी समजत. आणि साहेब लोकांना तर शेरपा पाहिजे होते. शिवाय गिर्यारोहणाचा मला पूर्वीचा अनुभव नव्हता. त्यामुळें शेवटीं मला स्वारींत जागा मिळाली नाहीं आणि मी अगदीं निराश झालों.

ती इंग्रज गिर्यारोहकांची तुकडी रवाना झाली आणि मी पूर्वीप्रमाणें पुन्हा दूध विकण्याचें काम करूं लागलों.

माझ्याकडून दूध घेणाऱ्या गिऱ्हाइकांत एक तरुण स्त्री होती. तिचें नांव आंग लाहमू. ती शेरपाणी होती. दार्जिलिंगमधील एका घरांत आया म्हणून ती काम करी. माझी तिची ओळख झाली. नेपाळी भाषेंतून मी तिच्याशीं बोलत असे. त्यामुळें मी शेरपा आहें हें तिच्या कित्येक दिवस लक्षांत आलें नाहीं. ती दूध घ्यायला आली कीं आमची खूप बोलाचाली होत असे. 'तुझ्याकडून मी दूध घेईन पण तूं मला मापापेक्षां जास्त दूध दिलें पाहिजे' अशी तिची मागणी असे. मी तिला साफ नकार देई आणि ती मला 'मुलखाचा चिक्कू आहेस' असें म्हणून हिणवी. हें असें चाललें होतें. परंतु मी तें सर्व सांगत बसत नाहीं. कारण मला आतां त्या सर्व गोष्टी स्मरत नाहींत. पुढें कांहीं वर्षांनीं आंग लाहमूशीं माझा विवाह झाला. ती माझी दुसरी पत्नी होय.

सोलोखुंबू सोडून दार्जिलिंगमध्यें येऊन मला एक वर्ष होऊन गेलें होतें. तिकडून येणाऱ्या आमच्या गांवच्या लोकांकडून मला एक दिवस समजलें कीं, आईवडिलांनीं माझी पार आशा सोडली असून मी मरण पावलों

असलों पाहिजे अशी त्यांची खात्री झाली आहे. माझीं मरणोत्तर धार्मिक कर्मेंहि त्यांनीं केल्याचें मला कळलें. मी अत्यंत कष्टी झालों आणि दार्जिलिंग सोडून एक दिवस परत सोलोखुंबूस घरीं आलों; आणि कांहीं महिने घरांतील कामें करूं लागलों.

त्या वर्षीच्या उन्हाळ्यांत प्रथमच तिबेटाला जाण्याचा योग आला. सोलोखुंबूंत मीठ मिळत नाहीं. म्हणून तें विकत आणण्यासाठीं मी तिबेटमध्यें गेलों होतों. तेथें रोंगबुक मठ पाहण्याची मला संधि मिळाली. हा मठ फार मोठा आणि प्रसिद्ध आहे. हिमालयावर जाणारे ब्रिटिश गिर्यारोहक या मठाशेजारीं आपला मुक्काम टाकीत असत. परंतु त्या वर्षीं १९३४ मध्यें ब्रिटिश गिर्यारोहकांची हिमालयावर स्वारी झाली नाहीं. ती होणार असती तर मी तिच्यांत गेलों असतों आणि माझ्या आईला मिठासाठीं वाट पाहात बसावें लागलें असतें.

वर्षअखेरीं वडिलांनीं मला पुन्हा मीठ आणण्यासाठीं तिबेटला जायला सांगितलें. पण मीं त्यांचें ऐकलें नाहीं आणि दार्जिलिंगला परत निघून आलों, कारण घरीं ज्या प्रकारचें जीवन मला कंठावें लागत होतें त्यांत माझें मन रमणें शक्य नव्हतें.

१९३४ च्या वसंतऋतूंत नंगा पर्वतावर जर्मन गिर्यारोहकांची एक तुकडी गेली. त्यांत सामील झालेल्या शेरपांपैकीं सहाजण या स्वारींत बळी पडले. त्यामुळें दार्जिलिंगमधील शेरपा वस्तींतील कित्येक घरांत शोक पसरला होता. परंतु एक प्रकारची अभिमानाची भावनाहि शेरपांच्या मनांत वसत होती, कारण अभिमान वाटावा अशीच ती गोष्ट होती. या जर्मन तुकडींतील ग्याली नांवाचा जो एक शेरपा मृत्यु पावला त्यानें आपल्या तुकडीचा पुढारी मि. विली मर्क्ल याच्यासाठीं मरण पत्करलें असल्याचें कळलें. नंगा पर्वताच्या शिखरावर ते दोघे पोंचले तेव्हां वादळ झालें आणि त्यांत ते सांपडले. त्यांतून निसटून ते पर्वतावरून खालीं येऊं लागले. परंतु मि. विली मर्क्लला इतका थकवा आला होता कीं, तो एक पाऊलहि पुढें टाकूं शकत नव्हता. तो तेथेंच मरण पावला आणि त्याच्या बरोबर ग्यालीनेंहि मृत्यु पत्करला. आपल्या सहकाऱ्याला एकटे सोडून

जाण्याचें त्यानें नाकारलें. आपण त्याच्या शेरपा जमातीचे आहोंत या जाणिवेनें माझें हृदय अभिमानानें पुलकित झालें.

१९३५ च्या प्रथमार्धांत माझा प्रथम विवाह झाला. माझ्या पत्नीचें नांव होतें दावा फुती. फुती म्हणजे ' बहुप्रसव पत्नी. ' तें नांव पुढें सार्थ ठरलें. दावा फुतीचा जन्म सोलोखुंबूंतच झाला होता. तेथें मीं तिला कधीं कधीं पाहिलेंहि होतें. विवाहानंतर एका लहानशा खोलींत आम्ही संसार थाटला आणि सुखानें राहूं लागलों. परंतु त्यानंतर आम्ही फारच थोडा काळ एकत्र राहिलों. कारण कित्येक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर गिर्यारोहकाच्या माझ्या जीवनाला शेवटीं त्या वेळीं प्रारंभ होत होता.

* *

## "अजून कितीदां तरी तुला संधि मिळेल !" : ५ :

लहान कामानें प्रारंभ करून मग हळूहळू मोठ्या कामास हात घालावा असें म्हणतात. पण माझ्या गिर्यारोहणाच्या प्रयत्नांची सुरुवात अगदीं याच्या उलट झाली. मीं पहिला प्रयत्न एकदम एव्हरेस्टवर केला. १९३५ मध्यें गेलेल्या पहिल्या ब्रिटिश तुकडींत मी सामील झालों. एव्हरेस्टवर गेलेली ब्रिटिशांची ही पांचवी तुकडी होती.

१९२१ सालीं त्यांनीं पहिली स्वारी केली. पण एव्हरेस्ट चढून जाण्याचा त्या वेळीं त्यांचा हेतु नव्हता. तेथें जाण्याचे मार्ग त्यांना त्या वेळीं शोधून काढावयाचे होते. एव्हरेस्टच्या उत्तर दिशेनें तिबेटमधून जाणारा मार्ग याच वेळीं मिळाला. त्या वेळीं कोणाहि पाश्चात्य राष्ट्रांतील नागरिकांस नेपाळमध्यें प्रवेश मिळत नसे. त्यामुळें ब्रिटिशांना एव्हरेस्टकडे जाण्याचा तिबेटकडील मार्ग शोधून काढावा लागला.

१९२२ मध्यें एव्हरेस्ट चढून जाण्याचा पहिला खरा प्रयत्न झाला. कांहीं ब्रिटिशांनीं शेरपांच्या साहाय्यानें हा प्रयत्न केला. त्यांपैकीं कांहीं गिर्यारोहक त्यावेळीं २७ हजार फूट उंचीपर्यंत पोंचले होते. आतांपर्यंत कोणीहि मनुष्य तेथवर गेला नव्हता. परंतु तो प्रयत्न तेथेंच संपला आणि

त्यांत सात शेरपांचें बलिदान झालें. एव्हरेस्टवर झालेला हा सर्वांत मोठा अपघात होय.

१९२४ मध्यें पुन्हा कांहीं ब्रिटिश व शेरपा गिर्यारोहकांनीं एव्हरेस्टवर जाण्याचा प्रयत्न केला. याच प्रयत्नांत मि. मॅलरी व मि. अँड्र्यू आयर्व्हिन हे बेपत्ता झाले. या स्वारींत सामील झालेल्या ल्हक्पा छेडी, नॉर्बु यीशे आणि सेमच्चुंबी या तीन शेरपांनीं २६,८०० फूट उंचीपर्यंत सामान वाहून नेलें आणि तेथें त्यांनीं तळ उभारला. या तळावरूनच त्या तुकडींतील ब्रिटिश मि. नॉर्टन २८ हजार फुटापर्यंत पोंचले होते.

१९३३ सालीं एव्हरेस्टवर जाण्याचा जो चौथा प्रयत्न झाला त्यांत यापुढें विशेष प्रगति झाली नाहीं. या स्वारींतहि आठ शेरपा गेले होते. त्यांनीं याहि वेळीं पूर्वी इतक्याच उंचीवर सामान वाहून नेलें. या त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना इंग्रज साहेब ' टायगर ' म्हणून संबोधूं लागले. पुढें १९३८ सालीं टायगर ही एक शेरपांना मिळणारी अधिकृत पदवीच बनली आणि त्या नांवानें त्यांना पदकेंहि देण्यांत येऊं लागलीं.

१९३५ साल उगवलें आणि एव्हरेस्टवर जाण्याची पहिली संधि मला मिळाली. मि. एरिक शिप्टन या ब्रिटिश गिर्यारोहकाच्या नेतृत्वाखालीं त्या वर्षी तुकडी जाणार होती. या तुकडींत प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न मीं केला तेव्हां प्रथम मला अडचणी आल्या. गिर्यारोहणाचा पूर्वानुभव असल्याचें शिफारसपत्र मजजवळ नव्हतें. त्यामुळें प्रथम ज्यांना असा अनुभव होता त्यांनाच निवडण्यांत आलें. परंतु नंतर आणखी दोन शेरपांची गरज वाटली तेव्हां मोठ्या मुष्किलीनें माझी निवड झाली. मी त्या वेळीं फक्त वीस वर्षांचा होतों. मला खूप आनंद झाला. पण म्हाताऱ्या लोकांना मात्र या निवडीचा राग आला. कारण त्यांच्या मतें मी अगदीं नवशिक्या होतों. पण मला त्यांच्या रागाचें वाईट वाटलें नाहीं. त्यांनीं मला मारलें असतें तरी तें मीं आनंदानें सहन केलें असतें. या स्वारींत मजुरीच्या रूपानें मला पैसेहि चांगले मिळणार होते. पण चोमोलुंगमावर जाण्याची संधि मला मिळाली यांतच मला संतोष होता. एरिक शिप्टन मला पुढें १९५३ मध्यें भेटला तेव्हां त्याच्यामुळेंच मला ही संधि मिळाली असल्याचें मीं त्यास स्मरण करून दिलें.

एका उत्तुंग पर्वतावर, साध्यासुध्या नव्हे तर एव्हरेस्ट पर्वतावर चढून जाण्याची माझ्या जीवनांत मला प्रथमच संधि मिळाली असल्यानें माझें मन अतिशय उल्हसित झालें. त्या पर्वताच्या एका उंच ठिकाणीं असलेल्या बर्फाच्या डोंगरावर आम्ही पोंचलों तेव्हां आमच्या समोर एव्हरेस्टचें तें आकाशाला जणूं गवसणारें दोन नव्हे कदाचित् तीन मैल उंचीचें शिखर दिसूं लागलें. याच पर्वताच्या छायेखालीं लहानपणीं मी गुरें चारीत होतों आणि तेथेंच मी लहानाचा मोठा झालों. आपण पाहात आहोंत तें शिखर एव्हरेस्ट चोमोलुंगमा आहे यावर माझा क्षणभर विश्वास बसेना. पण नंतर मनांत विचार आला कीं, चोमोलुंगमाशिवाय दुसरें कोणतें शिखर एवढें भव्य आणि आकाशस्पर्शी असूं शकेल !

पण त्या पर्वतावर चढणें महाकठीण होतें. पाठीवर नव्वद नव्वद पौंडांचें सामानाचें ओझें घेऊन आम्ही दिवसामागून दिवस आणि आठवड्यापाठीमागून आठवडे त्या पर्वतावरील चढउतारावर कधीं वर तर कधीं खालीं चढत होतों. मला ओझें वाहण्याचा शीण होत नसे; कारण मला त्या कामाची इतर शेरपांप्रमाणें संवय होती. शिवाय आयुष्यांतील एक महान् स्वप्न सत्यसृष्टीच्या टप्प्यांत येत असल्याचें समाधान मनांत वावरत होतें.

गिर्यारोहणाचा माझा तो पहिलाच अनुभव होता. त्यामुळें पुष्कळशा गोष्टी नवीन होत्या. आम्हांला खास कपडे, बूट आणि गॉगल्स देण्यांत आले होते. हवाबंद डब्यांत ठेवलेलें विस्मयकारक अन्न आम्हांला मिळत असे. झोपण्याच्या रबरी पिशव्या, प्रेशर स्टोव्ह ह्या वस्तु मी प्रथमच पाहात होतों. बर्फाच्या राशी आणि त्याचे मोठमोठे डोंगर मी कांहीं प्रथमच पाहात होतों असें नाहीं. पण त्यावर चढून जाण्याचें शिक्षण मला प्रथमच मिळत होतें. वर चढण्यासाठीं बर्फाच्या कपारींत दोर ठोकणें, पाय रोवण्यासाठीं बर्फाच्या कठीण भिंतींत कुऱ्हाडीनें पायऱ्या खोदणें, वस्तीसाठीं तळ तयार करणें आणि ते मोडणें, लौकर जाणारे परंतु सुरक्षित मार्ग शोधून काढणें इत्यादि गिर्यारोहणकलेंतील गोष्टी मी या स्वारींत शिकलों. मी खूप काम करीत असें आणि माझा उपयोगहि साहेबमंडळींना पुष्कळ होत असे. त्यामुळें ते माझ्यावर खुष होते. २२ हजार फूट उंचीपर्यंत मीं सामानाचें ओझें या स्वारींत वाहून नेलें आहे.

इतर शेरपा आपली मजुरी मिळाली कीं संतुष्ट होत. आपण अधिक वर गेलें पाहिजे यासाठीं त्यांची धडपड दिसून येत नसे. पण मला त्यानें समाधान मिळत नसे. मला अधिक उंच चढून जावयाची इच्छा होती. एव्हरेस्टवर गेल्यावर जास्तींत जास्त उंच कसा पोंचेन यासाठीं माझा प्रयत्न असे. माझ्या मनांतील तें स्वप्न होतें; ती माझ्या जीवनाची गरज होती; माझें रक्त त्या ईर्षेनेंच बनलेलें होतें. परंतु या स्वारींत तें शक्य झालें नाहीं. आम्ही मधूनच मागें फिरलों. मीं माझ्या मनाची समजूत करून घेतली, " कांहीं हरकत नाहीं. तूं आत्ता कुठें वीस वर्षांचा आहेस. अजून कितीदां तरी तुला संधि मिळेल आणि लौकरच तूं हिमगिरींतील खराखुरा व्याघ्र होशील. "

दार्जिलिंगला मी परत आलों आणि नंतरचे कांहीं दिवस घरीं घालविले. मला एक मुलगा झाला. अतिशय सुस्वरूप होता तो. परंतु त्याच्या अवघ्या चौथ्या वर्षी तो मरण पावला. त्याचा मृत्यु हा माझ्या जीवनांतील दुःखाचा पहिला तडाखा होय.

१९३५ च्या उत्तरार्धांत २४,००० फूट उंचीच्या काब्रू पर्वतावरील स्वारींत मी सामील झालों. कांचनगंगा पर्वताजवळ हा पर्वत आहे. दार्जिलिंगमधून तो स्पष्ट दिसतो. मि. कुक, त्याचा एक जर्मन मित्र आणि तीन शेरपा या तुकडींत होते. मी वयानें सर्वांत लहान. त्यामुळें अवजड ओझें वर वाहून नेण्याचें काम मीच करीत असें. मी पर्वतावर शेवटपर्यंत गेलों नाहीं. कारण मला पर्वतशिखराच्या पायथ्यावरील मुक्कामापर्यंत सामान वाहण्यासाठीं मजुरीनें घेण्यांत आलें होतें.

मी हिंवाळ्यांत घरीं परतलों आणि पुन्हा घरकाम करूं लागलों. पत्नीच्या व मुलाबाळांच्या सान्निध्यांत मी होतों. त्यामुळें तीं आनंदी होतीं. पण मी मात्र अस्वस्थ होतों. कारण पर्वतशिखरावर चढण्याचा पहिला अनुभव मी घेऊन आलों तेव्हांपासून तर माझें त्याविषयींचें आकर्षण अधिकच वाढलें. १९३६ च्या वसंतांत पुन्हा हालचालींना प्रारंभ झाला आणि त्या वर्षी गिर्यारोहकांच्या दोन तुकड्यांत मी दाखल झालों.

यांपैकीं पहिली तुकडी एव्हरेस्टवर जाणार होती. कांहीं अडचण न यतां मी तिच्यांत सामील होऊं शकलों. कारण गेल्या स्वारींतील सर्वांना

तींत घेतलें होतें. मि. एरिक शिप्टन याहि वेळीं होता. इतर ब्रिटिशहि होते. मात्र नेतृत्व यावेळीं मि. ह्यू रटलेजकडे होतें. मोठा छान आणि सहृदय माणूस ! त्यामुळें सर्व शेरपांना तो हवाहवासा वाटे. या स्वारींत अनेक इंग्रज साहेब, साठ शेरपा आणि कित्येक ओझे वाहणारे मजूर होते. ती फार मोठी तुकडी होती. जणू युद्धावर जाणारें सैन्यपथकच !

यावेळीं आम्हीं तिबेट मार्गावरील कालिपाँगहून एव्हरेस्टवर जाण्यास प्रारंभ केला. दार्जिलिंगहून हें ठिकाण तीस मैलांवर आहे. तेथपर्यंत तुकडीची सर्व साधनसामुग्री यांत्रिक दोरावरून पोंचविण्यांत आली.

या स्वारींत डॉ. हम्फ्रीज या साहेबांच्या मदतनिसाचें काम मला देण्यांत आलें. त्यामुळें आजार, जखमा व त्यावरील प्रथमोपचार याचें मला पुष्कळच ज्ञान झालें आणि त्याचा मला पुढें खूप उपयोग झाला.

एव्हरेस्टवरील या स्वारीबद्दल ब्रिटिश लोक खूप आशावादी होते. कारण स्वारीवर गेलेली ती तुकडी आधुनिक साधनांनीं सुसज्ज आणि सुसंघटित होती. पण दुर्दैवानें या स्वारीच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत पर्वतावरील हवा अतिशय वादळी आणि पावसाळी होती. आम्ही एका मुक्कामावरून दुसऱ्या, नंतर तिसऱ्यापर्यंत गेलों; बर्फाच्या भिंतीपर्यंत पोंचलों. वर चढूं लागलों तसतसें आमच्या छातीपर्यंत पोंचणारे बर्फाचे लोंढे अंगावर येऊन धडकूं लागले. हें फार भयंकर होतें. तसेंच पुढें जावें तर बर्फाच्या प्रचंड वाहत्या डोंगरांचें संकट उभें होतें. १९२२ सालीं या ठिकाणींच झालेल्या भयावह अपघाताचें स्मरण त्या वेळीं आम्हांस झालें. तरीसुद्धां उत्तरेकडील सखल पर्वतराजीपर्यंत आमच्यापैकीं कांहींजण पोंचले. त्यांत मी होतों. परंतु तेथें भयंकर हिमवर्षाव होऊं लागला. हिमवर्षाव थांबला आणि जोराचें वादळ सुरू झालें आणि त्याच्या तडाख्यानें आम्ही पर्वतावरून जवळ जवळ फेकले गेलों. आम्ही सरपटत खालीं परत आलों. कांहीं साहेब पुन्हा वर जाण्याचा प्रयत्न करण्यास तयार होते. पण तुकडीचा पुढारी रटलेजनें त्यांना मना केली आणि सर्वजण परत फिरलों. गेल्या वर्षीं जेथपर्यंत आम्ही जाऊं शकलों होतों त्यापेक्षां अधिक उंच या वर्षीं जाऊं शकलों नाहीं.

या स्वारींत कोणी पर्वतावर दगावला नाहीं. परंतु परत फिरतांना वाटेंत

एक शेरपा अपघातांत मेला. वाटेंत एक विलक्षण वेगानें वाहणारी नदी होती. दोन्ही बाजूंस खांब टाकून त्यावर बांधलेल्या जाड व मजबूत दोरावरून घसरत्या चक्राच्या साहाय्यानें ती नदी ओलांडतात. एका शेरपानें दोराला नुसतेच लोंबकळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु नदीच्या प्रवाहाच्या ऐन मध्यावरच त्याचा तोल सुटला आणि तो नदींत पडला. दोन साहेबांनीं नदींत उड्या टाकून त्याला वांचविण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ !

आम्ही निराश होऊनच सर्वजण परतलों. आमच्या तुकडीचा पुढारी मि. रटलेज याच्याबद्दल मला विशेष वाईट वाटलें. कारण तो वृद्ध झाला होता. त्यामुळें त्याचा एव्हरेस्टवर जाण्याचा हा शेवटचा आणि अयशस्वी प्रयत्न ठरला. पुढें १९५३ सालीं मला तो लंडनला माझ्या स्वागतप्रसंगीं भेटला. त्यानें प्रेमानें माझा हात हातीं घेतला आणि म्हटलें, " बेटा, तूं तर कमाल केलीस. मी आतां वृद्ध झालों आहें. मीं एव्हरेस्टवर पोंचण्याचा प्रयत्न केला; पण यश आलें नाहीं. तथापि त्याचा मला खेद नाहीं. कारण तूं तरी विजयी झालास. "

* *

## ' टायगर ' तेनझिंग : ६ :

१९३८ मध्यें मि. शिप्टन मध्य हिमालयांतील गढवाल पर्वतावर जाण्यासाठीं हिंदुस्थानांत आला. त्यानें मला आपल्याबरोबर घेतलें. गढवालजवळील राणीखेत येथें मि. ऑसमॅस्टन नांवाचा एक ब्रिटिश गिर्यारोहक आम्हांस भेटला. तो नंदादेवी या उंच शिखराची पाहणी करण्यासाठीं आला होता. शिप्टननें मला त्याच्याबरोबर पाठवावयाचें ठरविलें. मीं त्यास मान्यता दिली. आम्ही आमच्या कामास प्रारंभ केला. परंतु थोड्याच दिवसांनीं मी एकदम भयंकर आजारी पडलों. खूप ताप आला. नंतर तो उतरला. परंतु फारच अशक्तपणा आला होता. त्यामुळें मी पर्वतावर चढूं शकत नव्हतों. मी कांहींच काम करूं शकलों नाहीं. इतरांनीं पाहणीचें आणि नकाशे वगैरे तयार करण्याचें काम पुरें केलें आणि आम्ही

राणीखेताला परतलों. तोंपर्यंत माझी प्रकृति सुधारली होती. परंतु यावेळीं आपण कांहींच करूं शकलों नाहीं, म्हणून मन फार कष्टी झालें. परंतु मनाचें समाधान करीत मीं निश्चय केला कीं, परत कधींतरी नंदादेवीवर येईन आणि यशस्वी होईन; आणि त्याप्रमाणें शेवटीं झालेंहि.

मी दार्जिलिंगला येऊन पुन्हा उदरनिर्वाहासाठीं राबूं लागलों. ' टायगर हिल ' वर वारंवार जात असें त्या वेळीं तेथून प्रातःकाळच्या स्वच्छ सूर्य-प्रकाशांत रोज शेंकडों मैलांवरील त्या उंच एव्हरेस्टच्या शिखराच्या टोंकाचें दर्शन होत असे. आपली वाट पाहात तें उभें आहे असें वाटून मनाला थोडें समाधान लाभत असे.

१९३७ मध्यें दोन साहेबांबरोबर मी पुन्हा गढवालला गेलों. यावेळीं ' बंदर पूंछ ' ( माकडाचें शेपूट ) या २०,७२० फूट उंचीच्या पर्वतावर आम्ही चढणार होतों. एव्हरेस्ट किंवा नंदादेवीच्या मानानें हा पर्वत कितीतरी ल्हान होता. परंतु चढावयास फार कठीण. आम्ही १७ हजार फुटांपर्यंत पोंचलों. परंतु जोरदार हिमवृष्टि होऊं लागल्यामुळें आम्हांस पुढें जातां आलें नाहीं.

आम्हीं परत वर जाण्याचा प्रयत्न केला नाहीं. पायथ्याशींच कांहीं आठवडे राहून त्या प्रदेशाची माहिती मिळविली. त्या वेळीं अनेक संकटांना आम्हांला तोंड द्यावें लागलें. एक दिवस आम्ही हिंडत असतांना खूप धुकें दाटलें आणि नंतर जोराची पर्जन्यवृष्टि झाली. रस्ता सांपडेना तेव्हां आम्हीं एका गुहेंत आसरा घेतला. पाऊस थांबेना. उपाशी राहून दोन दिवस गुहेंत काढले.

तिबेटच्या रस्त्यावरील एका गांवाहून आम्ही एक दिवस परत येत होतों. वाटेंत दाट जंगल होतें. त्यांत आमची एकमेकाशीं चुकामूक झाली. मी व मि. गिब्सन एकत्र होतों. आमच्याजवळील अन्न संपलें. कडाक्याची भूक लागली. जंगलांतील बेरीचीं फळें उपटून आम्हीं खाल्लीं. पण भूक भागेना. पुढें जवळच्या एका गांवांतील कांहीं खेडुत वाटसरू रस्त्यावर शिदोरी सोडून फराळ करतांना आम्हीं पाहिले. आम्हीं त्यांच्यापाशीं थोडें अन्न विकत मागितलें. पण अन्न देण्यास ते तयार होईनात. पोटांत तर भुकेनें कहर उडविला होता. मला एक युक्ति सुचली. या लोकांची अशी एक

समजूत असते कीं, आपण खात असलेल्या अन्नाला कोणी परका माणूस नुसता शिवला तरी तें अन्न खराब होतें व मग तें अन्न टाकून दिलें जातें. गिब्सनला मीं सांगितलें कीं, तूं कांहीं तरी हिकमत करून त्या अन्नाला स्पर्श कर. त्यानें " हें काय आहे ? " " या वस्तूला काय म्हणतात ? " वगैरे प्रश्न विचारण्याच्या मिशानें त्या अन्नाला किंचित् स्पर्श केला, तसे ते खेडुत खवळले आणि अन्न टाकून चालते झाले. गिब्सन त्या अन्नाबद्दल त्यांना वीस रुपये देऊं लागला. पण खेडुतांनीं ते घेतले नाहींत. मागाहून आम्ही पोटभर जेवलों.

दोन वर्षांत मी दोनदां गढवाल पर्वतावर जाऊन आलों. माझा तो प्रवास खूप मजेचा झाला असला तरी एव्हरेस्टवर जाण्याची हौस त्यानें थोडीच भागणार होती ? मी एव्हरेस्टवर जाण्याच्या संधीची अतिशय आतुरतेनें वाट पाहात होतों. १९३८ सालीं ती मला मिळाली. एव्हरेस्टवर होणारी ती सातवी स्वारी आणि तींत सामील होण्याची माझी ती तिसरी वेळ होती.

या वेळच्या तुकडीचा नेता मि. टिलमन हा ब्रिटिश गिर्यारोहक होता. मि. एरिक शिप्टन आणि दोन नवे व दोन जुने साहेबहि तुकडींत होते. टिलमनला सर्वजण ' बालू ' म्हणजे अस्वल म्हणत असत. कारण त्याच्या भुंवया जाड आणि शरीर केसाळ होतें. शेरपांचें त्याच्यावर फार प्रेम होतें. कारण तो मोठा चांगला व शांत स्वभावाचा होता. टिलमननेंच ' टायगर ' ही पदवी आणि तिचीं पदकें द्यावयाच्या प्रथेचा प्रारंभ केला.

रोंगबुक मठाच्या मार्गानेंच यावेळींहि आम्ही एव्हरेस्टच्या पायथ्याशीं आलों. तेथें मला माझे वडील भेटावयास आले होते. त्यांची आणि माझी ही अखेरचीच भेट ठरली. कारण पुढें १९४९ मध्यें सोलोखुंबूंत ते जग सोडून गेले. त्या वेळीं मी तेथें नव्हतों. वडिलांची माझ्यावर फार ममता होती. त्यांच्या स्मृतीला माझे प्रणाम !

या स्वारींत ' नॉर्थ कोल'कडे आम्हीं दोन निरनिराळ्या दिशांनीं जावयाचें ठरविलें. पूर्व रोंगबुक ग्लेशियरच्या मार्गानें आणि मूळ रोंगबुक ग्लेशियरमधील एका नव्या वाटेनें. हा दुसरा नवीन रस्ता अतिशय चढाचा

व भयंकर धोक्याचा होता. पर्वतावरून प्रचंड हिमराशी खालीं कोसळत येत असत.

अशाच एका प्रचंड हिमराशीखालीं मी सांपडलों. गिर्यारोहणाच्या माझ्या जीवनांतील ही पहिलीच अशी वेळ होती. आम्ही तिघेजण एका बाजूनें वर चढत होतों. त्या जागेवर छातीइतक्या उंच बर्फाचा थर होता. अतिशय प्रयासानें आणि सावकाश आम्ही चढत होतों. इतक्यांत एकाएकीं आमच्या पायाखालील बर्फाच्या थराला तडा गेल्याचा आवाज आम्हीं ऐकला; आणि बर्फ हळूहळू घसरूं लागला व दुसऱ्याच क्षणीं आम्ही तिघेहि त्याच्याबरोबर कोलमडत खालीं जाऊं लागलों. माझें डोकें बर्फांत सांपडलें आणि पाय वर तरंगूं लागले. सर्वत्र अंधार दिसूं लागला १९२२ सालच्या याच ठिकाणीं झालेल्या अपघाताची (त्यांत सात शेरपा मृत्युमुखीं पडले होते) आठवण झाली आणि वाटलें आतां संपलें ! परंतु बर्फाबाहेर डोकें वर काढण्याची धडपड चालूंच होती. खांद्यावरील बर्फ फोडण्याच्या कुऱ्हाडीनें बाजूचा बर्फ फोडून दूर फेकत होतों. कुऱ्हाडीला एक बर्फाचा मोटा ठोकळा लागला, तो जोरानें हिसका देऊन वर उचलला आणि फेंकला. माझें डोकें वर निघालें. आजूबाजूला पाहिलें; प्रकाश दिसला आणि जिवंतपणें या संकटांतून बाहेर पडलों म्हणून सुस्कारा टाकला.

आम्ही सर्वजण वांचलों. कोणास दुखापत झाली नाहीं. फक्त एक छोटीशीच वस्तु हरवली. कॅप्टन ऑलिव्हरची लोकरीची कानटोपी कुठें तरी गडप झाली !

पुढें नॉर्थ कोलवर आम्हीं चौथा मुक्काम केला. तिसऱ्यांदा मी एथपर्यंत आलों होतों. परंतु आणखी उंच चढण्याची माझी इच्छा होती. नॉर्थ कोलच्या ईशान्य दिशेच्या आणखी कडेनें वर चढलों आणि सुमारें २५,८०० फुटांवर आम्हीं पांचवा मुक्काम केला. इतक्या उंचीवर मी प्रथमच्च चढलों होतों. परंतु मला त्याचा त्रास झाला नाहीं. येथें खडकावर अतिशय खोल बर्फाचा थर पसरला होता. हवाहि खराब होती. कुऱ्हाडीनें बर्फ काढून प्रत्येक पाऊल आम्ही टाकीत होतों. आम्हीं आणखी वर चढून सहावा मुक्काम करावयाचें ठरविलें. परंतु आमचें सामान खालच्या नॉर्थ कोलवरून वाहून आणणारे दोन शेरपा अद्याप पांचव्या मुक्कामापर्यंतहि

आले नव्हते; आणि त्या सामानाशिवाय तर आम्ही सहाव्या मुक्कामापर्यंत पोंचूं शकत नव्हतों. म्हणून खालीं नॉर्थ कोलवर जाऊन तें सामान कोणी आणावयाचें हा प्रश्न होता. कोणी शेरपा तयार होईनात. तेव्हां मीं तें काम करावयाचें ठरविलें आणि पुन्हा पर्वत उतरून खालीं पोंचलों. एकटाच होतों. सामान पाठीवर टाकलें व पुन्हा वर चढूं लागलों. चढत असतांना अशा एका ठिकाणीं आलों कीं, तेथें तोल जाऊन गडगडत एक मैल खालीं आलों असतों. परंतु सुदैवानें माझ्या कुऱ्हाडीनें मला वांचविलें. अवधान राखून बर्फावर मीं ती हाणली आणि तिला घट्ट धरून तोल सावरला म्हणून जिवंत राहिलों. दिवस मावळण्याच्या आंत परत मी पांचव्या मुक्कामास सामानासह आलों तेव्हां मि. शिप्टननें मला शाबासकी दिली आणि पुढें आम्ही परत दार्जिलिंगला पोंचल्यावर वीस रुपयांची बक्षिशीहि दिली.

दुसऱ्या दिवशीं आम्हीं आणखी वर चढून सहावा मुक्काम २७,२०० फूट उंचीवर केला. १९५२ सालीं एव्हरेस्टच्या दुसऱ्या अंगानें मी स्विस तुकडीबरोबर याहिपेक्षां उंच गेलों असलों तरी आतांपर्यंतच्या प्रयत्नांत मी प्रथमच इतक्या उंचीवर पोंचलों होतों. परंतु त्यापुढें आम्हीं जाण्याचा नाद सोडून दिला. शिखरावर पोंचण्याची आशा सोडून दिली. कारण आमच्या पायाखालील बर्फाचे थर इतके भुसभुशीत आणि हवा इतकी वादळी व पावसाळी होती कीं, वर पोंचण्याची आशा करणेंच वेडे-पणाचें होतें.

या स्वारीच्या वेळीं मीं प्रथम गिर्यारोहकांना ऑक्सिजनचा पुरवठा करणारें यंत्र पाहिलें. तें फार प्रचंड होतें. तें वापरण्यापासून फायदा होत असला तरी त्याचा तापहि होत असे. पुढें कांहीं वर्षांनीं ऑक्सिजनचीं सुधारलेलीं यंत्रें निघालीं. शेरपा लोकांनीं या कृत्रिम ऑक्सिजनचें नांव ठेवलें आहे " इंग्लिश हवा. "

आम्ही सहाव्या मुक्कामावरून खालीं उतरूं लागलों. उतरतांना खूप त्रास झाला. एक दुर्दैवी घटनाहि घडली. आमच्या तुकडींतील एक शेरपा पासांग भुतिया याला एकाएकी कसला तरी लकव्यासारखा झटका आला आणि त्याच्या शरीराची हालचाल थांबली. मीं त्याला खूप जोरानें हालवून

पाहिलें. पण उपयोग होईना. पुढें तो घरीं परतल्यावरहि तशाच अवस्थेंत राहिला.

या स्वारीमध्यें सहाव्या मुक्कामापर्यंत जे शेरपा पोंचले होते त्यांना टिलमननें ' टायगर मेडल्स ' दिलीं. या प्रथेचा प्रारंभ या वेळपासूनच झाला. हें पदक मिळालेल्या पहिल्या शेरपांत मी होतों याचा मला अभिमान वाटला. परंतु या वेळींहि मी एव्हरेस्टच्या शिखरापर्यंत जाऊं शकलों नाहीं याचें दुःख मनांत राहिलें. " ठीक आहे. पुढील वर्षीं नाहींतर त्याच्या पुढील वर्षीं तरी आपण निश्चित जाऊं " असें मनाचें मीं समाधान केलें. पण दुर्दैव ! बाहेरच्या जगांत काय चाललें आहे याचा माझ्यासारख्या अडाण्याला काय पत्ता ? १९३९ मध्यें महायुद्ध सुरू झालें आणि नंतर तब्बल चौदा वर्षें एव्हरेस्टवर जाण्याची संधि मला मिळाली नाहीं.

* *

## एव्हरेस्टपासून हिंदुकुशाकडे : ७ :

१९३८ सालीं हिंवाळा सुरू होण्यापूर्वींच मेजर ऑसमॅस्टन यांच्या तुकडींतून पुन्हा एकदा मी गढवालवर गेलों होतों. पूर्वींप्रमाणें यावेळींहि पर्वताची फक्त पाहणी ऑसमॅस्टनला करावयाची होती. त्यामुळें आम्हीं पर्वतशिखरावर जाण्याचा प्रयत्न केला नाहीं. या प्रवासांत मी तिबेटच्या हद्दीवर एकदां गेलों असतां कैलास पर्वताचें दुरून दर्शन झालें. तें फक्त २२ हजार फूट उंच आहे. पण हिंदु व बौद्ध धर्मीयांचें तें एक पवित्र हिमशिखर आहे. कधीं तरी एक दिवस मी तेथें जाईन अशी आशा आहे.

या वर्षीं मला आणि दावा फुतीला एक मुलगी झाली. तिचें नांव पेम पेम ठेवलें. माझा मुलगा निमा दोर्जे आतां तीन वर्षांचा झाला होता. त्याच्याकडे पाहून मी मनाशीं म्हणत असें, " तूं मोठा झालास म्हणजे माझ्याप्रमाणें पर्वत चढशील आणि सर्वांत चांगला ' टायगर ' म्हणून नांव कमावशील."

१९३९ च्या उन्हाळ्यांत एका नव्या पर्वतशिखरावरील स्वारींत मी

सामील झालों. सिंधु नदापलीकडील अफगाणिस्तानच्या सरहद्दीवर हिंदुकुश पर्वतराजी आहे. त्यांतील तिरीच मीर या २५,२६० फूट उंचीच्या अति मनोहारी शिखरावर आम्ही जाणार होतों. आमच्या तुकडींत फारच थोडे लोक होते. मि. आणि मिसेस स्मीटन, त्यांचा एक साहेब मित्र, मी आणि कांहीं शेरपा व पोर्टर्स इतकीं माणसें होतीं. उंच शिखरावर जाण्या-साठीं लागणारीं साधनेंहि आमच्यापाशीं नव्हतीं. कारण ही आमची स्वारी शिखरावर पोंचलेंच पाहिजे या ईर्षेनें काढण्यांत आली नव्हती. ती एक सहल होती. तथापि आम्ही २३ हजार फूट उंचीपर्यंत गेलों. विशेष म्हणजे आमच्या बरोबरची ती साहेब बाई मिसेस स्मीटन इतक्या उंचापर्यंत आमच्याबरोबर आली होती.

तिरीच मीरच्या स्वारीनंतर मी चित्रळलाच एका साहेबाकडे वर्षअखेर-पर्यंत कामासाठीं राहिलों. तेथें असतांनाच माझा मुलगा निमा दोर्जे रक्ती-आवेनें भयंकर आजारी असल्याची वाईट बातमी मिळाली. मी साहेबाची परवानगी घेऊन तांतडीनें दार्जिलिंगला गेलों. परंतु त्या आधींच निमा आम्हाला सोडून गेला होता.

याच वर्षीं मला दुसरी मुलगी झाली तिचेंहि नांव आम्हीं निमा ठेवलें. मी बायको-मुलांना घेऊन नंतर परत चित्रळला येऊन राहिलों. तेथें मी त्यानंतरचीं पांच वर्षें होतों. युद्ध सुरू झालें होतें आणि तें थांबण्याचें चिन्ह दिसत नव्हतें. त्यामुळें परदेशांतून गिर्यारोहणासाठीं फारच क्वचित् साहेब लोक येत असत. म्हणून दार्जिलिंग सोडून मी चित्रळला येऊन राहिलों.

चित्रळला मी ज्या साहेबाकडे नोकरीस होतों तो हिंदी फौजेंतील एका रेजिमेंटचा अधिकारी होता. तेथें मीं ऑर्डर्ली, स्वयंपाकी आणि हरकाम्या म्हणून काम केलें. साहेबाबरोबर वायव्य सरहद्दीवरील अनेक ठिकाणीं प्रवास करण्याची मला संधि मिळाली. एका हिंवाळ्यांत आम्ही काश्मीरला गेलों होतों. तेथेंच मला आमच्या साहेबानें पायाला चाकें लावून बर्फावरून घसरत घसरत पळण्यास ( स्केटिंग ) शिकविलें. मला त्याची गंमत वाटली. आगगाडींत बसूनहि आपण जितक्या वेगानें धावलों नव्हतों इतक्या वेगानें बर्फाच्या डोंगरावरून धावूं शकतों हें पाहून मला खूप मजा वाटली. गिर्यारोहणापेक्षां या कामांत अधिक वेग आहे याचा अनुभव आला.

चित्रळमध्यें असतांना मला पाश्चात्य साहेबांचा जवळून अनुभव आला. त्यांचें राहणें, खाणें-पिणें, संवई इत्यादींचा परिचय झाला. अनेक देशांतील व अनेक भाषिक लोक मला तेथें भेटले—तुर्की, अफगाण, हिंदु, मुसलमान, इंग्रज इत्यादि. त्यामुळें मला हिंदुस्थानी, चित्रळी, पुश्तु समजूं लागले आणि इंग्रजी बोलण्याचाहि अधिक सराव झाला. मीं पूर्वी इंग्लंड या एकाच परदेशाचें नांव ऐकलें होतें. आतां मला युरपमधील आणि जगांतील अनेक देशांची थोडी थोडी माहिती झाली. चित्रळला असतांना मी रेडिओ ऐकत असें. त्या वेळीं या देशांच्या नांवाचा मला परिचय झाला. मनांत विचार येई कीं, आपण कधीं तरी या देशांना जाऊं शकूं का ?

युद्ध चालू होतें; तें लांबत चाललें होतें. भारतीय स्वातंत्र्यासाठीं आणि पाकिस्तानकरितां चाललेल्या चळवळीचीहि बरीच चर्चा चालू होती. त्या वेळीं मला राजकारणाची फारच थोडी माहिती होती. शांतपणें जीवन कंठावें आणि आपलें काम आपण करीत राहावें अशी माझी वृत्ति होती. तें त्या वेळीं शक्य होतें. पण एव्हरेस्टवर १९५३ सालीं जाऊन आल्यानंतर मात्र राजकारणानें माझा पिच्छा पुरविला.

चित्रळमध्यें असतांनाच १९४४ सालीं माझी प्रिय पत्नी दावा फुती मला व आमच्या दोन मुलींना एकटे टाकून जग सोडून गेली. त्या लहान मुलांना आतां कोण सांभाळणार ? दार्जिलिंगला परत जाण्याचें मीं ठरविलें.

परंतु युद्धामुळें प्रवासाचीं साधनें फार दुर्मिळ झालीं होतीं. घोड्यावरून मी आणि माझ्या दोन मुली दीर नांवाच्या एका शहरीं पोंचलों. तेथें रेल्वे होती. पण प्रवासासाठीं शेंकडों लोक स्टेशनवर थांबून होते. कित्येक दिवस मला जागा मिळाली नाहीं. त्या दोन पोरींचे हाल होत होते. काय करावें तें सुचेना. शेवटीं एक क्लृप्ति काढली. चित्रळला असतांना माझ्या साहेबानें आपला एक जुना लष्करी युनिफॉर्म मला दिला होता. तो माझ्याबरोबर होता. तो अंगावर चढविला आणि स्टेशनांत गाडी आल्यावर सरळ पहिल्या वर्गाच्या एका लष्करी डब्यांत शिरून बसलों; आणि आरामशीर प्रवास करून दार्जिलिंगजवळच्या एका स्टेशनवर पोंचलों. तेथें तो युनिफॉर्म काढून ठेवला आणि पुन्हा जुने कपडे चढवून मोटरनें दार्जिलिंगाला गेलों. माझ्या मुलींना सांभाळण्याचा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला.

कांहीं दिवसानीं आंग ल्हामूशीं मी विवाहबद्ध झालों. हीच मुलगी पूर्वीं माझ्याकडून दूध खरेदी करीत असे आणि भावासाठीं घासाघीस करी. आतां ती माझी बायको आणि माझ्या दोन मुलींची आई झाली. तिचें ऋण मी कधीं विसरणार नाहीं.

* *

# येती : हिममानव नव्हे हिमपशु : ८ :

१९४६ च्या उन्हाळ्यापर्यंत युद्धामुळें गिर्यारोहणासाठीं विशेषशा तुकड्या येत नव्हत्या, त्यामुळें कांहीं तरी उद्योगाच्या मी शोधांत होतों. या वेळींच नवीन उद्योग करण्याची एक योजना सुचली. युद्धकाळामध्यें अनेक परदेशी लोक हिंदुस्थानांत येऊन राहिले होते. हिमालयांतील निसर्गसुंदर स्थळें पाहण्यासाठीं त्यांच्यापैकीं कित्येकजण दार्जिलिंगला येत असत. त्यांना घोड्यांवरून अशीं स्थळें दाखविण्यासाठीं मी घेऊन जाऊं लागलों. अमेरिकन, इंग्रज अशा अनेक प्रवाशांना घेऊन मी दार्जिलिंग-जवळच्या अनेक ठिकाणीं जात असें.

एकदां एक गंमत झाली. एका इंग्रज जोडप्याबरोबर मी टायगर हिल-वर गेलों होतों. त्या जोडप्यांतील स्त्री फारच सुंदर, गोरी आणि शुभ्र दांत असलेली होती. एकदां सबंध दिवस प्रवास केल्यानंतर एका ठिकाणीं आम्ही रात्रीं मुक्कामासाठीं थांबलों. सकाळीं उठल्यावर तोंड धुण्यासाठीं मी त्या बाईसमोर पाण्याची बादली ठेवावयास गेलों. तों काय आश्चर्य ! मी क्षणभर भांबावून गेलों. आमची ती सुंदर साहेबबाई कोठें दिसेना. तिच्या ऐवजीं एक तोंडाचें बोळकें झालेली दंतहीन व फिकट चेहऱ्याची बाई तेथें उभी होती. थोड्या वेळानें या प्रकरणाचा उलगडा झाला. तोंड धुऊन झाल्यावर ती बाई कृत्रिम दांत आणि फेसपावडर लावून पुन्हा बाहेर आली तेव्हां पूर्ववत् दिसूं लागली. सुंदर बनण्याची ही साहेबी क्लृप्ति मीं प्रथमच पाहिली.

१९४६ च्या उन्हाळ्यांत गढवालमधील ‘ बंदर पूंछ ’ पर्वतावर

मि. गिब्सन आदि जुन्या सहकाऱ्यांबरोबर जाण्याची पुन्हा संधि मिळाली. गिब्सनचें मला बरोबर येण्याचें निमंत्रण आलें तेव्हां मी अक्षरशः नाचलों. कारण कित्येक वर्षांनीं पुन्हा माझ्या आवडत्या गिर्यारोहणासाठीं मी जाणार होतों. १९३७ सालीं याच पर्वतावर आम्ही गेलों होतों. त्या वेळेपेक्षां १ हजार फूट म्हणजे १८ हजार फूट उंच या वेळीं आम्ही पोंचलों आणि हवा वाईट झाल्यामुळें आम्हांस परत फिरावें लागलें.

कांचनगंगा हा जगांतील नंबर तीनचा सर्वांत उंच पर्वत समजला जातो. दार्जिलिंगच्या पाठीशीं तो उभा आहे. मीं आयुष्याचीं कित्येक वर्षें तेथें काढलीं आहेत. एव्हरेस्टपासून गढवाल-काश्मीरपर्यंतच्या अनेक जवळ व दूरच्या पर्वतावर मी गेलों होतों. परंतु आपल्या शेजारच्या कांचनगंगा हिमपर्वतावर जाण्याचा कांहीं योग आला नव्हता.

या पर्वतावर जाण्याचे १९०५ सालापासून आतांपर्यंत अनेक अपेशी प्रयत्न झाले आहेत. जर्मन, इंग्रज, स्विस, ऑस्ट्रियन, अमेरिकन या साहेब गिर्यारोहकांनीं या प्रयत्नांत भाग घेतला. परंतु अद्याप या पर्वताच्या शिखरापर्यंत पोंचण्यांत कोणालाच यश आलेलें नाहीं. १९३१ सालीं दोन जर्मन तुकड्यांनीं केलेल्या स्वारींत २६ हजार फूट उंचीपर्यंत ते पोंचूं शकले. आतांपर्यंतच्या या सर्व प्रयत्नांत दोन शेरपा व एक जर्मन मृत्यु पावले आहेत. या पर्वतावरील हवा कधीं वादळी असते तर कधीं तेथें प्रचंड हिमराशीखालीं सांपडण्याची भीति असते. कधीं कधीं खूप पाऊस पडतो. या अनिश्चित हवेमुळें या पर्वतावर चढणें फारच मुश्कील व धोक्याचें आहे.

मीं कांचनगंगा पर्वतावर कधींच चढून जाण्याचा प्रयत्न केला नव्हता. परंतु १९४६ सालीं दोन वेळा या कठीण हिमपर्वतावर जाण्याची संधि मला प्रथम मिळाली. या पर्वताच्या शिखरावर पोंचण्याचा आमचा उद्देशच नव्हता. पूर्वींच्या तुकडींतील जे गिर्यारोहक या पर्वतावर मरण पावले होते, त्यांच्या अवशेषांचा तलास घेण्यासाठीं आम्ही दोनदां या पर्वतावर गेलों होतों.

यापैकीं दुसऱ्या वेळीं ‘ येती ’ च्या ( हिममानवाच्या ) हालचालींचा कांहींसा मागोवा आम्हांला लागला.

मीं प्रत्यक्ष येतीस कधींहि पाहिलेलें नाहीं. या वेळीं प्रथमच झेमू

ग्लेशियरवर व नंतर १९५२ सालीं एव्हरेस्टवर त्याच्या वाटचालीच्या कांहीं खुणा मीं फक्त पाहिल्या. लहानपणीं सोलोखुंबूंत गुरें चारावयास एव्हरेस्टच्या पायथ्याशीं जात असें त्या वेळीं एकदां कोणातरी विचित्र प्राण्याच्या शेणाचे लहान लहान पुंजके मीं पाहिले होते. ते बहुधा येतीचेच असावेत असा माझा समज आहे. परंतु माझ्या वडिलांकडून व इतर शेरपांकडून येतीसंबंधींच्या अनेक चमत्कारिक कथा मात्र मीं कित्येकदां ऐकल्या आहेत.

माझ्या वडिलांना दोनदां येतीच्या अस्तित्वाचा अनुभव आला आहे. एकदां त्याला वडिलांनीं प्रत्यक्ष समोरासमोर पाहिलें आहे. मकालू व त्सा-चू पर्वतांच्या जवळील बारून ग्लेशियरमध्यें तो एकदां त्यांच्या दृष्टीस पडला. एकदम अचानकपणें तो त्यांना दिसला; अगदीं स्पष्टपणें दिसला. एखाद्या मोठ्या वानरासारखा तो दिसत होता. त्याचे डोळे व भुंवया खालीं ओघळल्यासारखे दिसत होते; आणि मस्तकावरचा भाग चिंचोळा होता. रंग करडा होता आणि एक डोळ्यांत भरण्याजोगें वैशिष्ट्य म्हणजे त्याचे लांब केस कमरेच्या वरच्या बाजूस डोक्याच्या दिशेनें आणि खालच्या बाजूस पायाच्या दिशेनें असे दोन्ही बाजूंनीं वाढलेले दिसत होते. त्या येतीची उंची चार फूट असेल. ती मादी होती. कारण तिचे लोंबणारे स्तन स्पष्ट दिसत होते; ती मागील दोन पायांवर पळूं लागली तेव्हां आपले दोन्ही स्तन तिनें दोन्ही हातांनीं सांवरले होते. त्या येतीला पाहून माझे वडील भयभीत झाले. तो येतीहि भिऊन धावूं लागला आणि पर्वताच्या एका उंच उतारावर चढून गेला. जातां जातां त्यानें जोरानें कर्कश शीळ घातल्याचें वडिलांनीं ऐकलें. नंतर तो कुठें अदृश्य झाला तें समजलें नाहीं. माझे वडील भीतीनें गांगरून गेले. कारण असा एक समज आहे कीं, येतीला पाहिलेला माणूस जिवंत राहात नाहीं. सुदैवानें माझे वडील मेले नाहींत, पण त्यानंतर एक वर्षभर ते आजारी होते.

१९३५ सालीं नांगपा ला खिंड ओलांडून मला रोंगबुकला भेटायला आले असतां माझ्या वडिलांनीं दुसऱ्यांदा येतीला पाहिलें. नंबर एकच्या छावणींत एका रात्रीं ते मुक्कामाला होते. रात्रभर एकटेच तंबूत होते. आम्ही कोठेंतरी पर्वतावर हिंडत होतों. सकाळीं सूर्यप्रकाश पडावयाच्या

सुमारास तंबूच्या बाहेर त्यांना कर्कश शिळीचा आवाज ऐकूं आला. त्यांनीं तंबूचें बंद दार किलकिलें केलें आणि बाहेर पाहिलें तेव्हां त्यांना दूरवर बर्फाच्या टेकडीवरून येती येतांना दिसला. वडील घाबरून गेले. बाहेर जाण्याची त्यांना हिम्मत होईना आणि आंतहि राहण्याची भीति वाटूं लागली. कारण येती तंबूंत घुसेल असें त्यांना वाटलें. कांहीं वेळानें येती दिसेनासा झाला.

हिमालयांत राहणाऱ्या साऱ्या गिरिजनांत येतीविषयींच्या अनेक सुरस कथा प्रचलित आहेत. त्यांतील लोकभ्रम स्वरूपाच्या किती आहेत आणि वस्तुस्थितिनिदर्शक किती आहेत हें सांगतां येणें कठीण आहे. सोलोखुंबूंतील शेरपांत अशीच एक गोष्ट प्रचारांत आहे. कित्येक वर्षांपूर्वी एकदां तारग्ना नांवाच्या खेड्यापाशीं येतींचा एक तांडाच्या तांडा येऊन राहिला होता. ते दिवसा कोठें तरी लुप्त होत असत आणि रात्र झाली कीं, त्यांचा संचार सुरू होई. शेरपांनीं बांधलेलीं घरें, लागवडीला आणलेलीं पिकें ते पाडून मोडून टाकीत. त्यामुळें शेरपांना पुन्हा सर्व उद्योग करावा लागे. पण त्या येतींची एक चमत्कारीक गंमत होती. ते घराशेतांची तोडमोड करून स्वस्थ बसत नसत तर ते आपल्या कल्पनेनें पुन्हा तीं घरें बांधत आणि पिकें लावीत. या प्रकारानें खेडुत गिरिजन वैतागून गेले. म्हणून त्यांनीं त्या येतींचा कांटा काढण्यासाठीं एक युक्ति योजिली. जेथें रात्रीं येती जमत असत त्या ठिकाणीं एक दिवस त्यांनीं थाळ्यांतून भरपूर चँग ( शेरपा दारू ) नेऊन ठेविली आणि शेजारीच पांचपंचवीस कुकऱ्या ( नेपाळी चाकू ) ठेवून दिल्या. त्यांची युक्ति सफल झाली. त्या दिवशीं रात्रीं सर्व येती तेथें जमले त्या वेळीं त्यांनीं दारूवर सपाटून ताव मारला आणि बेहोष झाल्यावर कुकऱ्या हातांत घेऊन एकमेकांवर हल्ले करून ते सर्वजण तेथें मरून पडले.

शेरपांच्या समजुतीप्रमाणें येतींत दोन प्रकार आहेत. एक ' मेत्री ' म्हणजे नरभक्षक व दुसरा ' चत्री ' म्हणजे ' पशुभक्षक.' या दोन्ही येतींचे पाय मागील बाजूस वळलेले असतात. ' चत्री ' जातीचा येती अधिक मोठा, एखाद्या मोठ्या अस्वलासारखा दिसतो. पाश्चिमात्य लोकांच्या मतेंहि येती हा एक अस्वलासारखा दिसणारा मोठा प्राणी आहे. प्रसिद्ध शास्त्रज्ञ मि. ज्युलियन हक्सले यांचेंहि तसेंच मत आहे. पण कांहीं लोकांच्या मताप्रमाणें

येती मोठ्या माकडासारखा दिसणारा पशु आहे. माझ्या वडिलांचेंहि तेंच मत आहे.

आपण येती पाहिला असल्याचा दावा फारच थोडे लोक करतात. पर्वतावर राहणारे आदिवासी येतीला पाहणें हें अशुभकारक मानतात. मीं मात्र कधींहि येती पाहिलेला नाहीं. मी अंधश्रद्ध नाहीं. म्हणून येती हा एखादा दैवी प्राणी आहे असें मी मानीत नाहीं. येतीसंबंधींच्या भाकडकथांवरहि माझा विश्वास नाहीं. परंतु येती मीं प्रत्यक्ष पाहिला नसला तरी तसा एखादा प्राणी असला पाहिजे असें मात्र मला वाटतें. मात्र माझ्या समजुतीप्रमाणें तो कोणी मानव नाहीं; एक पशु आहे. हा प्राणी रात्रीं-अपरात्रीं संचार करीत असावा व लहान प्राणी आणि जीवाणूंवर त्याचा उदरनिर्वाह होत असावा. हा येती माकडासारखा दिसत असावा.

एव्हरेस्ट पर्वतावर येतीचा शोध घेण्यासाठीं १९५४ मध्यें ब्रिटिश व हिंदी गिर्यारोहकांची एक खास तुकडी गेली होती. त्या तुकडींत जाण्याची माझी इच्छा होती, पण जमलें नाहीं. तुकडीला प्रत्यक्ष येती दिसला नाहीं. तथापि त्याच्या वाटचालीच्या व इतर खुणा तिनें पाहिल्या. यापेक्षां अधिक कांहीं सांपडणें शक्य दिसत नाहीं. जगांत आजकाल अनेक नव्या नव्या गोष्टींचा शोध लागत आहे. परंतु अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्यांचा मानवाला शोध घेतां येत नाहीं याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

* *

# आंग ल्हामू : ९ :

युद्धसमाप्तीनंतरचें दार्जिलिंगमधील माझें जीवन अतिशय कष्टमय होतें. परदेशी गिर्यारोहक अजूनहि फारसे येत नव्हते. अमेरिकन लष्करी अधिकारी व भारत स्वतंत्र झाल्यामुळें इंग्रजसाहेब देश सोडून चालले होते. त्यामुळें हिमालयांत प्रवासासाठीं येणाऱ्या पाहुण्यांची संख्या एकदम घटली. त्यामुळें पर्वतप्रवासाची संधि मला मिळत नव्हती आणि आर्थिक मिळकतहि तुटली होती. चित्रळमध्यें नोकरी करीत असतांना सांठविलेली पुंजी संपुष्टांत आली

सुमारास तंबूच्या बाहेर त्यांना कर्कश शिळीचा आवाज ऐकूं आला. त्यांनीं तंबूचें बंद दार किलकिलें केलें आणि बाहेर पाहिलें तेव्हां त्यांना दूरवर बर्फाच्या टेकडीवरून येती येतांना दिसला. वडील घाबरून गेले. बाहेर जाण्याची त्यांना हिम्मत होईना आणि आंतहि राहण्याची भीति वाटूं लागली. कारण येती तंबूंत घुसेल असें त्यांना वाटलें. कांहीं वेळानें येती दिसेनासा झाला.

हिमालयांत राहणाऱ्या साऱ्या गिरिजनांत येतीविषयींच्या अनेक सुरस कथा प्रचलित आहेत. त्यांतील लोकभ्रम स्वरूपाच्या किती आहेत आणि वस्तुस्थितीनिदर्शक किती आहेत हें सांगतां येणें कठीण आहे. सोलेखुंबूंतील शेरपांत अशीच एक गोष्ट प्रचारांत आहे. कित्येक वर्षांपूर्वी एकदां तारग्ना नांवाच्या खेड्यापाशीं येतींचा एक तांडाच्या तांडा येऊन राहिला होता. ते दिवसा कोठें तरी लुप्त होत असत आणि रात्र झाली कीं, त्यांचा संचार सुरू होई. शेरपांनीं बांधलेलीं घरें, लागवडीला आणलेलीं पिकें ते पाडून मोडून टाकीत. त्यामुळें शेरपांना पुन्हा सर्व उद्योग करावा लागे. पण त्या येतींची एक चमत्कारीक गंमत होती. ते घराशेतांची तोडमोड करून स्वस्थ बसत नसत तर ते आपल्या कल्पनेनें पुन्हा तीं घरें बांधत आणि पिकें लावीत. या प्रकारानें खेडुत गिरिजन वैतागून गेले. म्हणून त्यांनीं त्या येतींचा कांटा काढण्यासाठीं एक युक्ति योजिली. जेथें रात्रीं येती जमत असत त्या ठिकाणीं एक दिवस त्यांनीं थाळ्यांतून भरपूर चँग ( शेरपा दारू ) नेऊन ठेविली आणि शेजारीच पांचपंचवीस कुकऱ्या ( नेपाळी चाकू ) ठेवून दिल्या. त्यांची युक्ति सफल झाली. त्या दिवशीं रात्रीं सर्व येती तेथें जमले त्या वेळीं त्यांनीं दारूवर सपाटून ताव मारला आणि बेहोष झाल्यावर कुकऱ्या हातांत घेऊन एकमेकांवर हल्ले करून ते सर्वजण तेथें मरून पडले.

शेरपांच्या समजुतीप्रमाणें येतींत दोन प्रकार आहेत. एक ‘ मेत्री ’ म्हणजे नरभक्षक व दुसरा ‘ चत्री ’ म्हणजे ‘ पशुभक्षक. ’ या दोन्ही येतींचे पाय मागील बाजूस वळलेले असतात. ‘ चत्री ’ जातीचा येती अधिक मोठा, एखाद्या मोठ्या अस्वलासारखा दिसतो. पाश्चिमात्य लोकांच्या मतेंहि येती हा एक अस्वलासारखा दिसणारा मोठा प्राणी आहे. प्रसिद्ध शास्त्रज्ञ मि. ज्युलियन हक्सले यांचेंहि तसेंच मत आहे. पण कांहीं लोकांच्या मताप्रमाणें

येती मोठ्या माकडासारखा दिसणारा पशु आहे. माझ्या वडिलांचेंहि तेंच मत आहे.

आपण येती पाहिला असल्याचा दावा फारच थोडे लोक करतात. पर्वतावर राहणारे आदिवासी येतीला पाहणें हें अशुभकारक मानतात. मीं मात्र कधींहि येती पाहिलेला नाहीं. मी अंधश्रद्ध नाहीं. म्हणून येती हा एखादा दैवी प्राणी आहे असें मी मानीत नाहीं. येतीसंबंधींच्या भाकडकथांवरहि माझा विश्वास नाहीं. परंतु येती मीं प्रत्यक्ष पाहिला नसला तरी तसा एखादा प्राणी असला पाहिजे असें मात्र मला वाटतें. मात्र माझ्या समजुतीप्रमाणें तो कोणी मानव नाहीं; एक पशु आहे. हा प्राणी रात्रीं-अपरात्रीं संचार करीत असावा व लहान प्राणी आणि जीवाणूंवर त्याचा उदरनिर्वाह होत असावा. हा येती माकडासारखा दिसत असावा.

एव्हरेस्ट पर्वतावर येतीचा शोध घेण्यासाठीं १९५४ मध्यें ब्रिटिश व हिंदी गिर्यारोहकांची एक खास तुकडी गेली होती. त्या तुकडींत जाण्याची माझी इच्छा होती, पण जमलें नाहीं. तुकडीला प्रत्यक्ष येती दिसला नाहीं. तथापि त्याच्या वाटचालीच्या व इतर खुणा तिनें पाहिल्या. यापेक्षां अधिक कांहीं सांपडणें शक्य दिसत नाहीं. जगांत आजकाल अनेक नव्या नव्या गोष्टींचा शोध लागत आहे. परंतु अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्यांचा मानवाला शोध घेतां येत नाहीं याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

* *

## आंग ल्हामू : ९ :

युद्धसमाप्तीनंतरचें दार्जिलिंगमधील माझें जीवन अतिशय कष्टमय होतें. परदेशी गिर्यारोहक अजूनहि फारसे येत नव्हते. अमेरिकन लष्करी अधिकारी व भारत स्वतंत्र झाल्यामुळें इंग्रजसाहेब देश सोडून चालले होते. त्यामुळें हिमालयांत प्रवासासाठीं येणाऱ्या पाहुण्यांची संख्या एकदम घटली. त्यामुळें पर्वतप्रवासाची संधि मला मिळत नव्हती आणि आर्थिक मिळकतहि तुटली होती. चित्रळमध्यें नोकरी करीत असतांना सांठविलेली पुंजी संपुष्टांत आली

होती. या आर्थिक दुरवस्थेंत माझ्या सासुबाईंच्या आजारपणानें अधिकच भर पडली आणि मी अगदीं बेजार झालों.

कामधंदा शोधत होतों; पण कोठें मिळेना. शेवटीं आंग ल्हामूला नोकरी पत्करावी लागली. त्या कठीण व संकटमय काळांत आंग ल्हामूनेंच आम्हां सर्वांचा सांभाळ केला. जीवनभर मी तिचा ऋणी राहीन.

आंग ल्हामूचा जन्म दार्जिलिंगमध्यें झाला आहे; आणि तेथेंच ती ल्हानाची मोठी झाली. सोलोखुंबूंतील मागासलेल्या शेरपा जीवनाची तिला थोडीशीच माहिती असेल. परंतु इतर शेरपांप्रमाणेंच ती गरीब कुळांतील होती. त्यामुळें वयाच्या अगदीं आठव्या वर्षापासून काबाडकष्ट करण्याची तिला संवय होती. प्रथम कांहीं दिवस ती दार्जिलिंगच्या रस्त्यावर हमालीचें काम करीत असे. नंतर श्रीमंत कुटुंबांतून मोलकरणीचें आणि नंतर आयाचें काम करूं लागली. १९३८ सालीं वॅलेस नांवाच्या एका इंग्रजी कुटुंबांत ती आया म्हणून काम करीत होती. पुढें तें कुटुंब हिंदुस्थान सोडून आपल्या मायदेशीं गेलें तेव्हां आंग ल्हामूलाहि त्यांनीं आपल्याबरोबर नेलें. लंडन शहराच्या मध्यवस्तींतील हाईड पार्कमधील एका हॉटेलांत ती राहात असे. सात महिने तिचें लंडनमध्यें वास्तव्य होतें. परंतु लंडनला जातांना आणि तेथें गेल्यावर ती बरेच दिवस आजारी पडली. पुढें लौकरच वॅलेस कुटुंबाला परत हिंदुस्थानांत यावें लागलें. त्यामुळें माझ्या पत्नीचें इंग्लंडमधील वास्तव्य संपलें.

आंग ल्हामू फार अबोल आहे. आपल्याविषयीं ती कधीं कोणाशीं एक शब्द बोलणार नाहीं. कित्येक लोकांना ती इंग्लंडमध्यें पूर्वी एकदां जाऊन आलेली आहे हें अद्याप माहीत नाहीं. तिला इंग्रजी येतें याचाहि कित्येक लोकांना पत्ता नसेल. तिचें खरें नांवहि पुष्कळ लोकांना माहीत नाहीं. कारण ती ज्यांच्याकडे कामाला जात असे ते लोक तिला निमा या नांवानें हांक मारीत. पण ही बाई आपलें खरें नांव त्यांना सांगेल तर शपथ ! अलीकडेच एक मोठा मजेदार प्रसंग घडला. १९५३ सालीं मी एव्हरेस्टच्या स्वारीवर असतांना माझे फोटो त्या वेळीं वरच्यावर वृत्तपत्रांतून येत असत. आंग ल्हामूला त्याचें कौतुक वाटे आणि कुतूहलानें ती माझे फोटो वर्तमानपत्रें कां छापत आहेत याची कोणाकडे तरी चोरून चौकशी करी. त्या वेळीं ती दार्जिलिंगमधील एका ब्रिटिश साहेबाकडे कामाला होती.

एक दिवस तिनें त्या साहेबाकडे आलेल्या एका इंग्रज पाहुणीकडे वर्तमानपत्रांतील माझ्या फोटोसंबंधीं अशीच चौकशी केली. तेव्हां त्या बाईनें आश्चर्यानें विचारलें, " काय ग एवढी त्या तेनझिंगची का चौकशी करते आहेस? तुझा तो दोस्त आहे वाटतं?" परंतु आंग ल्हामूनें वस्तुस्थिति लपवून ठेवली. पण त्यानंतर एव्हरेस्ट चढून आल्यावर कांहीं महिन्यांनीं कलकत्त्यांत आम्हां उभयतांचा सत्कार झाला त्या प्रसंगीं ही इंग्रज बाईहि हजर होती. समारंभ संपल्यावर ती मला भेटावयास आली आणि चकित होऊन आंग ल्हामूकडे पाहूं लागली. म्हणजे " ही तर निमा आहे," एवढेच शब्द तिच्या तोंडून निघाले.

आमच्या वैवाहिक जीवनांत असे अनेक सुखदुःखाचे क्षण येऊन गेले आहेत. गिर्यारोहण करतांना पर्वतावरील चढउतारांचा जसा अनुभव येतो तसा याहि जीवनांत येत असतो. परंतु या अनुभवांत सहभागी होणारी आंग ल्हामूसारखी पत्नी मिळणें हें निःसंशय भाग्यवंताचें लक्षण आहे.

परंतु युद्धानंतरचे प्रारंभींचे कांहीं दिवस दुर्भाग्याचे गेले. बेकारीमुळें कांहींहि हमालीचें आणि शुष्क काम करावें लागत होतें. उत्तरेस दूरवर कांचनगंगा पर्वताचें तें अति उंच, धवल आणि सुंदर शिखर रोज दृष्टीस पडे. त्याकडे पाहून कधीं कधीं मनस्वी संताप येई. कारण आपणांस जणू तें वाकुल्या दाखवीत आहे असा भास होई. मला आणि या जगाला त्या वेळीं काय रोग झाला होता कोण जाणें? ज्या पर्वतांसाठीं माझा जन्म झाला आहे आणि ज्यांच्यावर माझें अलोट प्रेम आहे त्यांच्यावर कधींच का मी परत जाऊं शकणार नाहीं या शंकेनें मी हताशपणें मनाशीं संतापत असें. एव्हरेस्टच्या दिशेकडे मी पाहातहि नसें, कारण आपण तेथें कधींच जाऊं शकणार नसलों तर तें तेथें असलें काय आणि नसलें काय? त्याचा विचारहि मनाला अस्वस्थ करी. पण एव्हरेस्टसंबंधींच्या विचारानें माझी पाठ कधीं सोडली नाहीं.

१९४७ च्या वसंत ऋतूंत मि. डेन्मन नांवाच्या एका गृहस्थाबरोबर एव्हरेस्टवर जाण्याचा एक अगदीं चमत्कारिक व चक्रम प्रयत्न मीं केला. या गृहस्थाची आपण एकट्यानें एव्हरेस्टवर जावयाची महत्त्वाकांक्षा होती. गिर्यारोहणासाठीं नेहमीं केली जाणारी तयारी व आवश्यक साधनेंहि

त्याच्याजवळ नव्हतीं. परंतु त्याचा एव्हरेस्टवर जाण्याचा हट्ट होता. कोणीतरी एखादा अनुभवी शेरपा त्याला मदतीला हवा होता. म्हणून त्यानें मला बोलाविलें. एव्हरेस्टवर जाण्याचा मोह मी आवरूं शकलों नाहीं. आंग दावा नांवाच्या दुसऱ्या एका शेरपाला घेऊन आम्ही तिघेजण या स्वारीवर निघालों.

तिबेटमध्यें जाण्याचा परवानाहि मि. डेन्मनजवळ नव्हता. एव्हढेंच नव्हे तर तिबेटच्या हद्दीपर्यंतहि आपण जाणार नाहीं असें लेखी आश्वासन त्यानें संबंधित हिंदी अधिकाऱ्यांना दिलें होतें. म्हणून सर्व काम चोरून करावयाचें होतें. दार्जिलिंग शहराबाहेर गुप्तपणें आम्ही एका ठिकाणीं जमलों आणि प्रवासास प्रारंभ केला. सिक्कीमरस्त्यानें आम्ही जात होतों. कधीं आम्हीं एकेकट्यानें प्रवास केला तर कधीं बरोबरीनें. मनांत कोणी आपणांस हटकेल काय अशी भीति होती. परंतु अखेर आम्ही तिबेटच्या सरहद्दीवर यऊन तर थडकलों. नेहमींचा रस्ता सोडून आम्ही आडमार्गानें तिबेटमधील रोंगबुकच्या दिशेनें पुढें जात होतों. प्रवासांत रोज नव्या नव्या अडचणी येत होत्या. अन्नाचा पुरवठा कमी असल्यानें पुष्कळ वेळां अर्धपोटी राहावें लागत असे. एकदां वाटेंत तिबेटहद्दींत सरकारी रक्षकांनीं आम्हांस हटकलें आणि परत मागें जाण्याचा हुकूम दिला. परंतु त्याला झुकांडी मारून आम्ही निसटलों आणि मोठीं शहरें व गांवें टाळून आडरस्त्यानें शेवटीं रोंगबुकला मठापाशीं पोंचलों.

समोर तें माझ्या परिचयाचें अत्युच्च आणि शुभ्र चकाकणारें एव्हरेस्ट शिखर दिसत होतें. नऊ वर्षांच्या दीर्घ काळानंतर मला त्याचें दर्शन झालें. माझें मन पूर्वींप्रमाणें प्रफुल्लित झालें. आपल्या इष्ट स्थळीं आपण परत आल्यानें मन नाचूं लागलें. परंतु माझें डोकें शाबूत असल्यानें डेन्मनबरोबर या अतिप्रचंड शिखरावर जाण्याच्या आमच्या प्रयत्नांतील निरर्थकतेचीहि मला जाणीव होती.

तथापि आम्ही थांबलों नाहीं. वर जाऊं लागलों. नॉर्थ कोलच्या खालीं पोंचलों. अति सोसाट्याचा वारा वाहात होता आणि कडाक्याची थंडी होती. आमचे कपडे भिजून चिंब झाले. अन्न संपत आलें. मुख्य म्हणजे चहा संपुष्टांत आला. अशाहि परिस्थितींत आम्ही वर चढतच होतों — आणि

नेहमींपेक्षां द्रुतवेगानें. नॉर्थ कोलखालील बर्फाच्या डोंगरावर आम्ही पोंचलों. आतां यापुढें जाणें शक्य नाहीं हें मीं जाणलें. डेन्मन थंडीनें आजारी झाला. मला आणि आंग दावालाहि खूप त्रास होऊं लागला. डेन्मन कांहीं चक्रम माणूस नव्हता. उगीचच मरावयाची त्याची इच्छा नव्हती. त्यानें आपला पराभव मान्य केला आणि आम्ही परत फिरलों.

जितक्या झपाट्यानें आम्ही वर गेलों त्यापेक्षां अधिक वेगानें खालीं उतरत होतों. आतां एव्हरेस्टचें तोंड पाहण्यासहि डेन्मन तयार होईना. डेन्मन शूर, कठोर निर्धाराचा पण एकदां एखादी गोष्ट डोक्यांत घेतली कीं तिनें वेडा होणारा होता.

आम्ही सर्वजण दार्जिलिंगला परत आलों. डेन्मन आफ्रिकेला परत गेला. १९४८ च्या उन्हाळ्यांत परत तो आला. आतां त्याच्याजवळ अधिक साधनसामग्री होती. पण तिबेटमध्यें जाण्याचा परवाना नव्हता. मला त्यानें पुन्हा बोलाविलें. तथापि मला नकार द्यावा लागला. कारण मागच्या वर्षीं आम्ही बिगरपरवाना, बेकायदा तिबेटमध्यें गेल्याबद्दल माझ्यावर खूप टीका झाली होती. उगीचच भानगड नको म्हणून मीं नकार दिला. डेन्मनला दुसरा कोणी सोबती मिळाला नाहीं म्हणून तो परत आफ्रिकेस गेला. निराश होऊन गेला. मोठा स्वप्नाळू आदमी. त्याच्या निराशेनें मला वाईट वाटलें.

१९४७ च्या एव्हरेस्ट प्रवासाहून परत दार्जिलिंगला येतांच मला आणखी एका गिर्यारोहणाच्या तुकडींत सामील होण्याचें आमंत्रण मिळालें. ही स्विस तुकडी होती. त्यांत मिसेस लोहनर नांवाची एक महिलाहि होती. गढवाल पर्वतराजींतील दुय्यम दर्जाच्या अनेक लहान शिखरांवर पोंचण्याचा आम्ही प्रयत्न करणार होतों. २० हजार फुटांपेक्षां त्यांपैकीं एकहि उंच नव्हतें. तथापि त्यावर अद्याप कोणीं जाण्याचा प्रयत्न केलेला नव्हता. त्यांपैकीं प्रथम केदारनाथवर जाण्यासाठीं आम्ही निघालों.

केदारनाथ शिखराच्या पायथ्यापर्यंत आम्ही पोंचलों. परंतु मी शिखरावर जाणाऱ्या तुकडींत नव्हतों. मिसेस लोहनरबरोबर खालींच थांबण्यास मला सांगण्यांत आलें. माझी निराशा झाली. पण निदान एका चांगल्या माणसाच्या सहवासांत राहण्याची तरी संधि मिळाली. शिखर चढून जाणारी तुकडी निघाली आणि दिवस मावळतीस परत खालीं आली. वर

चढून जात असतां एक वाईट अपघात झाल्याचें त्यांनीं सांगितलें. पर्वत-शिखराजवळील एका हिमटेकडीच्या चढावर ते लोक दोरावरून जोडी-जोडीनें चढत असतांना त्या दोघांचे पाय निसटले आणि ते जवळ जवळ एक हजार फूट खालीं गडगडत येऊन पडले. दोघेहि जिवंत होते. मात्र त्यांना जबर दुखापत झाली होती. त्यांत वांगडी नांवाचा एक शेरपा टायगर होता. तो तिथेंच पडला होता. त्याला तेथेंच तंबूत ठेवण्यांत आलें होतें. कारण त्याला पाठीवर घालून आणण्याइतकी ताकद त्या थक-लेल्या लोकांपैकीं कोणांतहि उरली नव्हती. म्हणून दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी आणि कांहींजण वांगडीला आणण्यासाठीं परत त्या ठिकाणीं गेलों. तेथें आम्ही पोंचलों तेव्हां तो शेरपा जिवंत दिसला. पण त्याच्या मानेवर रक्त वाहणारी एक मोठी जखम पाहिली. आम्ही चकित झालों. चौकशी केली तेव्हां वांगडीनें सांगितलें कीं, आदल्या दिवशीं सायंकाळीं त्याला तेथें एकटे सोडून इतर लोक गेले तेव्हां आपण परत त्याला नेण्यासाठीं येणार आहोंत असें त्यांनीं शेरपाला सांगितलें असलें तरी तो त्या वेळीं अपघातानें इतका घाबरून गेला होता कीं, त्यानें तें ऐकलें नाहीं आणि निराशेनें त्यानें आपल्याजवळील सुरीनें गळा कापून घेण्याचा प्रयत्न केला.

वांगडीला नंतर मसूरीच्या हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत आलें आणि त्याची जखम बरीहि झाली. परंतु त्यानंतर तो कधींच कोणत्याहि स्वारींत पुन्हा गेला नाहीं. त्याच्या मनावर या अपघाताचा फारच वाईट परिणाम झाला होता.

वांगडी हा या तुकडींतील ‘ सरदार ’ होता. ‘ सरदार ’ हा शेरपाच असतो. पण तुकडींतील एक सभासद म्हणून त्याला मानलें जातें; आणि इतर सर्व शेरपांत तो प्रमुख असतो. वांगडीला अपघात होऊन तो परत गेल्यावर मला त्याची ‘ सरदार ’की मिळाली. मला धन्यता वाटली. कारण ‘ सरदार ’ होण्याचा मान मिळणें ही शेरपाच्या जीवनांतील मोठी क्रांति-कारक घटना समजली जाते, परंतु आपल्याच एका शेरपा मित्राला अपघात होऊन त्याची रिकामी जागा मला मिळावी याचा मात्र मला अत्यंत खेद वाटला.

आम्हीं केदारनाथ शिखरावर चढण्यासाठीं पुन्हा प्रवास सुरू केला. परंतु वांगडीला झालेल्या अपघातानें सर्व हताश झाले होते. इतर शेरपांवर तर त्याचा फारच परिणाम झाला होता. म्हणून शिखरावर जाणाऱ्या तुकडींत त्यांच्यापैकीं कोणी आलें नाहीं. चार स्विस आणि मी सज्ज झालों. मजल दरमजल करीत मोठ्या प्रयासानंतर आम्ही केदारनाथ शिखरावरील सपाटीवर अखेर पोंचलों. आम्ही सर्व खुष झालों; या विजयाचा अभिमान वाटला. मी विशेष आनंदलों. कारण आतांपर्यंतच्या पर्वतप्रवासांत थेट पर्वत-शिखरावर पोंचण्याची माझी ही पहिलीच वेळ होती.

केदारनाथनंतर आम्ही सतोपंथ, कालिंदी आणि बालबाला या आणखी तीन शिखरांवर अगदीं टोंकापर्यंत पोंचलों. शेवटच्या शिखरावर ती स्विस बाई—मिसेस लोहनरहि आमच्याबरोबर आली होती. एकाच स्वारींत एकामागून एक अशीं चार पर्वतशिखरें चढून जाण्याचा विक्रम आमच्या तुकडीनेंच प्रथम केला असेल. या प्रवासांत बद्रिनाथ, गंगोत्री आणि कित्येक दुसरीं लहानमोठीं धार्मिक स्थळें पाहण्याची संधि मला मिळाली.

हा पर्वतप्रवास संपवून आमची तुकडी मसूरीला १९४७ च्या उन्हाळ्यांत परत आली तेव्हां तें शहर लष्कराच्या ताब्यांत देण्यांत आल्याचें समजलें. ब्रिटिश हिंदुस्थान सोडून चालले होते. पाकिस्तान व हिंदुस्थान अशी देशाची फाळणी झाली होती; आणि हिंदु-मुसलमानांचे भयंकर दंगे पेटले होते. प्रवासासाठीं वहानें मिळत नव्हतीं. आमच्या तुकडींतील स्विससाहेबांना लष्करी अधिकाऱ्यांनीं लष्करी मोटरमधून दिल्लीला पोंचतें केलें. आम्ही शेरपा मात्र अडकून पडलों. जवळचे पैसे संपत आले होते. माझ्यापाशीं फक्त पंधरा रुपये शिल्लक होते.

शहरांतील प्रमुख लष्करी अधिकाऱ्यास भेटून आमचें गाऱ्हाणें सांगण्यासाठीं म्हणून शेवटीं मी गेलों. आम्ही गिर्यारोहक आहोंत असें त्याला सांगितलें. परंतु आम्ही कोणी तरी राजकीय लोक आहोंत असा संशय येऊन त्यानें मला पकडून ठेवलें. शेवटीं त्याची समजूत काढली तेव्हां त्यानें मला मुक्त केलें आणि एका लष्करी मोटरट्रकमधून आम्हांस डेहराडूनला आणून सोडलें.

गढवाल पर्वतावरील या प्रवासांत जातांना व येतांना आम्हांस खूपच

त्रास झाला, तरी एकंदरीनें प्रवास मजेचा झाला. स्विस गिर्यारोहकांबरोबर पर्वत चढण्याची संधि मिळाली. मला ते लोक खूप आवडले. मला ते आपले साहेब किंवा मालक म्हणून कधींच वाटले नाहींत. मित्र म्हणून ते माझ्याशीं वागले. त्या वेळेपासून आजपर्यंत तेच संबंध कायम आहेत.

१९५३ सालीं एव्हरेस्टविजयानंतर स्वित्झर्लंडला गेलों असतां ही सर्व स्विस मित्रमंडळी विमानतळावर माझ्या स्वागतासाठीं आली होती. त्यांत मिसेस लोहनरहि होती. मीं तिला त्या नांवानें प्रथम हांक मारली. पण नंतर चूक सुधारली. लज्जित होऊन तिला पुन्हा म्हटलें, " मिसेस सटर "... कारण आमच्या तुकडींतील मि. सटरशीं आतां ती विवाहबद्ध झाली होती.

* *

## पवित्र भूमीची यात्रा : १० :

गढवालहून दार्जिलिंगला परत आलों त्या वेळीं माझ्याजवळील पैशाची सारी पुंजी संपली होती. अजूनहि फारसे परदेशी पाहुणे गिर्यारोहणासाठीं येऊं लागले नव्हते, त्यामुळें उद्योग मिळत नव्हता. आंग लहामू नोकरी करीतच होती. पण तिच्या उत्पन्नावर आमचें भागत नव्हतें. माझ्या दोन मुली—पेम पेम व निमा मोठ्या होत होत्या. त्यांचा खाण्यापिण्याचा व कपड्यांचा खर्च वाढला होता. मी अगदीं मेटाकुटीस आलों. वैतागून त्यांना एकदां म्हणालों, " तुम्हाला काय देऊं ? मीं काय करूं ? हें माझें ' टायगर पदक ' घ्या आणि घाला घशांत. " मध्यंतरीं माझ्या सासूचा आजार बळावला आणि त्यांतच शेवटीं ती गेली. जातांना डोळ्यांत अश्रु आणून तिनें आशीर्वाद दिला, " माझ्यावर तुझे फार मोठे उपकार आहेत. परमेश्वर तुला सुखी करील. " तिच्या मृत्यूनंतर माझें नशीब खरोखरच उजळायला लागलें.

१९४८ सालीं प्रो. तुसी नांवाच्या एका इटालियन गृहस्थाबरोबर मीं तिबेटचा प्रवास केला. नऊ महिने आम्ही तिकडे होतों. एव्हरेस्टवरील

माझ्या प्रयत्नांइतकीच तिबेटची ही माझी यात्रा मला अविस्मरणीय वाटते. बौद्धधर्मीयांचें तिबेट हें पवित्र क्षेत्र आहे.

प्रो. तुसी हे कांहीं प्रथमच तिबेटाला जात नव्हते. त्यांची ही आठवी खेप होती. पौर्वात्य कला व वाङ्मयाचे ते गाढे पंडित आणि संशोधक होते. तिबेटी, हिंदुस्तानी, इंग्रजी या भाषा येणारा मदतनीस शेरपा त्यांना बरोबर नेण्यासाठीं हवा होता. या सर्व भाषांचें मला ज्ञान असल्यानें मला आयतीच संधि मिळाली.

प्रो. तुसी मोठा विलक्षण माणूस होता. स्वभावानें तापट, लहरी आणि गंभीर व दुसऱ्याकडून हडसून काम करून घेणारा होता. त्यामुळें इतर शेरपा त्यांना टरकून असत. पण मला मात्र ते आवडत. तुसींनीं तुकडीबरोबर असलेलें सर्व सामान एवढेंच नव्हे तर आपलें खाजगी सामानहि विश्वासानें माझ्या ताब्यांत दिलें होतें. त्यामुळें मी त्यांच्यावर खुष होतों.

आमचा तो प्रवास म्हणजे फिरती शाळा होती. तुसींपासून मी अनेक गोष्टी प्रवासांत शिकलों. तिबेटमध्यें जी जी गोष्ट आम्ही पाहात होतों त्या त्या मागें कांहीं तरी इतिहास असल्याचें तुसींकडून मला समजे. कांचनगंगा पर्वताजवळून आम्ही गेलों. या पर्वताविषयीं मला पूर्वीहि माहिती होती. परंतु त्याच्या नांवाची फोड करून तुसींनीं सांगितली. तेव्हां मला आश्चर्य वाटलें. ‘ कांग ’ ( म्हणजे हिम ), ‘ चेन ’ ( म्हणजे भव्य ), ‘ झोड ’ ( म्हणजे भांडार ) आणि ‘ नगा ’ ( म्हणजे पांच ) या तिबेटी शब्दांचें हें नांव बनलें आहे. म्हणजे ( पंचशिखरांचें ) भांडार असलेलें भव्य हिम ( शिखर ). या पंचशिखरांच्या भांडारांत मीठ, सोनें, शस्त्रास्त्रें, औषधें व धनधान्य आणि धार्मिक ग्रंथ यांचा सांठा आहे असा तिबेटांत समज आहे.

मजल दरमजल करीत आम्ही तिबेटची राजधानी ल्हासाच्या दिशेनें जात होतों. माझें हृदय आनंदानें धडधडूं लागलें. अनेक वर्षांनीं इच्छापूर्ति होणार होती. तिबेट ही आम्हा बौद्धांची पवित्र भूमि; आणि ल्हासा हें तर श्रेष्ठतम पवित्र क्षेत्र. खिश्चन लोकांना जसे जेरुसलेम, मुसलमानांना जशी मक्का तशी बौद्धधर्मीयांना ल्हासा परम पवित्र वाटतें. प्रत्येक बौद्धधर्मीय जन्मांत एकदां तरी तेथें जाऊन येण्यासाठीं धडपडत असतो. माझ्या आईवडिलांना नाहीं तरी मला ती संधि मिळत होती. मी माझ्या मृत

आईवडिलांसाठीं व सासूसाठीं तेथील देवळांतील समईंत गाईचें लोणी घातलें आणि त्यांच्यासाठीं बुद्धाची करुणा भाकली.

मी धर्मश्रद्ध आहें. परमेश्वरावर आणि बौद्धधर्मावर माझा विश्वास आहे. घरीं असतांना प्रार्थनेसाठीं राखून ठेवलेल्या घरांतील खास जागेंत मी रोज प्रार्थना करीत असतों. परंतु मी हेकट सनातनी मात्र नाहीं. कर्म-कांडावर व भोळसट समजुतींवर माझा मुळींच विश्वास नाहीं. भुताखेतांचें अस्तित्व मी मानीत नाहीं. अनेक परधर्मीयांशीं माझा संबंध आला आहे. परंतु माझाच धर्म तेवढा खरा आणि इतरांचा खोटा असें मी कधीं समजत नाहीं. मी कांहीं धर्मपंडित नाहीं. अनेक वंश व राष्ट्रें जगांत जशीं नांदतात तसे अनेक धर्महि एकत्र नांदले पाहिजेत अशी माझी श्रद्धा आहे. पर्वतां-बद्दल जशी माझ्या मनांत भीतिरहित प्रेमाची भावना आहे तशीच परमेश्वराबद्दलहि आहे.

सद्धर्म आणि त्यांचे बाह्याचार यांत नेहमींच प्रत्येक धर्मांत फरक असतो. आमच्या धर्मांतील कांहीं लामा (धर्मगुरु) हे पवित्र आहेत. कांहीं मोठे धर्मपंडित व गूढवादी आहेत. परंतु कांहीं असे असतात कीं, ज्यांना गुरें हांकायचीसुद्धां अक्कल नसते; तथापि लामाचीं वस्त्रें पांघरून ते मिरवीत असतात. कारण कांहींहि उद्योग न करतां जगण्याची ती एक सोपी युक्ति आहे.

एव्हरेस्ट विजयानंतर कांहीं लामा माझ्याकडे आले आणि दार्जिलिंग-जवळील एका मठासाठीं देणगी मागूं लागले. मीं त्यांना साफ नकार दिला. त्यापेक्षां गरीब विद्यार्थ्यांच्या एखाद्या वसतिगृहाला किंवा वाटसरूंसाठीं बांधलेल्या धर्मशाळेला मदत देणें मला अधिक योग्य वाटतें.

तिबेटमध्यें असतांना परमेश्वराच्या थोरवीचें मला नेहमीं स्मरण होत असे. माझ्या वडिलधाऱ्या माणसांसाठीं मी प्रार्थना करीत असें. मी केवळ स्वतःला पुण्यप्राप्ति व्हावी म्हणून नव्हे तर त्यांनाहि पुण्य लाभावें म्हणून परमेश्वराची प्रार्थना करीं.

" ओम मने पद्मे ओम्...ओम मने पद्मे ओम्. "

ही प्रार्थना तिबेटमध्यें सर्वत्र म्हटली जाते. या प्रार्थनेचा शब्दशः

अर्थ, " कमलपुष्पांत रत्न असतें. " असा आहे. पण या प्रार्थनेंत अनेक अर्थ अभिप्रेत असावेत. खऱ्या विद्वान् लामांनाच ते समजतात.

गंगटोकहून निघाल्याला आम्हांला वीस दिवस होऊन गेले होते. वाटेंत अनेक मठ लागले. तुसीसाहेब प्रत्येक मठांत मुक्काम करून जुनीं हस्तलिखितें आणि इतर वस्तु शोधून काढून त्यांचा बारकाईनें अभ्यास करीत. रात्रीं उशीरापर्यंत त्यांचें हें काम चालत असे. त्यांना कोणीं कामाच्या वेळीं त्रास दिला कीं, ते चिडून जात. काम संपलें कीं रात्र असली तर पुढील प्रवासासाठीं बाहेर पडत.

अखेर आम्ही ल्हासाजवळ आलों. दोन्ही बाजूंस असलेल्या लहान लहान टेकड्यांच्या मधील सपाटीवर तें शहर वसलेलें आहे. रस्ते, चौक, बाजार, देवळें आणि शेंकडों माणसें यांनीं तें शहर गजबजलेलें दिसलें. शहराच्या एका टोकास दलाई लामाचें तें पवित्र निवासस्थान—पोताळा—दिसत होतें. मी क्षणभर थांबलों आणि त्याकडे भक्तिभावानें पाहून वंदन केलें.

प्रो. तुसींना ल्हासाचें सरकार ओळखत असल्यानें आमचें तेथें प्रेमानें स्वागत झालें आणि राहण्यासाठीं एक प्रशस्त बंगला आम्हाला देण्यांत आला. आमच्या मुक्कामांत अनेक लोकांनीं आणि सरकारनें आमच्यासाठीं स्वागत-समारंभ केले. माझ्याकडे लोक कुतूहलानें पाहात. मी कोण आहें याचा त्यांना उलगडा होत नसे. शेवटीं मी त्यांना शेरपा असल्याचें सांगितलें आणि त्यांच्याशीं तिबेटी भाषेंत बोलूं लागलों. त्यांना आश्चर्य वाटलें. पर्वत व पर्वत-प्रवासासंबंधींचे अनेक प्रश्न त्यांनीं मला विचारले. त्यांना 'चोमोलुंगमा'—एव्हरेस्ट माहीत होतें. " त्यावर कोणी कधीं पोचूं शकेल, असें आपणांस वाटतें काय ? " असा त्यांनीं प्रश्न विचारला कीं, मी त्यांना उत्तर देई, " मानवाला अशक्य काय आहे ? " त्यावर ते विचारीत, " परंतु चोमोलुंगमावर जायची भीति नाहीं वाटत आपणांला ? तेथें देव-दानव राहतात. " मी उत्तर देई, " मला नाहीं त्यांचें भय वाटत. अहो, रस्त्यावरून साधें चालतांनासुद्धां ठेंच लागून मरण्याची भीति असते. मग पर्वतावर जाण्यासाठीं घाबरण्याचें कारण ? "

एकदां नव्हे तर दोनदां, दलाई लामांना भेटण्याचा सुयोग ल्हासामध्यें आला. त्या वेळीं ते फार तर पंधरा वर्षांचे असतील. पण त्यांचें व्यक्तिमत्त्व

मोठें मोहक आणि जबरदस्त वाटलें. प्रो. तुसी त्यांच्याशीं तासन्‌तास अनेक प्रश्नांवर चर्चा करीत. बाजूला उभे राहून ती ऐकण्याची मात्र मला संधि मिळे. चर्चा संपली कीं निरोप घेतांना दलाई लामा आम्हांला आशीर्वाद देई.

कोणीहि तिबेटी दलाई लामांना त्या नांवानें कधीं संबोधित नाहीं. कारण त्यामुळें त्यांचा अनादर केल्यासारखें होतें. म्हणून ग्याला रिंपोचे हें त्यांचें नांव तेथें प्रचलित आहे. त्याचा अर्थ परमपवित्र बुद्ध.

प्रो. तुसींबरोबर तिबेटमध्यें मीं एक महिना होतों. माझी ही तिबेट-यात्रा मोठी छान झाली. तुसींच्या सहवासांत त्या पवित्र भूमींतील अनेक गोष्टींची मला माहिती झाली. एखादें पुस्तक लिहूं शकेन इतकें ज्ञान तेथील मठांचें मला मिळालें. तुसीनें तर जुनीं हस्तलिखितें आणि इतर अनेक वस्तूंनीं ट्रंका भरून आणल्या होत्या. मींहि अनेक वस्तु मिळविल्या होत्या.

या प्रवासाच्या शेवटीं शेवटीं जी घटना घडली त्यानें तर या प्रवासाची पुरी फलश्रुति झाली. दोन हजार वर्षांपूर्वीं संस्कृतमध्यें लिहिलेल्या एका हस्तलिखिताच्या शोधांत तुसीसाहेब होते. तें एका झाडाच्या आंतील गाभ्यावर लिहिलेलें होतें. तिबेटमध्यें त्याचा तुसीनें खूप शोध केला. तुर्कस्थानांत तें प्रथम दोन हजार वर्षांपूर्वीं लिहिलें गेलें असलें तरी नंतरच्या काळांत तें तिबेटमध्यें आणलें गेलें असावें असें तुसींचें मत होतें. घांगर नांवाच्या एका प्राचीन मठांत तें असावें अशी त्यांची कल्पना होती. आम्ही तेथें गेलों. तेथील लामांना सांगितलें. त्यांनीं जुन्या कागदपत्रांचीं भेंडोळींचीं भेंडोळीं आमच्यापुढें आणून ठेविलीं. रात्रंदिवस त्यांत डोकें खुपसून तुसीसाहेब बसत होते. पण कांहीं पत्ता लागेना. मी निराश झालों. पण तुसीसाहेबांना निराशा माहीत नव्हती. त्यांचा शोध चालूच होता. अखेरीं तें हस्तलिखित अचानक एक दिवस माझ्या हातीं लागलें. तुसीसाहेब आनंदानें बेहद्द खुष झाले.

आपली तिबेट–यात्रा एकंदरींत यशस्वी झाल्यामुळें तुसीसाहेबांनीं आनंदानें आमचा निरोप घेतला. माझीहि ती शेवटची तिबेट–यात्रा ठरली. कारण त्यानंतर चीनच्या कम्युनिस्टांनीं तिबेट ताब्यांत घेतलें. मी सोलोखुंबूमार्गें तिबेटमध्यें परत गुप्तपणें जाऊं शकलों असतों. परंतु माझें नांव आणि माझ्या

पाश्चात्य देशीयांशीं असलेल्या संबंधामुळें आमच्याबद्दल कम्युनिस्टांच्या शंका येऊन त्यांनीं मला तेथून कदाचित् हुसकलें असतें.

## आम्ही शेरपा

माझें घर तरी कोणतें ? तिबेट ही माझी मायभूमि आहे. पण आतां मी तिथें परका आहें. एकेकाळीं सोलोखुंबू हें माझें घर होतें. पण आतां मी तेथें कधींतरी जातों. आज माझें घर खरें पाहिलें तर दार्जिलिंग आहे. माझ्या शेरपा जमातीपैकीं अनेकांचें तें आज नूतन आणि खरेंखुरें घरं बनलें आहे.

आम्हा शेरपांपैकीं बहुतेक लोक अजून सोलोखुंबूंत आहेत. परंतु कांहीं रोंगबुकमध्यें तर कांहीं कालिपांगमध्यें वस्ती करून आहेत. हिंदुस्थानांतील इतर ठिकाणीं व नेपाळमध्येंहि कांहीं लोक विखुरलेले आहेत. परंतु नव्या शेरपा पिढीचें प्रमुख वसतिस्थान दार्जिलिंग आहे. दार्जिलिंगमधील शेरपा सुधारलेले आणि आधुनिक जगांत वावरणारे आहेत.

सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं शेरपा लोकांचा ब्रिटिशांनीं गिर्यारोहणाच्या तुकड्यांतून मदतनीस आणि पोर्टर्स म्हणून प्रथम समावेश केला त्यानंतर १९२० ते १९३० च्या दरम्यान एव्हरेस्टवर गेलेल्या अनेक तुकड्यांतून अधिकाधिक शेरपा लोक सामील होऊं लागले; आणि आतां तर अशी परिस्थिति आहे कीं, शेरपांशिवाय गिर्यारोहणाची तुकडी तयारच होऊं शकत नाहीं, इतकें महत्त्वाचें स्थान त्यांनीं आपणासाठीं निर्माण करून ठेवलें आहे.

आम्ही सोलोखुंबूंत राहात होतों तेव्हां शेती करणें आणि ढोरें सांभाळणें हा आमचा मुख्य व्यवसाय होता. परंतु दार्जिलिंगमध्यें राहणाऱ्या शेरपांचा मुख्य उद्योग आतां गिर्यारोहकांचा किंवा त्यांचे मदतनीस म्हणून काम करण्याचा आहे. गिर्यारोहणाचा मोसम नसतो त्या वेळीं व इतर वेळींसुद्धां निर्वाहासाठीं आमच्यापैकीं बरेचसे लोक चहाच्या मळ्यांत मजुरी करतात. त्यांच्यांतील तगड्या लोकांना वर्षांतून सहा महिने गिर्यारोहणाच्या कामांत

उद्योग मिळतो आणि इतर वेळीं प्रवासी लोकांचे वाटाडे, गुराखी, मजूर म्हणून ते काम करतात. एव्हरेस्टवरील अखेरच्या विजयी स्वारीपूर्वी मींसुद्धां अनेक वेळां हें काम केलें आहे.

आमची जमात मूळ अदिवासींची. आतां आम्ही मोठ्या शहरांत येऊन राहिल्या कारणानें आमच्या राहणींत हळूहळू बदल होत आहे. दार्जिलिंग-मध्यें आम्ही सर्व शेरपा दोन निरनिराळ्या वस्तींत परंतु एकत्रच राहतों. आदिवासींसारखे आमचे कांहीं जीवनव्यवहार अजूनहि सामुदायिक आहेत. एकेका घरांत अनेक शेरपा कुटुंबें राहतात. त्यांचीं स्वयंपाकगृहेंहि समायिक आहेत.

इतर अनेक लोकांप्रमाणें आमची आर्थिक परिस्थिति हलाखीची असते. आम्ही जी कमाई करतों त्यांत आमचें भागत नाहीं आणि बहुतेक सर्वजण कर्ज-बाजारी असतात. परंतु आम्ही सर्व शेरपा एका मोठ्या कुटुंबासारखे एकत्र राहात असल्यानें एकमेकांना नेहमीं साहाय्य करतों.

आमच्यांतील पुष्कळ जुन्या चालीरीति आतां नष्ट झाल्या असल्या तरी अजून कांहीं शिल्लक आहेत. आमच्यांत कुटुंबांतील सर्वांत धाकट्या मुलांना किंवा मुलींना थोरल्यापेक्षां अधिक वारसा मिळकत मिळते. मूल जन्मलें कीं, तिसऱ्या दिवशीं त्याचें बारसें करून नांव ठेवलें जातें. जरूर तर हें नांव पुढें बदलण्याची सवलत ठेविली आहे. घराण्याचें नांवहि (म्हणजे आडनांव) सर्वांत लहान भावंडालाच लावतां येतें.

शेरपा या नांवासंबंधीं लोक पुष्कळच गोंधळ करीत असतात. तें आमचें आडनांव नाहीं, कारण आमच्या नांवापुढें आडनांव लावीत नाहींत. शेरपा लोकांच्या नांवांत आंग हा पुष्कळदां पहिला शब्द लावण्याची पद्धत आहे. स्त्री-पुरुषांच्या नांवापुढें तो सारख्याच अर्थानें वापरतात. आंग म्हणजे प्रिय, लाडका. फू किंवा भू म्हणजे मुलगा, नियमा म्हणजे सूर्य, नॉर्बु म्हणजे रत्न, नामग्याल ( माझे आईवडील या नांवानें मला लहानपणीं हांक मारीत असत ) म्हणजे विजेता. हीं नांवें आमच्यांत पुष्कळदां लावतात, त्याचप्रमाणें वारांचीं नांवेंहि वापरतात. उदाहरणार्थ, दावा म्हणजे सोमवार, पासांग म्हणजे शुक्रवार, पेम्बा म्हणजे शनिवार. निरनिराळ्या कुटुंबांचीं नांवें असतात, तीं स्थळांच्या किंवा एखाद्या कुटुंबांत घडलेल्या महत्त्वाच्या

प्रसंगावरून पडलेलीं असतात. उदाहरणार्थ, माझ्या कुटुंबाचें नांव 'घांग ला' आहे. 'घांग ला' हें एक बौद्ध मठ असलेलें ठिकाण आहे. पूर्वीं एका लढाईत एका राजाच्या बाजूनें आमचे पूर्वज लढले आणि त्यांत विजय मिळाल्यावर त्या राजानें त्यांना 'घांग ला'जवळील जमीन बक्षिस दिली होती म्हणून हें नांव आमच्या कुटुंबानें पुढें धारण केलें. मुर्मी, शेरे, न्हुक्पा, मेंडावा, थाक्टुक्पा हीं अशींच कांहीं कुटुंबनांवें आहेत.

काळेभोर केस, काजळकाळे डोळे आणि नितळ पिवळी-तपकिरी रंगाची कातडी हें शेरपांचें शरीर-वैशिष्ट्य आहे. आमचा चेहरा मंगोलियन घाटाचा असतो. पण तो तिबेटी किंवा चिनी लोकांच्यासारखा मात्र दिसत नाहीं. शेरपांचीं नाकें किंवा डोळे यांत साम्य आढळत नाहीं. बांध्यानें घट्ट व मजबूत परंतु उंचीनें शेरपा खुजा असतो. माझी स्वतःची उंची ५′–८″ आहे व वजन सर्वसाधारणपणें १६० पौंड असतें. सर्वसामान्य शेरपापेक्षां मी उंच व किरकोळ वाटतो.

दार्जिलिंगमध्यें राहणाऱ्या शेरपा स्त्रिया जुन्या पद्धतीप्रमाणें एक प्रकारचा दाट रंगाचा व अंगाबरोबर गुंडाळलेला झगा आणि त्यावर लोकरीची विणलेली, उभे चकचकीत रंगाचे पट्टे असलेली ओढणी वापरतात. पुरुषांचा पोशाख पाश्चात्य खेळाडूंच्या पोशाखासारखा – स्वेटर्स, स्पोर्ट शर्टस, निकर्स-बहुधा असतो. ज्यांना शक्य असेल ते पाश्चिमात्य पद्धतीचे बूट वापरतात. इतर तिबेटी पद्धतीचे फेल्ट बूट वापरतात. डोक्यावर लांब केस वाढविण्याची पुरुषांत पद्धत आहे. मी स्वतः कधीं हिंदी पद्धतीचा शेरवाणी आणि चुणीदार पायजमा—तर कधीं स्विस किंवा ब्रिटिश खेळाडूंसारखे कपडे वापरतों.

शेरपांची शरीरयष्टि कणखर, विशेषतः पाय काटक व पाठ मजबूत असते. त्यांना डोंगरपर्वताविषयीं स्वाभाविक आवड असते. गिर्यारोहणाच्या कामांतील यश आम्हांस यामुळेंच मिळालें आहे. आम्ही कोणतेंहि अन्न पचवूं शकतों, त्याचाहि आम्हांस या कामीं उपयोग होतो. बटाटे, मांस, भाज्या, भात हें आमचें खरें अन्न. परंतु पर्वतप्रवासांत ताजें किंवा वाळविलेलें डब्यांतील अन्न, यांपैकीं जें मिळेल तें खातों. त्यामुळें साहेब लोकांना आमच्या जेवणाची चिंता करावी लागत नाहीं.

चहा हें शेरपांचें मुख्य पेय. इंग्रजांप्रमाणें मिळेल तेवढा चहा आम्ही घेत असतों.सोलोखुंबूंत असतांना जुन्या पद्धतीप्रमाणें गाईच्या दुधाची साय व लोणी मिसळून आम्ही चहा घेत होतों. पण दार्जिलिंगमध्यें साहेबांच्या पद्धतीप्रमाणें दूध मिसळून घेतों. अधिक कडक पेय हवें असेल तेव्हां चँग नांवाची तांदूळ किंवा बार्लीपासून गाळलेली दारू पितों. ही दारू घरींच तयार केली जाते. बाटलींतून किंवा ग्लासांतून ती आम्ही पीत नाहीं. एका थाळींत ओतून घरांतील सर्वजण एकत्र बसून बांबूच्या नळीनें ती पिण्याचा आमचा रिवाज आहे. पाहुणे आले तरी त्यांना याच पद्धतीनें दारू देतों. त्यांनीं पोटभर दारू प्यावी म्हणून आमचा आग्रह असतो. आलेल्या पाहुण्यानें निदान तीनदां तरी दारू किंवा चहा घेतला पाहिजे, त्यानें त्यास नकार देणें असभ्यपणाचें समजलें जातें. शेरपा लोक दारू पीत असले तरी त्यानें झिंगून पडत नाहींत. मित प्रमाणांत पितात. मी चँग आणि कधीं कधीं विलायती दारूहि पितों. सिगरेटहि ओढतों. परंतु या दोन्हीहि संवयी मीं काबूंत ठेवल्या आहेत. विशेषतः पर्वत-प्रवासास जाण्यापूर्वीं आणि प्रवासांत मी या वस्तूंना शिवत नाहीं.

शेरपांना प्रवासाची अत्यंत हौस असते. आम्ही डोंगरपर्वतांत राहणारे असल्यानें प्रथम थोडे लाजाळू आणि इतर लोकांत मिसळण्यास भिणारे होतों. परंतु आतां नवीन नवीन परकी लोकांत मिसळतों; ओळखी करून घेतों. पत्त्यांतील 'गेम ऑफ चान्स' हा आमचा आवडता खेळ. इतर मैदानी खेळ आम्ही विशेष खेळत नाहीं. कारण पर्वत चढण्याचें परिश्रमाचें काम केल्यावर असे खेळ खेळण्यापेक्षां कमी श्रमाचे बैठे खेळ खेळून करमणूक करून घेणें आम्हांला अधिक पसंत पडतें. घोड्यावरून दौड करण्याची आमच्यापैकीं कांहींना आवड आहे. मींहि एक घोडा ठेवला आहे.

इतर कोणत्याहि आशियाई देशांतील स्त्रीपेक्षां आमच्यांतील स्त्री अधिक स्वतंत्र आणि स्वावलंबी आहे. आम्ही आमचीं कामें बरोबरीनें करतों. घरांत तर त्यांचीच हुकमत चालते. परंतु चूल आणि मूल यांतच त्यांचें जीवन कोंडलेलें नसतें. पुरुषांबरोबरीनें बाहेरचीं कामेंहि त्या करतात. आंग ल्हामू तरुणपणीं दार्जिलिंगमध्यें रस्त्यांतील हमालाचें काम करीत असे. गिर्यारोहकांच्या तुकड्यांतूनहि शेरपाणी ( शेरपा स्त्रिया ) पोर्टर्स म्हणून

अनु. क्र. २३३८३ दि: ...
क्रमांक ... ६५६ ... नों: दि: ...

पुष्कळ वेळां जात असतात. शेरपाणी अंगकाठीनें लहान पण कमालीच्या काटक व मजबूत असतात. आपल्या वजनाच्या दोनतृतीयांश वजन त्या सहज उचलूं शकतात.

आमच्या जमातींत घटस्फोटाची परवानगी आहे. नवरा किंवा बायको यांपैकीं कोणासहि घटस्फोट हवा असेल तर त्यानें दुसऱ्याला त्याबद्दल कांहीं पैसे द्यावे लागतात. आम्ही मूळचे ज्या तिबेटचे तेथें शेरपा लोकांत बहुपत्नित्वाची व बहुपतित्वाची चाल रूढिमान्य आहे. परंतु सोलोखुंबू किंवा दार्जिलिंगमध्यें राहणाऱ्या शेरपांत ही चाल आतां मुळींच राहिलेली नाहीं. आमच्या जमातींतील नवरा-बायकोंत इतकी समानता आहे कीं, एका बायकोला एक नवरा आणि एका नवऱ्याला एक बायको सांभाळतां सांभाळतां नाकीं दम येतो.

शेरपा मुलांच्या शिक्षणाची सोय आतां थोडी होऊं लागली आहे. पूर्वीं मठांतून जें शिक्षण मिळेल तेवढेंच. आतां दार्जिलिंगमधील नेपाळी शाळांत व नुकत्याच निघालेल्या शेरपा शाळेंत आमचीं मुलें जाऊं लागलीं आहेत. लहानपणीं मला शिक्षण घेण्याची संधि मिळाली नाहीं. ही माझ्या जीवनांतील एक मनोव्यथा आहे. माझ्या मुलींना——पेम पेम व निमा यांना आतां मी शिक्षण देऊं शकतों याचें मला समाधान वाटतें.

तरुण शेरपा मुलांना मात्र आमच्या जुन्या चालीरीति व धर्म यांचा गंध नाहीं. शेरपा भाषाहि त्यांना विशेष बोलतां येत नाहीं. शाळांतून मिळणाऱ्या शिक्षणामुळें नव्हे तर चित्रपटामुळें त्यांचीं मनें तयार होत आहेत. मी स्वतः फारसे चित्रपट पाहात नाहीं. आमच्या लोकांत परिवर्तन होत आहे. त्यामुळें आमच्या तरुणांवर कांहीं वाईट संस्कार होत असले तरी त्याचा खेद होत नाहीं. कारण संक्रमणावस्थेंत असें थोडेसें होणारच.

शेरपा लोकांतील मुख्य सण व समारंभ इतरांप्रमाणेंच वाढदिवस, विवाह आणि मृत्यु यांवर आधारलेले असतात. मोठ्या माणसाच्या मृतदेहाचें दहन करण्याचा आणि बालकांचें दफन करण्याचा आमच्यांत रिवाज आहे. पर्वतावर मृत झालेल्याचें शव पुरण्यांत येतें. दार्जिलिंगमधील आमच्या वस्तींत एक लहानसें मंदिर आहे. तेथें माणसाच्या दुप्पट उंचीचें एक भलें मोठें प्रार्थनाचक्र आहे. मृतमाणसाप्रीत्यर्थ मंदिरांत प्रार्थना म्हटली जाते

व तें चक्र फिरविलें जातें. वस्तींत नवीन बालक जन्मलें तर त्यासाठींहि या प्रार्थनाचक्राला गति देऊन बालकासाठीं परमेश्वराची प्रार्थना म्हटली जाते.

गिर्यारोहकांच्या तुकडींत शेरपांकडे काय काम असतें याची लोकांना निश्चित कल्पना नसते. वाटाड्याचें किंवा गिर्यारोहणाचें शिक्षण देण्याचें काम आम्ही करीत नाहीं. कारण हिमालयांत जाणाऱ्या तुकड्यांत वाटाडे असे कोणी नसतात. शिक्षण देण्याचाहि प्रश्नहि नसतो. कारण गिर्यारोहणाच्या तुकडींत सामील झालेले सर्वजण बहुतेक तरबेज गिर्यारोहक असतातच. आम्ही प्रथम या क्षेत्रांत नवखे होतों तेव्हां पर्वतावर बोजा वाहून नेण्याचें ' कुली 'चें काम करीत होतों. आम्हाला कोणी, विशेषत: साहेब लोकांनीं ' कुली ' म्हटलेलें आवडत नाहीं, आम्हाला त्या नांवाची चीड येते. कारण त्यांत गुलामीचा अर्थ अभिप्रेत आहे. आतां मात्र या नांवानें आम्हांस कोणी ओळखत नाहीं. पर्वतांवर चढणारे कसलेले गिर्यारोहक म्हणून आतां लोक आम्हांस ओळखूं लागले आहेत.

याचा अर्थ पर्वतावर ओझें वाहून नेण्याचें काम आम्ही करीत नाहीं असें नाहीं. आम्हाला त्या कामाचा उलट अभिमान आहे. जगांतील कोणत्याहि गिर्यारोहकांपेक्षां आम्ही पाठीवरून अधिक वजन वाहून नेऊं शकतों. कांहीं गिर्यारोहणाच्या स्वाऱ्यांचा अपवाद केला तर आम्ही प्रत्येक महत्त्वाच्या स्वारींत पर्वतावर सर्वांत उंच ठिकाणीं सामानासह जाऊन छावण्या ठोकल्या आहेत व कांहीं वेळीं तर साहेब लोकांबरोबर गिरिशिखरावरहि पोचलों आहोंत.

अलीकडच्या काळांतील अनुभवानें आतां आम्हांस गिर्यारोहणाच्या निरनिराळ्या पद्धति व तंत्र चांगलेंच अवगत झालें आहे. पर्वतावरील नवे नवे मार्ग शोधून काढणें, बर्फाच्या कपारींत दोर ठोकणें, कुऱ्हाडीनें बर्फ काढून चढण्यासाठीं पायऱ्या खोदणें, छावण्यांसाठीं योग्य जागा शोधून काढणें या बाबतींतहि साहेब लोकांना आमची खूप मदत होते.

गिर्यारोहणाच्या साहसांत शेरपा पूर्वींपासून म्हणजे १९०० सालापासून भाग घेत आहेत. त्या वेळीं मोठमोठ्या शिखरांच्या शोधासाठीं प्राथमिक प्रयत्न सुरू होते. १९२० सालच्या सुमारास एव्हरेस्टवर झालेल्या स्वाऱ्यांत यांनीं २७ हजार फूट उंचीपर्यंत सामानसुमान वाहून नेलें आहे. केवळ

एक धंदा म्हणून शेरपा या साहसांत भाग घेत होते असें म्हणणें चूक आहे. कारण १९३० सालच्या सुमारास साहेब गिर्यारोहकांबरोबर अगदीं गिरिमाथ्यापर्यंत जाण्याचें धाडसहि त्यांनीं केलें आहे. टायगर लेवा व त्सिनाबो हे त्यांपैकीं पहिले गिर्यारोहक शेरपा होत. जॉनसांग शिखरावर ते गेले होते. त्यानंतरच्या काळांत कॅमेट, $K_2$, कांचनगंगा, नंगा पर्वत, नंदादेवी, अन्नपूर्णा इत्यादि पर्वतावरील आरोहणांत त्यांनीं भाग घेतला आहे. जगांतील दुसऱ्या क्रमांकाचें उंच गिरिशिखर $K_2$ वर १९३९ सालीं एका अमेरिकन गिर्यारोहकाबरोबर पासांग दावा लामा हा शेरपा चढून गेला होता. माथ्याच्या फक्त ७५० फूट खालींपर्यंत तो पोंचला होता. नंतर १९५४ सालीं तोच शेरपा जगांतील सातव्या क्रमांकाचें चो ओय् शिखर चढून गेला. गिर्यारोहणाच्या साहसांत कित्येक शूर शेरपांचें बलिदान झालें आहे. मला त्यांचें सतत स्मरण होतें. इतर देशांतील हिमालयांतील गिर्यारोहकांपेक्षां शेरपांचें बलिदान मोठें आहे. १९२२सालीं एव्हरेस्टवर सात, १९३४ व १९३७ सालीं नंगा पर्वतावर पंधरा आणि याशिवाय इतर बहुतेक सर्व पर्वतांवरील प्रयत्नांत प्रत्येकीं एकदोन शेरपा तरी मरण पावले आहेत. बहुतेक हे सर्व मृत्यु अपघातांत घडले असले तरी त्यांपैकीं कांहीं शेरपांनीं आपल्या गिर्यारोहक बांधवांना वांचाविण्यासाठीं किंवा त्यांच्याबरोबरीनें शेवटपर्यंत राहतांना त्यागपूर्वक पत्करले आहेत. नंगा पर्वतावर मर्कलबरोबर मृत्यु पावलेला ग्यायली व $K_2$ वर वूल्फबरोबर बेपत्ता झालेला किकुली हीं दोन यांतील तेजस्वी उदाहरणें आहेत.

या शूर शेरपांचें स्मरण झालें कीं, त्यांच्यापैकींच मी एक आहें या जाणिवेनें अभिमान वाटूं लागतो. केवळ कांहीं रुपड्यांसाठीं व आर्थिक गरजेपोटीं शेरपा पर्वतप्रवासाचें साहस करतात असें कोणी म्हणूं शकेल काय?

★ ★

नंगा पर्वत नागवा मात्र नाहीं. कारण तो खूप दाट बर्फानें आच्छादित आहे. इतका कीं, त्याच्यावरील खडकांचा व कडेकपारींचा मूळ आकार लक्षांत येत नाहीं. त्याला 'पर्वत राक्षस' म्हणावयास हरकत नाहीं. एव्हरेस्टवर अनेकदां प्रवास केलेल्या मलासुद्धां हा पर्वत दानवासमान भासतो. तसा तो फार उंच नाहीं. २६, ६६० फूट उंच. म्हणजे जगांतील नवव्या क्रमांकाचा पर्वत तो आहे. परंतु सिंधु नदाकडे तोंड असलेली त्याची बाजू जगांत सर्वांत उंच आहे असें म्हणतात. १९५० सालीं मी या पर्वतावर गेलों होतों. त्या वेळचा आमचा प्रयत्न फसला. मला वाटलें हा पर्वत कोणीच चढून जाऊं शकणार नाहीं.

परंतु १९५३ सालीं मि. हरमन बहल हा ऑस्ट्रियन गिर्यारोहक शेवटीं या पर्वताच्या शिखरावर एकटा चढून गेला. त्या आधीं १८९५ पासून सात वेळां नंगा पर्वताच्या शिखरावर पोंचण्याचे प्रयत्न झाले; पण ते सर्व अयशस्वी तर झालेच, परंतु भयंकर दुःखकारकहि ठरले. कारण त्यांत एकूण एकतीस गिर्यारोहक बळी पडले.

१८९५ची नंगा पर्वतावरील पहिली स्वारी एक इंग्रज गिर्यारोहक मि. ममरी यांनीं आपल्या दोन इंग्रज मित्रांच्या व दोन गुरख्यांच्या साहाय्यानें केली. २२ हजार फूट उंचीपर्यंत ते पोंचले. पण पुढें एका बर्फाळ खिंडींतून जात असतांना हिमराशीखालीं चेंगरून ते मरण पावले असें म्हणतात. त्यानंतर सदतीस वर्षें त्या पर्वतावर जाण्यास कोणी धजावलें नाहीं. नंतर १९३२ सालीं एका जर्मन व अमेरिकन तुकडीनें दुसरा प्रयत्न केला. २३ हजार फुटांपर्यंत ते पोंचले. परंतु भयंकर वादळ व दाट बर्फामुळें त्यांना परत फिरावें लागलें. सुदैवानें या स्वारींत कोणी दगावलें नाहीं.

१९३४ सालीं जर्मन गिर्यारोहकांनीं शेरपांच्या साहाय्यानें तिसरा प्रयत्न केला. या वेळींच तो दुर्दैवी अपघात झाला. कमींत कमी पंधरा जणांचा तरी बळी या अपघातानें घेतला असावा. त्यांत कित्येक शेरपा होते. विली मर्केल व शेरपा ग्यायली या प्रयत्नांतच मृत्यु पावले. १९३७ सालीं पुनश्च जर्मन गिर्यारोहक व शेरपा त्या पर्वतावर गेले होते. या वेळीं तर सोळा जणांना अपघाती मृत्यु आला. सात जर्मन व नऊ शेरपा. एका रात्रीं ते सर्वजण पर्वताच्या पूर्वेकडील भिंतीखालीं तंबू ठोकून झोपले होते. झोपेंत

असतांनाच एक प्रचंड हिमराशी कोसळत खालीं आली आणि ते सोळाहि गिर्यारोहक त्याखालीं गाडले गेले व त्यांना चिरनिद्रा मिळाली. पुढें त्या वर्षीच्या उन्हाळ्यांत या तुकडीचा शोध करण्यासाठीं आलेल्या लोकांना हे सर्व गिर्यारोहक मृतावस्थेंत पण जणू शांतपणें निद्रा घेत असल्यासारखे सांपडले.

त्यानंतर १९३८ व १९३९ सालीं पुन्हा जर्मन गिर्यारोहकांनीं या पर्वत-शिखरावर पोचण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या मदतीला कोणी शेरपा येण्यास तयार झाला नाहीं, म्हणून शिखरावर पोचणें त्यांना शक्य नव्हतें. त्यानंतरच्या दहा वर्षांत नंगा पर्वतावर एकहि स्वारी झाली नाहीं.

नंगा पर्वतावर मी कधींच गेलों नव्हतों. १९५० सालीं ती संधि मिळाली. तीहि अचानकच. झेमू ग्लेशियरवर ज्याच्याबरोबर मी १९४६ सालीं गेलों होतों त्या कॅप्टन थॉर्नलीच्या नेतृत्वाखालीं एक मोठी तुकडी काराकोरम रेंज, पश्चिम तिबेट आणि अफगाणिस्तान-रशियाच्या हद्दीवरील पर्वत-राजींत प्रवास करण्यासाठीं संघटित झाली होती. मला तुकडींत सामील होण्याचें निमंत्रण आलें तेव्हां माझ्या शरीरांतील रक्त जणू उसळून आलें. एक वर्षापेक्षां अधिक काळ हा प्रवास होणार होता. अर्थात्‌च आंग लहामूला — माझ्या पत्नीला माझें जाणें पसंत नव्हतें.

आम्ही ज्या मुलखांत जाणार होतों तो पाकिस्तान, अफगाणिस्तान, तिबेट व रशियाच्या हद्दीवरील भाग होता. अगदीं आयत्या वेळीं पाकिस्तान सरकारनें आम्हांस आपली सरहद्द ओलांडून जाण्यास मनाई केली. कारण रशियन हद्दींत शिरल्यावर आम्हांला तेथील सरहद्दीवरील सैनिक आडवतील व उगीच कांहींतरी आंतरराष्ट्रीय कटकट उद्‌भवेल अशी पाकिस्तानला भीति वाटली. आमचा फारच विरस झाला. परंतु आमच्या तुकडीच्या नेत्यानें – मि. थॉर्नलीनें आपण आतां इकडे आलोंच आहोंत तर नंगा पर्वतशिखरावर जाण्याचा प्रयत्न करूं असा आग्रह धरला.

परंतु आमचा नंगा पर्वतावरील हा प्रयत्न निष्फळ ठरेल अशी मला व इतरांनाहि भीति वाटत होती. कारण एक तर नोव्हेंबरचा हिंवाळा सुरू झाला होता आणि गिर्यारोहणासाठीं लागणारी साधनसामग्री व माणसें आमच्याजवळ अगदींच कमी होतीं. परंतु थॉर्नली आपला आग्रह सोडावयास तयार होईना.

म्हणून आम्हीं पर्वतावर जाण्याचा निर्णय घेतला. आम्हाला त्या पर्वताच्या उंचीची भीति वाटत नव्हती. परंतु तेथें घडलेल्या दुर्दैवी अपघातांचें विस्मरण होणें कसें शक्य होतें? बर्फाळ हवेसुळें कडाक्याची थंडी पडली होती. भर नोव्हेंबरचा हिंवाळा होता. अशा परिस्थितींत पर्वतावर चढून जाणें निव्वळ वेडेपणाचें होतें याबद्दल मला शंका नव्हती. परंतु आमचा प्रवास चालूंच होता. जोराचा वारा घोंघावत होता. बर्फाच्या वादळानें समोरचें सुद्धां दिसत नव्हतें. तरीहि आम्ही वर, आणखी वर जात होतों. पर्वतमाथ्याच्या पायथ्याशीं आम्ही मोठ्या प्रयासानें येऊन पोचलों आणि तेथें पहिली छावणी टाकली. मला वाटलें आतां यापुढें थॉर्नली आणि इतर साहेब जावयास धजणार नाहींत. पण छे, थॉर्नली म्हणाला, "आपण शेवटपर्यंत गेलें पाहिजे." थॉर्नली हा एक प्रचंड निर्धारी माणूस होता. जेवढे म्हणून अधिक कष्ट आणि संकटें तेवढी त्याची शक्ति वाढत असावी. त्याच्याइतका कणखर व दणकट गिर्यारोहक मीं उभ्या आयुष्यांत कधीं पाहिलेला नाहीं.

थॉर्नली, मार्श व केस असे तीन साहेब शिखरावर जाण्यासाठीं निघाले. कोणीहि शेरपा त्यांच्याबरोबर जाण्यास तयार झाला नाहीं. मी जावयास निघालों तर त्यांनीं मला जाऊं नको म्हणून विनविलें. मी या स्वारींत सरदार म्हणून काम करीत होतों. म्हणून साहेबांना एकटे सोडून आपण मागें राहणें मला पसंत नव्हतें. माघार घेणें मला आयुष्यांत माहीत नाहीं. मला त्याचा तिरस्कार आहे. म्हणून मीं शेरपांना सांगितलें कीं, तुम्ही मागें थांबा, मी त्या तिघांबरोबर जातों. पण ते ऐकेनात. रडूं लागले. माझा अगदीं नाइलाज झाला.

आम्ही पायथ्याशीं थांबलों आणि ते तिघे वर गेले. दोन दिवसांनीं मार्श खालीं उतरतांना आम्हीं पाहिला. पण एकटाच. त्याचा पाय भयंकर सुजला होता; चालतां येत नव्हतें म्हणून तो माघारी आला होता. आतां मार्श, मी आणि इतर शेरपा उरलेल्या आमच्या दोन शूर सहकाऱ्यांची— थॉर्नली व केसची प्रतीक्षा करीत पायथ्याखालीं थांबलों. दूरपल्ल्याच्या दुर्बिणींतून आम्ही ते दोघे वर कसे चढत आहेत तें पाहात होतों. १८ हजार फूट उंचीपर्यंत ते गेलेले आम्हीं पाहिले. त्यानंतर ते दिसेनासे झाले.

आम्ही सचिंत झालों. त्याच रात्रीं माझ्या स्वप्नांत ते दोघे आले. नवे कपडे घालून माझ्याकडे थॉर्नेली व क्रेस येत होते. त्यांच्या आजूबाजूला अनेक लोक दिसत होते. पण त्यांच्या धडावरील मस्तकें मात्र अदृश्य होतीं. माझा स्वप्नावर विश्वास नाहीं. परंतु आमचे लोक म्हणतात कीं, असें स्वप्न फार अशुभ असतें. माझें मन चर्रर्र झालें.

दुसऱ्या दिवशीं सबंध दिवस आम्ही थॉर्नेली व क्रेसच्या वाटेकडे डोळे लावून बसलों होतों. पण व्यर्थ. शेवटीं मार्शे, मी व अजिबा नांवाचा एक शेरपा या तिघांनीं त्या दोघांच्या शोधासाठीं पर्वतमाथ्यावर जावें असें ठरलें. मार्शेचा पाय अद्याप सुजलेलाच होता; त्यास मीं येऊं नको म्हटलें. पण तो कसला ऐकतो !

वर जाण्याचा मार्ग अतिशय कठीण होता. बर्फाचे ढीगच्या ढीग रस्त्यावर पडले होते. ते ओलांडून आम्ही महत्प्रयासानें एकेक पाऊल टाकीत होतों. अधिक पुढें जाणें केवळ अशक्य आहे असें मनाशीं म्हणत होतों. तरी पुढें वाटचाल करीतच होतों.

कमालीची थंडी होती. –४० फॅ. अंशाखालीं हवामान गेलें होतें. बर्फानें तंबूचें कापड, दोर पोलादासारखे कडक झाले होते. एक सेकंद चुकून आमचा हात बाहेर राहिला असता तर त्याचें लाकूड झालें असतें.

रात्र झाली आणि कसेबसे सरपटत आम्ही तंबूत शिरलों. स्टोव्ह मोठ्या कष्टानें पेटवला. चहा करण्यासाठीं एका भांड्यांत बर्फ वितळविला; पण तो वितळला नाहीं तोंच पुन्हा थिजला. भयंकर सोसाट्याचा वारा वाहात होता. तंबू जोरानें गदगदूं लागला आणि त्याच्या एका फटींतून बर्फाचा झोत जोरानें आंत घुसला. आमचें सारें शरीर त्यानें पांघरून टाकलें. थोड्याच वेळानें आमच्या शरीराखालील बर्फाच्या जमिनींतून तडे गेल्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. हिंवाळ्याच्या दिवसांत जमिनीवरील बर्फ अधिकच घट्ट आकसतें आणि तें आकसतां आकसतां जमिनीवरील बर्फाच्या जाड थराला मोठमोठीं भगदाडें पाडतें. असेंच एखादें भगदाड पडून आम्ही आमच्या तंबूसकट त्यांत गडप होतो कीं काय या भीतीनें आम्ही गांगरून गेलों होतों.

आमचा स्वतःचाच जीव अशाप्रकारें मृत्यूच्या उंबरठ्यावर उभा होता

तरी थॉर्नेली व केसचें काय झालें असेल या विचारानें आमचें मन विषण्ण झालें होतें. तंबूमध्यें अंथरुणावर पडल्या पडल्या मार्श म्हणाला, “ आजचा दिवस कोणता आहे माहीत आहे ? ” मीं म्हटलें, “ नाहीं. ” त्यावर तो उत्तरला, “ आज क्रिसमस आहे. ”

सकाळ झालीं त्या वेळीं तर अधिकच कडाक्याची थंडी होती. सकाळचा चहा करायला तासन् तास लागले. तोंडांतील वाफ बाहेर पडली कीं, तिचें हिमकणांत ताबडतोब रूपांतर होऊन ते पुन्हा आमच्या नाकातोंडावर उडून येऊन बसत होते. अशाच परिस्थितींत आम्ही तंबूबाहेर पडलों. बाहेर बर्फाच्या राशीच्या राशी रस्त्यांत उभ्या होत्या. त्या ओलांडून आम्ही जाऊं लागलों; पण अशक्य. तब्बल एक तास आम्ही जात होतों. फक्त १५० फूट आम्ही जाऊं शकलों. मार्शचे पाय अगोदरच सुजले होते. तो एक पाऊल पुढें टाकूं शकत नव्हता. मी व अजिबाहि थकलों होतों. आम्ही थांबलों आणि पुढें आणखी वर जाण्याचा नाद सोडून दिला. समोर तें भव्य आणि भयंकर नंगा पर्वताचें शिखर दिसत होतें. थॉर्नेली व केस कोठें असतील ? त्यांना जोरानें ओरडून हांक मारावी असें मनांत आलें ! पण जीवांत त्राण शिल्लक नव्हतें. आम्ही परत फिरलों. त्या दोन शूर मृत गिर्यारोहकांना तेथेंच टाकून आम्हीं नंगा पर्वत सोडला.

गिलगीटला आल्यावर लष्करानें आपलें विमान आम्हांस दिलें. त्यांतून आम्ही त्या दोघांचा थांगपत्ता लागतो आहे का हें पाहण्यासाठीं त्या नंगा पर्वतावर घिरट्या घातल्या. पण हाय ! आम्हांला कांहींहि दिसलें नाहीं. मीं व मार्शनें एकमेकांचा निरोप घेतला. एकमेकांना आलिंगन दिलें. दोघांचे कपडे अश्रूंनीं ओलेचिंब झाले !

* *

## आणखी दोन साहसें : १३ :

शेरपा लोकांत अशी एक समजूत आहे कीं, स्त्रीच्या आयुष्यांतील वयाचीं २० ते ३० व पुरुषाच्या आयुष्यांतील वयाचीं ३० ते ४० हीं वर्षे कठीण

असतात. याच काळांत त्यांच्या जीवनांत बऱ्या किंवा वाईट घटना घडत असतात. नंगा पर्वतावर मी गेलों तेव्हां जीवनाच्या या टप्प्यावर मी होतों. या काळाची सुरुवात कठीण प्रसंगांनीं झाली होती. कारण या वेळीं मीं जो पर्वत-प्रवास केला त्यांत माझ्या आयुष्यांत प्रथमच गिर्यारोहणांतील अपघाती मृत्यु घडले; आणि दुसऱ्याच वर्षी अशा प्रकारचे आणखी दोन प्रसंग आले. लागोपाठ तीन दुर्दैवी घटना घडाव्यात हें कांहीं शुभलक्षण नव्हतें. मात्र या तीनहि प्रसंगांतून मी सहीसलामत बाहेर आलों. १९५२ पर्यंत या दुर्दैवी घटना घडत होत्या. त्यानंतर मात्र माझ्या नशिबाला एकदम चांगली कलाटणी मिळाली.

युद्ध संपल्यावर प्रथमच १९५० सालीं परदेशी गिर्यारोहकांच्या तुकड्या पुन्हा येऊं लागल्या. त्या प्रत्येक तुकडींत आपण असावें असें मला वाटत असे. पण तें शक्य नव्हतें. १९५० सालीं एक फ्रेंच तुकडी अन्नपूर्णा हिमशिखरावर चढून गेली. ज्याच्या शिखरापर्यंत माणूस पोचला होता असा अन्नपूर्णा हा त्या वेळचा सर्वांत मोठा हिमपर्वत होता. या साहसांत आपण असतों तर बरें झालें असतें असें मला राहून राहून वाटलें. याच वर्षी नेपाळमार्गें दक्षिण बाजूनें मि. टिलमन वगैरे अमेरिकन गिर्यारोहकांनीं एव्हरेस्टवर जाण्याचा प्रयत्न केला. त्यांत आपण सामील झालों असतों तर किती बरें झालें असतें असें मला वाटलें. मि. शिप्टनच्या नेतृत्वाखालीं १९५१ सालीं एव्हरेस्टवर आणखी एक स्वारी झाली. त्या वेळींहि माझ्या त्या लाडक्या गिरिशिखरावर जाण्याची संधि मला मिळाली नाहीं.

कारण एका फ्रेंच तुकडीबरोबर मी त्याच वेळीं नंदादेवी पर्वतावर जाण्यास निघालों होतों. या पर्वतशिखराचे दोन भाग आहेत. एक नंदादेवी व दुसरें पूर्व नंदादेवी. या दोन्ही शिखरांवर १९३६ व १९३९ सालीं टिलमन व कांहीं पोलिश गिर्यारोहक पोचले होते. परंतु एकाच वेळीं एकाच तुकडीनें या दोन्ही शिखरांवर विजय मिळविला नव्हता. आमच्या फ्रेंच तुकडीचा तो उद्देश होता; आणि या दोन्ही शिखरांना जोडणाऱ्या एका उंच व अरुंद हिमपर्वत रांगेवरून एका शिखरावरून दुसऱ्यावर जाण्याचें भयंकर धाडस व विक्रम करण्याची आमची इच्छा होती.

नंदादेवी पर्वताचें मुख्य शिखर २५,६६० फूट व पूर्व नंदादेवीचें

शिखर २४,४०० फूट उंच होतें; आणि दोन्ही शिखरांना जोडणारी जी करवतीच्या पात्यासारखी अत्यंत अरुंद पर्वतसाखळी होती तिची लांबी दोन मैल आणि उंची २३ हजार फूट होती. यावरून आम्ही किती धोक्याच्या आणि भयंकर साहसावर निघालों होतों हें लक्षांत येईल.

नंदादेवी ! त्याला ' पवित्र पर्वत ' किंवा ' दिव्य देवता ' म्हणतात. मीं तो पर्वत पूर्वी जेव्हां एकदां दुरून पाहिला होता तेव्हां त्याच्या मोहक सौंदर्यानें भारून गेलों होतों. परंतु तो जसा सुंदर होता तसा प्रचंड आणि भयप्रद होता. परंतु आमच्या तुकडीतील फ्रेंच आणि विशेषतः तिचा नेता मि. ड्यूप्लाट याला आपण या साहसांत यशस्वी होऊं अशी आशा वाटत होती. मुख्य पर्वतशिखराच्या पायथ्यापासून आम्ही वर चढूं लागलों. हवा चांगली होती. एकामागून एक छावण्या टाकीत आम्ही वेगानें वर जात होतों. प्रथम मोठें व मुख्य नंदापर्वत-शिखर चढून जावयाचें आणि त्यानंतर मधील पर्वतरांगांची साखळी पार करून दुसऱ्या शिखराच्या उतारावर पोचावयाचें आणि तेथून मग तें शिखर चढूं लागावयाचें अशी मि. ड्यूप्लाटची योजना होती. तो आणि त्याचा एक फ्रेंच सहयात्री व्हिग्नस यांनींच फक्त पर्वतरांगांची साखळी ओलांडून दुसऱ्या शिखरावर जावयाचें असेंहि ठरविण्यांत आलें. मला त्यांची ही सर्व कल्पना भयंकर साहसाची व बेदरकार वाटली. कारण नंदापर्वतावर उघडा खडक कमी आणि दाट बर्फाचे थर आहेत. हें सर्व अंतरहि खूप होतें.

परंतु ठरलेल्या योजनेप्रमाणें ड्यूप्लाट व व्हिग्नस हे निघाले. वर चढत चढत ते २३,६०० फूट उंचीपर्यंत पोचले. त्यांच्याबरोबरचे इतर शेरपा तेथूनच परतले आणि दुसऱ्या दिवशीं त्या दोघांनीं नंगा पर्वताच्या शिखर-माथ्यासाठीं प्रस्थान ठेविलें.

इकडे मी आणि तुकडींतील दोन फ्रेंचसाहेब मि. लुई ड्यूबॉस्ट व डॉ. पायान पूर्व नंदादेवीच्या पलीकडील बाजूस जाण्यासाठीं निघालों. ड्यूप्लाट व व्हिग्नस हे शिखर चढून परत त्या बाजूनें येतील तेव्हां आम्हीं त्यांना तेथें भेटावें असें ठरलें होतें. २९ जूनला आम्ही त्या जागीं पोचलों आणि त्या दोघांची वाट पाहात थांबलों. दुर्बिणी लावून आम्हीं पाहिलें. मुख्य शिखराच्या एका बाजूस वरच्या दिशेनें चढणारे ते दोघे दोन लहान ठिपक्यां-

सारखे हिमाच्छादित पर्वताच्या पार्श्वभूमीवर कांहीं मैल दूर अंतरावर आम्हीं पाहिले. शिखरमाथ्यापर्यंत पोचलेलेहि ते दिसले. परंतु त्यानंतर ड्यूप्लाट व व्हिम्सस जे दृष्टीआड झाले ते कांहीं पुनः दिसेनात.

परंतु ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं दोन शिखरांमधील पर्वत-रांगांची मालिका ओलांडून आणि पूर्वशिखर उतरून ते खालीं येतील म्हणून आम्हीं वाट पाहिली. पण व्यर्थ ! ती सकाळ गेली, दुपार संपली तरी त्या दोघांचा पत्ता नव्हता. दुर्बिणींतून दूरवर पाहिलें; मोठ्यानें आरोळ्या देऊन हांका मारल्या. परंतु कोणी दिसलें नाहीं कीं कोणीं प्रत्युत्तर दिलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं त्यांची पुन्हा वाट पाहिली. परंतु ते आले नाहींत. म्हणून शेवटीं मि. ड्यूबॉस्ट व मी त्यांच्या शोधासाठीं निघालों. पूर्व नंदा-देवीच्या उंच चढावर आम्ही जाऊं लागलों. तो सबंध दिवस व त्यानंतरचा पूर्ण दिवस आम्हीं प्रवास केला. ड्यूबॉस्टची व माझी आतां खात्री होऊन चुकली होती कीं, ड्यूप्लॉट व व्हिम्सस यांचा शोध लागणें, निदान ते जिवंत अवस्थेंत सांपडणें अशक्य आहे. तथापि आम्हीं प्रयत्न सोडला नाहीं. पूर्व नंदादेवीच्या शिखराच्या दिशेनें उंच उंच चढत होतों. शिखरावर पोचणें अशक्य आहे असें वाटूं लागलें. कारण आमच्याजवळची अन्नादि सामग्री संपत आली होती. परंतु शिखरावर पोचण्याचा शेवटचा प्रयत्न करण्याचा निर्धार केला. शिखरावर जाण्याचा रस्ता अरुंद कड्यावरून होता. त्यावर भुसभुशीत बर्फाचें आवरण होतें. त्यामुळें जरा पाय घसरला असता तर आमचा कपाळमोक्षच झाला असता. परंतु पडत, धडपडत आणि पुन्हा पुन्हा स्वतःला सावरीत आम्हीं तो रस्ता एकदांचा ओलांडला. समोर भव्य नील आकाश दिसूं लागलें. कडा संपला आणि आम्ही अखेर पूर्व नंदा-देवीच्या शिखरमाथ्यावर पोचलों. २४ हजार फूट उंच ! आणखी एक वेळ मानवानें त्या भयंकर शिखरावर विजय मिळविला. एव्हरेस्ट सोडलें तर मीं ज्याच्या माथ्यावर पोचलों आहें असें हें सर्वांत मोठें शिखर होय.

हा विजय दुर्लभ होता म्हणून तो आनंददायी वाटला. परंतु त्या विजयाचा आनंद आम्ही अनुभवूं शकत नव्हतों. कारण आमच्या त्या दोन बेपत्ता सहगिर्यारोहक साथींची आठवण होत होती. नंदा पर्वताचें मुख्य उंच शिखर व आम्ही ज्यावर उभे होतों तें पूर्व शिखर यांना सांधणारी ती

अरुंद आणि लहान-मोठ्या पर्वतरांगांची कांतरलेल्या शुभ्र रिबनसारखी दिसणारी ती धवल पर्वतसांखळी समोर पसरलेली होती. दोन मैल लांब ! डोळ्यांना दुर्बिणी लावून आम्हीं त्या पर्वतरांगांचा कोपरान् कोपरा न्याहाळून पाहिला. पण त्या दोघा मित्रांचा कोठें मागमूसहि दिसत नव्हता. त्या दोघांचा शेवट कसा झाला असेल ? मला वाटतें नंदादेवीचें मुख्य शिखर चढल्यावर जेव्हां त्यांनीं ही पर्वतसांखळी ओलांडण्यास सुरुवात केली असेल त्या वेळीं तोल जाऊन ते त्यावरून खालीं पडले असतील आणि कोलमडत कोलमडत कोठेंतरी खालीं बर्फाच्या नदींत गडप झाले असतील. कारण कांहीं का असेना, ड्यूप्लाट व व्हिग्नस हे गेले हें निश्चित. थॉर्नली, क्रेस आणि इतर कांहीं गिर्यारोहकांप्रमाणें नंदादेवी पर्वतासारख्या अतिशय भयंकर पर्वतावर जाण्याचें काम त्यांनीं क्षुल्लक मानलें आणि म्हणून दुर्दैवानें ते मृत्युमुखीं पडले असें म्हटलें पाहिजे.

नंगा पर्वत व नंदादेवी या दोन पर्वतारोहणांत १९५१ सालीं अशा रीतीनें चार माणसें मरण पावलीं. त्याच वर्षीं कांग शिखरावरील आरोहणांत आणखी एक गिर्यारोहक बळी पडला. कांचनगंगा पर्वताशेजारीं हें पर्वतशिखर आहे. फक्त १९००० फूट उंच. परंतु अजूनपर्यंत कोणी तें चढून गेलें नव्हतें. जॉर्ज फ्रे नांवाच्या एका स्विस साहेबाबरोबर मी आणि कांहीं शेरपा अशी छोटीशी तुकडी या कांग शिखरावर जाण्यासाठीं निघालों. प्रारंभ तर चांगला झाला. शिखराच्या पायथ्यापर्यंत आम्ही निर्विघ्नपणें पोंचलों आणि तेथें मुक्काम केला. परंतु त्या दिवशीं रात्रीं एक अशुभलक्षणी स्वप्न दिसलें. म्हणून मी पुढील प्रवासांत कांहीं तरी अनिष्ट घडणार या कल्पनेनें सचिंत झालों. स्वप्नावर माझा भारीच विश्वास आहे असें वाटून कांहीं वाचक माझ्यावर रागावतील. पण मला सत्य सांगितलेंच पाहिजे. कारण नंगा पर्वतावर झालेल्या अपघाताआधीं मला स्वप्न पडलें होतें. या वेळीं माझ्या स्वप्नांत मला एक विचित्र बाई दिसली. ती अन्न वाटत होती. मला खूप भूक लागली होती. इतर सर्वांना तिनें अन्नदान केलें. परंतु मला मात्र कांहीं दिलें नाहीं. माझ्याबरोबरीच्या इतर शेरपांना हें स्वप्न सांगितलें तेव्हां त्यांनाहि त्यांत कांहीं तरी अशुभ दिसलें. फ्रेनें मात्र माझें सांगणें हसण्यावारी नेलें.

आम्ही शिखरपायथ्यापासून माथ्यावर जाण्यासाठीं चढूं लागलों. इतर शेरपा भीतीनें आमच्याबरोबर आले नाहींत. फक्त मी, फ्रे आणि एक शेरपा—आंग दावा एवढे तिघेच निघालों. सुरुवातीला विनाप्रयास वर चढूं शकलों. परंतु नंतर एकदम चढ सुरू झाला. पायाखालीं दगडासारखें टणक आणि गुळगुळीत बर्फ होतें. आम्ही एकमेक एकमेकांना दोरांच्या साहाय्यानें पकडून चढूं लागलों. तळव्याला खिळे ठोकलेले बूट मीं पायांत घातले आणि बर्फाच्या जमिनींत पाय जोरानें रोवून हलकें हलकें वर चढूं लागलों. फ्रेला मीं खिळ्याचे बूट पायांत घालण्यास सांगितलें. पण त्यानें ऐकलें नाहीं. मीं त्याच्याशीं जास्त वाद घातला नाहीं. कारण फ्रे हा एक दर्दी गिर्यारोहक होता. यापेक्षांहि कठीण पर्वत तो चढला होता.

आम्ही वर जातच होतों. कांहीं वेळ ठीक चाललें होतें. आमच्यापैकीं प्रत्येकांत पंधरा फुटांचें अंतर असेल. प्रथम फ्रे, नंतर मी व त्यानंतर आंग दावा असे तिघे एका ओळींत वर चढत होतों. इतक्यांत एकाएकीं फ्रेचा तोल गेला आणि तो कोलमडत खालीं येऊं लागला. तो माझ्यावर आदळला. मीं त्याला थोपवून धरण्याचा प्रयत्न केला. पण तो फार जोरानें कोसळत खालीं येत असल्यामुळें मी त्याला आवरूं शकलों नाहीं. फ्रे तसाच कोलमडत माझ्या व दावाच्या अंगावरून सुमारें एक हजार फूट खालीं जाऊन पडला. हें सर्व इतक्या अल्पावधींत, अक्षरशः क्षणार्धांत घडलें कीं, त्यावर आमचा विश्वासहि बसेना. आम्ही निःशब्द व त्या पर्वतासारखेच निश्चल होऊन उभे होतों.

थोड्या वेळानें आम्ही खालीं उतरूं लागलों. वाटेंत फ्रेचा काळा कॅमेरा पडला होता, आणि आणखी खालीं उतरून आलों तेव्हां त्या कॅमेऱ्याचा मालक फ्रे त्या शुभ्र हिमभूमीवर चिरनिद्रा घेत पडला होता.

नंगा पर्वत, नंदादेवी आणि आतां हें तिसरें कांग शिखर. प्रत्येकानें आपली किंमत घेतली होती. पांच मृत्यु ! मी त्यांच्या स्मृतीनें भयभीत झालों. " आणि आतां आणखी किती ? " असा प्रश्न मनाशीं विचारला. कारण माझ्या आयुष्यांतील तिशीच्या नंतरचीं आणि चाळिशीच्या आंतील आणखी दोन कठीण वर्षें अद्याप जावयाचीं होतीं.

★ ★

# पुन्हा एव्हरेस्ट : पांचवा प्रयत्न : १४ :

नंगा पर्वत, नंदादेवी, कांग शिखर आणि काश्मीर, गढवाल, नेपाळ व तिबेट इतक्या ठिकाणीं जाऊन आलों. परंतु समाधान वाटत नव्हतें. कांहीं तरी चुकल्या चुकल्यासारखें वाटत होतें. कारण गेल्या पांच वर्षांत चोमोलुंगमा-वर, त्या शिखरश्रेष्ठावर जाण्याचा योग आला नव्हता. नुसतें त्याचें दर्शनहि होऊं शकलें नव्हतें. कधीं कधीं तर असें वाटे कीं, आतां आपणांस त्या प्रिय पर्वतावर कधींहि जावयास मिळणार नाहीं. परमेश्वराची तशीच इच्छा असावी.

परंतु परमेश्वराची करुणा झाली आणि मला पुढें एकदां नव्हे तर अनेकदां चोमोलुंगमावर जाण्याचें भाग्य लाभलें.

१९५२ सालच्या वसंत ऋतूंतील गोष्ट. स्विस गिर्यारोहकांची एक तुकडी एव्हरेस्टवर जाण्यासाठीं येत आहे अशी बातमी दार्जिलिंगमध्यें येऊन थडकली. एक दिवस स्वित्झर्लंडहून मला एक पत्र आलें. त्यांत तुकडीमध्यें सरदार म्हणून सामील होण्याचें निमंत्रण होतें. माझ्या आनंदाला पारावार उरला नाहीं. मी अक्षरशः बेहोष होऊन घरांत वागूं लागलों. माझ्या मुलींना व लहामूला वाटलें कीं, मला कोणा तरी भुतानें झपाटलें असावें.

या वेळेस आम्ही अगदीं नव्या मार्गानें एव्हरेस्टवर जाणार होतों. तिबेटवर चिनी कम्युनिस्टांचें पुरें नियंत्रण निर्माण झालें होतें. पाश्चिमात्य राष्ट्रांतील नागरिकांना तेथें प्रवेश मिळणें कठीण झालें. म्हणून दक्षिण नेपाळमधील माझ्या जन्मभूमींतून — सोलोखुंबूमार्गें एव्हरेस्टवर या वेळीं जावयाचें होतें. रोंगबुक व तिबेटमार्गें मी यापूर्वीं चारदां एव्हरेस्टवर गेलों होतों. परंतु हा मार्ग मला आणि आमच्या तुकडीला अगदीं नवीन होता. त्यामुळें नवीनच पर्वतावर जाण्यासारखें तें होतें.

तथापि ज्या बाजूनें आम्ही आतां जाणार होतों ती माझी जन्मभूमि असल्यानें मला त्या भागाची चांगली माहिती होती. आकर्षणहि वाटत होतें. बालपणींचीं स्वप्नें आणि स्मृति तेथें वावरत होत्या. तब्बल अठरा वर्षांनीं माझी आई मला भेटणार होती. थामेजवळील माळावर आईपाशीं

उभा राहून "ज्या पर्वतावर पक्षीसुद्धां भ्रमण करूं शकत नाहीं" अशा त्या चोमोलुंगमाचें दर्शन घेणार होतों. मी माझ्या घरीं चाललों होतों — आईकडे आणि चोमोलुंगमाजवळ !

सोलोखुंबूमार्गें दक्षिणेकडून जाणारा एव्हरेस्टकडील हा मार्ग कठीण नव्हे जवळ जवळ अशक्य होता. १९५० व १९५१ सालीं अनुक्रमें मि. टिलमन व शिप्टन हे या मार्गानें गेले होते. परंतु ते फार उंचावर पोचूं शकले नाहींत. तिबेटमार्गें जाणारा रस्ता पाश्चिमात्यांना बंद झाल्यामुळें या वाटेशिवाय दुसरी वाट शिल्लक नव्हती.

आमच्या या वेळच्या एव्हरेस्ट स्वारीचें आणखी एक वैशिष्ट्य होतें. एव्हरेस्ट ही जणू आतांपर्यंत ब्रिटिशांची दौलत होती. कारण दोन अपवाद वगळले तर अद्यापपर्यंत एव्हरेस्टवर गेलेले सर्व गिर्यारोहक ब्रिटिश प्रजाजन होते. पूर्वीं तिबेटमध्यें फक्त ब्रिटिशांनाच प्रवेश मिळत असल्यानें त्या मार्गें इतर देशीय लोक एव्हरेस्टवर जाऊं शकत नसत. आतां नेपाळमध्यें सर्वांनाच प्रवेश मिळूं लागल्यानें अन्य देशीय गिर्यारोहकांना एव्हरेस्टवर जाण्याची संधि मिळणार होती. स्विस राष्ट्रीकांनीं तिचा १९५२ सालीं प्रथम फायदा घेतला.

या स्वारींतील शेरपा लोकांच्या भरतीचें काम माझ्यावरं सोपविण्यांत आलें. परंतु एव्हरेस्टवर जाण्याकरितां माझ्याइतका कोणीहि शेरपा उत्सुक दिसेना. कारण १९५१ सालीं मि. शिप्टनच्या तुकडींतून गेलेल्या मजुरी व बक्षिशीच्या रकमेवरून शेरपांची साहेब लोकांशीं कांहींतरी तक्रार झाली होती. शिवाय सोलोखुंबूच्या बाजूनें म्हणजे दक्षिणमार्गें एव्हरेस्ट वर जाण्याचा प्रयत्न करणें धोक्याचें आणि असंभव आहे असें इतर शेरपांचें ठाम मत होतें. म्हणून आमच्या तुकडींत यावयास कोणी तयार होईना. परंतु शेवटीं खूप प्रयत्न केल्यावर तेरा शेरपा तयार झाले आणि आम्ही आमच्या तुकडींतील स्विस सहकाऱ्यांना जाऊन मिळण्यासाठीं काटमांडूस रवाना झालों.

काटमांडू येथें मि. डिटर्टच्या नेतृत्वाखालीं स्वित्झर्लंडहून विमानानें स्विस गिर्यारोहक येऊन पोचले होते. त्या तुकडींतील कांहींजण माझे पूर्वींचे मित्र होते आणि कांहीं नवीन लोक होते. मला सर्व लोक चांगले

वाटले. गिर्यारोहक या दृष्टीनेंहि ते तरबेज व मजबूत होते. रेमंड लँबर्ट या त्यांच्यापैकीं एकाची आणि माझी खूपच दोस्ती जमली आणि ती अजून-पर्यंत कायम आहे.

२९ मार्चला काटमांडू सोडलें आणि सोलोखुंबूच्या दिशेनें मार्ग-क्रमणास प्रारंभ केला. मी तुकडींतील शेरपा सरदार असल्यानें आमच्या-बरोबरच्या प्रचंड सामानसुमानाची मीं नीट वाटणी केली आणि कोणी कोणतें सामान घेऊन जावयाचें तें ठरवून दिलें.

काटमांडूपासून नामचे बझार या गांवापर्यंत आम्ही सोळा दिवसांत पोंचलों. खोल दऱ्याखोऱ्यांतून आणि उंच-सखल खडकांतून प्रवास चालला होता. पर्वतांच्या रांगा एकामागून एक मागें पडत होत्या. प्रवास चालू असतांना एकमेकांशीं ओळख करून घेत होतों. डिट्टर्ट हा आमचा नेता होता. मोठा आनंदी आणि उत्साही होता. लँबर्ट उंचा-पुरा आणि टिलमनप्रमाणें केसाळ होता. त्याला सर्वजण बालू म्हणजे अस्वल म्हणून हांक मारीत. एकाहि पौर्वात्य भाषेचें त्याला ज्ञान नव्हतें. इंग्रजी थोडें-बहुत समजे. त्यामुळें त्याच्याशीं आमचें सर्व संभाषण हाताच्या खाणाखुणांनीं चाले. सर्वच स्विस आम्हांला आवडूं लागले.

आम्ही जसजसे पुढें जाऊं लागलों तसतशी जमीन, माणसें बदलूं लागलीं. भातशेती मागें पडली आणि बार्ली व बटाटे पिकविणारी जमीन व कांहीं ठिकाणीं जंगलें दिसूं लागलीं. हिंदुधर्मीय लोक भेटेनासे झाले. सर्वत्र बौद्ध-धर्मीय दिसूं लागले. नेपाळी वंशाऐवजीं मंगोलियन वंशाचे चेहरे दृष्टीस पडूं लागले. दहा दिवसांच्या प्रवासानंतर आम्ही उत्तरेच्या बाजूच्या आमच्या शेरपा भूमींत प्रवेश केला. प्रथम सोलो, नंतर ती बेफाट दूधकोसी नदी आणि नंतर नामचे बझार आलें. माझें मन हर्षभरित झालें. चोमोलुंगमाच्या आणि माझ्या घराच्या अगदीं जवळ चाललों होतों. आजूबाजूला पूर्व-परिचयाच्या वस्तु व वातावरण दिसूं लागलें. इतका आनंद झाला कीं, क्षणभर मन गोंधळून गेलें. आनंदानें हसावें कीं रडावें तें समजेना.

नामचे बझार येथें आम्ही पोंचलों. माझी ऐंशी वर्षांची प्रेमळ आई थामेहून मला भेटण्यासाठीं नातवंडांसह पायीं चालत मुद्दाम आली होती. ‘ आमा ला, मी आलों ” असें म्हणून हर्षातिशयानें मीं तिला कवटाळलें आणि

दोघेंहि स्फुंदूं लागलों. आम्हां सर्व शेरपांना भेटण्यासाठीं आसमंतांतील सारे शेरपा तेथें जमा झाले होते. माझ्या आईबरोबर माझ्या तीन सख्ख्या बहिणी, त्यांचे यजमान, मुलें आणि माझीं चुलत-मामेभावंडें यांचा ताफाच्या ताफा स्वागतासाठीं आला होता. खूप गप्पा आणि मजा केली. तो दिवस नेपाळी नववर्षदिन होता. साहेब लोकांचा ईस्टर मंडे होता. त्यामुळें ते सुद्धां आमच्या आनंदांत सामील झाले. गायलों, नाचलों आणि चँगवरहि भरपूर ताव मारला.

एक दिवस अशा रीतीनें मजेंत घालविला आणि दुसऱ्या दिवशीं पुढील प्रवासास पुनः सुरुवात केली. निघण्यापूर्वीं नामचे बझारमध्यें तेथील कांहीं शेरपांची हमाल म्हणून आमच्या तुकडींत भरती केली. त्यांत कांहीं शेरपाणीसुद्धां होत्या. माझी सर्वांत धाकटी बहीण सोना डोमा व चुलत बहीण फू लहामू या त्यांत होत्या. इतर शेरपांचेहि नातेवाईक त्यांत होते.

थ्यांग बोचे मठापाशीं आम्ही पोचलों तेव्हां तेथील लामांनीं आमचें थाटानें स्वागत केलें. त्या वेळीं त्यांनीं आम्हाला तिबेटी पद्धतीचा भरपूर चहा दिला. या तिबेटी चहांत खूप मीठ व यॅकच्या दुधाचें खवट लोणी घातलेलें असतें. इतर साहेबांचीं तोंडें तो चहा घशाखालीं घालतांना पाहण्यासारखीं झालीं होतीं. पण लॅंबर्ट गटागटा तो चहा पीत होता; एवढेंच नव्हे तर आणखी मागून घेत होता. आम्हांला वाटलें आतां लॅंबर्ट आजारी पडणार. पण कसचें काय? त्याला कांहींसुद्धां झालें नाहीं.

थ्यांग बोचे मठापाशीं आम्ही आलों तेव्हां १२ हजार फूट उंचीवर होतों. परंतु त्यानंतरच खऱ्या पर्वतांना प्रारंभ होणार होता. दूध कोसीच्या पूर्वेकडे आम्ही जाऊं लागलों. टावेचे व आमा डाबलाम या दोन सुंदर गिरिशिखरांमधील खोल दऱ्या ओलांडल्या व खुंबू ग्लेशियरच्या नाकापाशीं येऊन पोचलों. निळ्या आकाशांत एव्हरेस्ट शिखराचें धवल टोंक तेथून दिसत होतें.

आमच्या तुकडींतील कांहीं स्विस संशोधक एक दिवस पर्वतांतून संशोधन करीत हिंडत असतां त्यांनीं कोणातरी प्राण्याच्या पायांचे ठसे पाहिले. त्यांचा आकार रहस्यदर्शक होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आमच्यांतील कांहींजण ते ठसे पाहण्यासाठीं गेले. त्यांनीं ते पाहिले तेव्हां येतीच्या,

हिममानवाच्या पायाचे ते असावेत याबद्दल शंका राहिली नाहीं. कारण कांचनगंगा पर्वतावरील झेमू ग्लेशियरवर मीं असेच ठसे १९४६ सालीं एकदां पाहिले होते. आतांचे हे ठसे स्पष्ट व ठाशीव होते. आम्हीं त्यांचें माप घेतलें. ११½ इंच लांब आणि ४¾ इंच रुंद ! दोन ठशांतील अंतर बरोबर २० इंच होतें. माणसाला अज्ञात असलेल्या कोणातरी प्राण्याचे असावेत याबद्दल स्विससाहेबांनाहि शंका राहिली नाहीं. एकामागून एक अशा एका सरळ ओळींत तीं पावलें होतीं. त्यांची सुरुवात कोठून झाली व शेवट कोठें झाला हें कांहीं आम्हांस सांपडलें नाहीं. 'येती'चा मागोवा घेण्यासाठीं साहेबांनीं आसंमतांतील सर्व टापू पालथा घातला. पण 'येती' कुठें दिसला नाहीं आणि त्याचीं पावलेंहि कोठें पुन्हा दृष्टीस पडलीं नाहींत. 'येती'संबंधीं मला खूप औत्सुक्य आहे. पण यापेक्षां अधिक कांहीं मला सांगतां येत नाहीं. मला त्याचें खरोखरच वाईट वाटतें.

एप्रिलच्या २२ तारखेला १६,५७० फूट उंचीवरील खुंबू ग्लेशियरमध्यें आम्ही पोचलों. येथून पश्चिमेच्या बाजूस एव्हरेस्ट व नुप्से शिखरांमधील अरुंद भागांत बर्फाचा एक प्रचंड लोंढा उंचावरून खालीं कोसळत होता. त्याच्या पायथ्याशीं आम्हीं आमची पहिली छावणी टाकली. या बर्फाच्या लोंढ्यांतून वाट काढणें फार कठीण व धोक्याचें होतें. एखाद्या निबिड जंगलांतून वाट काढण्यासारखें तें होतें. पायाखालील खडकांत बर्फानें झाकलेल्या भेगा होत्या, आणि वाटेंत बर्फाचे डोक्यावर कोसळूं पाहणारे मोठेमोठे ढिगारे होते. परंतु त्यांतूनहि मार्ग काढला व *'वेस्टर्न क्राम'च्या जवळ येऊन पोचलों. वेस्टर्न क्रामच्या तोंडाशींच एक मोठी घळ आहे. ती ओलांडल्याशिवाय क्राममध्यें आम्ही पोहोचूं शकत नव्हतों. ती घळ इतकी रुंद व खोल होती कीं, त्यावरून उडी मारून जाण्याची कल्पनाहि करवत नव्हती. आम्ही सचिंत झालों. स्विस साहेबांनीं घळीच्या अलीकडील किनाऱ्यानें सर्वत्र हिंडून ती घळ कोठून

---

*Western Cwm ही एक एव्हरेस्टकडे जातांना वाटेंत लागणारी आजूबाजूंनीं डोंगरांनीं वेष्टित अशी दरी आहे. ती ओलांडून एव्हरेस्टकडे जातां येतें.

उतरून जातां येतें का पाहिलें. पण तशी जागा सांपडेना. शेवटीं मार्ग सापडला. त्या घळींत सुमारें साठ फूट खोलावर एका जागीं एक उंच खडक वर आला होता. त्यावर पाय ठेवून घळीच्या पलीकडच्या भिंतीपर्यंत पोचून तेथून ती चढून पैल किनाऱ्यास जाणें शक्य होतें. आमच्यापैकीं आस्पर नांवाच्या एका जवान स्विसनें हें साहस केलें. तो या मार्गानें त्या प्रचंड खोल व रुंद घळीच्या पैलतीरास पोचला. दोन्ही बाजूला दोर ठोकून दोराचा पूल आम्हीं बनविला, आणि मग आम्हीं आमच्या सामानासह ती घळ ओलांडून वेस्टर्न काममध्यें प्रवेश केला. तो एक फार मोठा विजय होता. कारण एव्हरेस्टवर तोंपर्यंत गेलेली एकहि तुकडी ती अनुल्लंघनीय प्रचंड घळ ओलांडून वेस्टर्न काममध्यें पोचूं शकली नव्हती.

जवळ जवळ २० हजार फूट उंचीवर आम्ही पोचलों होतों. हवेंतील विरळपणाचा कांहीं लोकांना, शेरपांनाहि श्वासोच्छ्वास करतांना त्रास होऊं लागला. पण मला कांहींहि झालें नाहीं. साहेबांना त्याचें आश्चर्य आणि गंमत वाटली. ते हसून म्हणाले, " या गृहस्थाला खरोखरच तीन फुफ्फुसें असलीं पाहिजेत. " पर्वतावर मी जितकें उंच जाईन तितकें अधिक बळ माझ्यांत येतें व माझे पाय, फुफ्फुसें व हृदय अधिकच काम देऊं लागतात. असें कां होतें कोण जाणें ? परंतु होतें खरें. त्यामुळेंच मी उंच पर्वतावर चढून जाऊं शकतों आणि तेथें आनंद उपभोगूं शकतों.

वेस्टर्न काममध्यें आम्ही पोचलों तेव्हां याच आंतरिक सामर्थ्यानें आणि समाधानानें मी लँबर्टला हसत म्हणालों, " आपण आतां अधिक उंच जाणार आणि या वेळींच एव्हरेस्ट शिखरावर पोचणार अशी माझी खात्री आहे. "

वेस्टर्न काम ही बर्फानें तुडुंब भरलेली एक प्रचंड दरी आहे. साडेचार मैल लांब आणि दोन मैल रुंद. या दरीला स्विस साहेब ' निःशब्द दरी ' असें म्हणत. आमच्या टोळींतील लोकांचें व त्यांच्या हालचालींचे आवाज येतील तेवढेच. नाहीं तर सर्वत्र नीरव स्तब्धता आणि शांतता. या दरींत माणूस तर नाहींच पण चिटपांखरूहि क्वचित्‌च दिसे. दरीच्या डाव्या अंगास एव्हरेस्ट आहे. पण तें अगदीं जवळ असल्यानें त्याचें पूर्ण दृश्य त्या ठिकाणाहून दिसूं शकत नाहीं. या दरीच्या किनाऱ्यानें समोर दिसणाऱ्या

ल्होत्से शिखराच्या पायथ्याशीं जावयाचें आणि तेथून एव्हरेस्ट व ल्होत्से यांना जोडणारी साऊथ कोल† ही सखल बर्फाच्छादित पर्वतराजी ओलांडून जाऊन एव्हरेस्टवर पोचावयाचें...पण छे! हा विचारसुद्धां साहसपूर्ण आहे.

वेस्टर्न क्कामच्या मध्यभागीं चौथी आणि नंतर तेथून पुढें ल्होत्से पर्वताच्या पायथ्याशीं आमची पांचवी छावणी पडली. आम्ही ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणें प्रवास करीत होतों. मधूनमधून सारखीं वादळें होत. त्यामुळें आम्हांस तंबूंत पडून राहावें लागे. पण आम्हांला घाई करणें जरूर होतें. कारण पावसाळा सुरू होण्यापूर्वीं एव्हरेस्टवर जाऊन पर्वतप्रदेशांतून निघून जाणें आवश्यक होतें.

आमची पांचवी छावणी २२,६४० फूट उंचावर होती. तेथून साऊथ कोल आणखी ३ हजार फूट उंचीवर होता. मेच्या शेवटच्या आठवड्यांत कोलवर चढण्यास आम्ही सिद्ध झालों. कोलवर जाण्यासाठीं व तो पार होऊं शकला तर पुढें एव्हरेस्ट शिखरावर चढण्याकरितां आमच्यापैकीं लॅंबर्ट, ऑबर्ट, फ्लोरी व मी होतों. आमच्याबरोबर इतर सहा शेरपा साहाय्यक होते. एव्हरेस्टवरील स्वारीच्या तुकडीचा सभासद होण्याचा मान मला मिळाला. मला मिळालेला तो सर्वांत मोठा मान होता. परंतु त्यामुळें माझी जबाबदारीहि वाढली होती. ती आपल्या हातून पूर्ण व्हावी म्हणून मनांत मीं ईश्वराची प्रार्थना केली.

आम्ही कोलवर प्रथम जाण्यास निघालों तेव्हां हवा खराब होती. त्यामुळें मागें परतावें लागलें. पुन्हा दुसऱ्या दिवशीं निघालों आणि आठ तासांच्या प्रवासानंतर कोलच्या बऱ्याच जवळ येऊन पोचलों. २५,६८० फुटांपेक्षां अधिक उंचीवर आम्ही होतों. पण सूर्यास्त होऊं लागला. कडक थंडी पडूं लागली. तरीहि आम्ही आणखी पुढें गेलों. तथापि आमच्या तुकडींतील दोन शेरपा साहाय्यक अगदींच थकले. ते खालीं परत गेले. नंतर आणखी दोन तास आम्ही कोलच्या दिशेनें पुढें जात होतों. पण नंतर काळोख पडला आणि त्या दिवशीं आम्ही थांबलों.

तंबू ठोकला आणि त्यांत रात्र काढली. थंडीनें इतके गारठून गेलों

---

† Col म्हणजे पर्वतराजींतील सखल भाग.

२७३७३ ८५८ ५१२७ ३०१९१

होतों कीं, एकमेकांच्या अंगावर झोपून शरीराला ऊब आणली. सोसाट्याच्या वाऱ्यानें तंबू उडून जातो कीं काय या भीतींतच आम्हीं रात्र संपविली. सूर्य उगवला तेव्हां वर साऊथ कोल स्पष्ट दिसत होतें.

लॅंबर्ट आणि दोन स्विस व मी साऊथ कोल चढून जाण्यासाठीं वर निघालों आणि इतर शेरपा खालील छावणींत असलेलें सामान घेऊन येण्यासाठीं गेले. वर चढत चढत शेवटीं कोलजवळ येऊन ठेपलों. लॅंबर्ट आणि दोन स्विस पुढें गेले आणि मी शेरपांना सामान वाहून आणण्याचे कामीं मदत करण्यासाठीं परत खालीं गेलों. खालीं पोचलों तेव्हां त्यांच्यापैकीं एकजण पासांग फुतार अगदीं थकलेला दिसला. तो तंबूत पडून होता आणि अगदीं खचला होता. मी गेल्यावर तो मला म्हणाला, “ मला बरें नाहीं. मी निश्चित मरणार.” मीं उलट उत्तर दिलें, “ वेडा आहेस. कांहीं मरणार नाहींस. चल ऊठ. सामान घेऊन आपण साऊथ कोलवर जाऊं.” परंतु त्यानें पुरी हाय खाल्ली होती. तो तयार होईना. माझी पंचाईत झाली. पासांगला तेथेंच टाकून जावें तर तें शक्य नव्हतें. कारण तो निश्चित मेला असता. बरें न जावें तरीहि तें योग्य झालें नसतें. कारण साऊथ कोलवर लॅंबर्ट दोन साहेबांसह एकटा जाऊन पडला होता. त्यांना सामान मिळालें नाहीं तर तेहि तेथें मेले असते.

शेवटीं मी जॉकी ( पासांगला आम्ही या नांवानें हाक मारीत होतों )ला तंबूबाहेर काढलें आणि आमच्याबरोबर चालावयास लावलें. सामान पाठीवर टाकून आम्ही पुन्हा साऊथ कोलकडे वर निघालों. कोलच्या पायथ्याशीं पोचलों तेव्हां इतर शेरपा थकून मटकन खालीं बसले. अजून किती तरी सामान खालच्या मुक्कामावर पडून होतें. तें आणण्यासाठीं पुन्हा दोन वेळां तो कठीण रस्ता उतरून मला एकट्याला जावें लागलें आणि पाठीवर सामान वाहून वर आणावें लागलें. मला “ तिसरें फुफ्फुस ” होतें म्हणूनच हा प्रचंड उद्योग करतां आला.

साऊथ कोलमध्यें लॅंबर्ट, इतर दोन साहेब, मी व आमचे सर्व शेरपा साहाय्यक पुन्हा एकत्र आलों. तेथून आतां एव्हरेस्ट चढून जावयाचें होतें. त्यासाठीं लागणाऱ्या सर्व सामानाची सिद्धता झाली होती. आम्ही २५,८५० फुटांवर होतों. मी आजवर पर्वतांत अनेक ठिकाणीं गेलों आहें. पण साऊथ

कोलइतकी भयाण व भणभणीत जागा कधीं पाहिलेली नाहीं. एव्हरेस्ट व ल्होत्से पर्वतांच्या अंतिम शिखरांमधील या सखल पर्वतरांगांत वारा अविश्रांतपणें नुसता गर्जत असतो. तेथील बर्फाला गुळगुळीतपणासुद्धां नाहीं. सर्व कांहीं रखरखीत आणि खरखरीत.

साऊथ कोलवर आम्ही पोचलों खरें, परंतु एव्हरेस्ट तर खूप दूर होतें. एवढेंच नव्हे तर एव्हरेस्टचा आमच्या बाजूनें दिसणारा कडासुद्धां खूप उंच दिसत होता. इतका कीं जणू एक निराळा पर्वत तो असावा असा भास होत होता. एव्हरेस्टेचें अंतिम शिखर कोलवरून दिसत नव्हतें. कारण दुसऱ्या एका दुय्यम शिखरामागें तें दडलें होतें.

रात्र झाली. वारा घोंघावतच होता. एका तंबूंत मी व लॅंबर्ट शिरलों आणि एकमेकांना ऊब देऊन कशीबशी रात्र काढली. सकाळ झाली. पुन्हा पुढील बिकट मार्ग आक्रमावयाचा होता. परंतु आमच्याबरोबरच्या इतर तीन शेरपांनीं अगदीं हातपाय गाळले होते. जॉकी तर हालायलाहि तयार नव्हता. शेवटीं त्याला व इतर दोघांना साहेबांनीं खालीं परत जाण्याची परवानगी दिली. माझा मात्र साहेबांबरोबर शेवटपर्यंत जाण्याचा निर्धार होता.

ते तीन शेरपा वाटेंत आम्हांला सोडून गेल्यानें पंचाईत झाली. कारण एव्हरेस्टवर पोचण्यासाठीं जेवढें सामान व साधनें वर वाहून नेणें जरूर होतें तेवढीं आम्ही एकटे नेऊं शकणार नव्हतों. त्यामुळें शिखरावर शेवट-पर्यंत आपण जाऊं ही आशा आतां मावळली होती. परंतु आम्ही वर जाण्यासाठीं निघालों. तासांमागून तास जात होते आणि आम्ही वरवर चढत होतों. हवा निवळ होती आणि पश्चिमेकडील पर्वतरांगांमुळें वाऱ्या-पासून आमचें रक्षण होत होतें. परंतु अतिशय मंद गतीनें आम्ही वर चढत होतों. आमच्याजवळ आतां फक्त एक दिवसाचेंच अन्न शिल्लक होतें. तंबूसुद्धां एकच होता. तरीहि आरोहण चालू ठेवलें. २७ हजार ५०० फूट उंचीपर्यंत आम्ही त्या दिवशीं पोचलों. १९३८ सालीं तिबेटच्या बाजूनें एव्हरेस्टवर मी गेलों होतों त्या वेळेपेक्षां अधिक उंचीवर आम्ही आतां पोचलों.

रात्र झाली. आम्ही चौघेजण होतों, आणि आमचेपाशीं तंबू मात्र

एकच होता. शेवटीं असें ठरलें कीं लँबर्टनें व मी जेथपर्यंत आम्ही पोंचलों होतों ( २७,५०० फूट ) तेथें त्या रात्रीं मुक्काम करावयाचा आणि दुसऱ्या दिवशीं हवा अनुकूल असेल तर एव्हरेस्टच्या शिखरावर जाण्याचा प्रयत्न करावयाचा. बाकीचे दोन्ही साहेब यासाठीं खुषीनें तयार झाले. गिर्यारोहकांची ती रीत आहे. आमच्याऐवजीं ते दोघे त्या रात्रीं त्या ठिकाणीं राहिले असते तर त्यांनाहि दुसऱ्या दिवशीं एव्हरेस्ट शिखरमाथ्यावर पोंचण्याचा प्रयत्न करण्याची संधि मिळाली असती. परंतु कांहींहि कुरकूर न करतां त्यांनीं स्वखुषीनें ती नाकारली.

ते दोघे खालीं गेले. मीं व लँबर्टनें तंबू ठोकला आणि त्याबाहेर मावळत्या सूर्याकडे पाहात घटकाभर विश्रांति घेण्यासाठीं बसलों. आम्हांला एकमेकांची भाषा समजत नव्हती. त्यामुळें बोलतां येत नव्हतें. मीं एव्हरेस्टच्या शिखरमाथ्याकडे अंगुली दाखवून इंग्रजींत लँबर्टला म्हटलें, " उद्यां, तूं आणि मी तेथें असूं नाहीं ? " लँबर्ट खसखसून हसला आणि स्विस भाषेंत उत्तरला, " हं, ठीक आहे. "

ती रात्र आम्हीं तंबूंत कशी काढली हें आमचें आम्हांस माहीत. कडाक्याची थंडी होती. झोपण्याच्या हवेच्या पिशव्याहि आमच्यापाशीं नव्हत्या. त्यामुळें बर्फानें गारठून मरावयाचा प्रसंग होता. म्हणून लँबर्ट व मी आळीपाळीनें एकमेकांचें अंग एकमेकांच्या हातापायानें रात्रभर घासून आणि एकमेकांच्या अंगावर चापट्या मारून अंगांतील रक्तप्रवाह चालू ठेवण्याचा प्रयत्न करीत होतों. अशा रीतीनें सारी रात्र काढली.

सकाळ झाली. तंबूच्या बाहेर डोकावून पाहिलें. हवा फारच खराब होती. ढगांनीं आकाश पूर्ण भरून गेलें होतें. वारा वाहात होता व आपल्याबरोबर बर्फाचे अणकुचिदार कण येऊन आमच्या चेहऱ्यावर त्याचा मारा करीत होता. अशा परिस्थितींत शिखरावर अधिक उंच चढून जाण्याचें धाडस करावें कीं नाहीं असा क्षणभरच मनांत विचार आला. पण आतां आम्ही इतके वर आलों होतों कीं, असा विचार मनांत ठेवायला जागाच नव्हती. वर पोंचण्याचा प्रयत्न करणें अनिवार्य होतें. शिखरमाथ्याकडे बोट दाखवून आणि डोळे मिचकावून हसून त्यानें मला आपलें मनोगत सांगितलें व आम्ही वर चढण्याची सिद्धता करूं लागलों.

वर चढूं लागलों. गति इतकी मंद होती, कीं दोन-तीन पावलें पुढें जावें आणि थांबावें असें चाललें होतें. अशा रीतीनें एक-दोन-तीन तास चाललों होतों. चढण्याचें काम तितकें कठीण नव्हतें. पण रस्ता मोठा धोक्याचा होता. एकेक तास दिवसा दिवसा एवढा नव्हे आठवड्याएवढा मोठा वाटत होता. हवा अधिकच बिघडत चालली होती. वाऱ्याच्या झोताबरोबर धुकें व बर्फाचे तडाखे बसत होते. माझ्या घशाला कोरड पडूं लागली. कधीं कधीं आम्ही इतकें थकून जात होतों कीं, बर्फावरून सरपटत चालत जावें लागे. माझें 'तिसरें' फुप्फुसहि आतां काम देईनासें झालें.

तथापि आम्ही वर, आणखी वर चढण्यासाठीं धडपडत होतों. थोडा वेळ थांबून मीं व लॅंबर्टनें एकमेकांकडे पाहिलें. लॅंबर्ट स्विस भाषेंत नेहमींप्रमाणें म्हणाला, " हं, ठीक आहे. चालूं द्या. " मींहि त्याला उत्तर दिलें, " हं ठीक आहे. " पण तें खरें नव्हतें. परिस्थिति बिकट होती. यशाविषयीं आम्ही निराश झालों होतों.

त्या प्रसंगीं मला अनेक गोष्टींची आठवण झाली. दार्जिलिंग, तेथील माझें घर, माझी पत्नी आंग लहामू आणि मुली यांच्या मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. मॅलरी व आयर्व्हिनचें स्मरण झालें. कांहीं वर्षांपूर्वीं एव्हरेस्टवर पोंचण्याचा प्रयत्न करीत असतांना ते प्राणाला मुकले होते. आमच्याबरोबरचे बाकीचे दोन साहेब खालीं होते. माझ्या मनांत आलें, आपण शिखरावर चढण्याच्या प्रयत्नांत अपयशी झालों तरी ते दोघेजण यशस्वी होतील. मी व लॅंबर्ट कदाचित् पोंचूंहि; परंतु जिवंत परत येऊं का?...माझ्या विचारांची सांखळी तुटली. मेंदू बधिर झाला. एखाद्या निर्जीव यंत्रासारखा मी चाललों होतों; थांबत होतों आणि पुन्हा चालत होतों.

पण अखेर आम्ही एका ठिकाणीं थांबलों. लॅंबर्ट निःस्तब्ध उभा राहिला. क्षणभरानें तो खुणेनें कांहीं सांगत होता. आपण किती अंतर चढून आलों? फक्त ६५० फूट! त्यानें खुणेनें उत्तर दिलें. पांच तासांत केवळ ६५० फूट चढ आम्ही चढून आलों. मीं वर पाहिलें. एव्हरेस्टचें दक्षिणेकडील शिखर अजूनहि ५०० फूट उंचावर होतें; आणि त्याच्या पलीकडील खऱ्या एव्हरेस्ट शिखरावर आम्ही जावयास निघालों होतों. पण...

२४३४३ परिग्र.
८५८ ३०।१।५८



नैऋत्येकडून दिसणारें एव्हरेस्टचें शिखर

परमेश्वरावर माझा विश्वास आहे. मनुष्याला बिकट प्रसंगीं तो मार्ग दाखवितो. मला व लॅंबर्टला त्यानेंच त्या प्रसंगीं सद्‌बुद्धि दिली. आम्ही अधिक वर जाऊं शकलों असतों. कदाचित् शिखरमाथ्यावरहि पोचूं शकलों असतों. परंतु परत खालीं मात्र येऊं शकलों नसतों. म्हणून आणखी वर जाणें म्हणजे मृत्यूच्या जबड्यांत आपण होऊन शिरण्यासारखेंच होतें.

आम्ही थांबलों आणि परत फिरलों. २८,२५० फूट उंचीवर आम्ही पोचलों होतों. एव्हरेस्ट शिखरमाथ्याच्या इतकें जवळ आजवर कोणीच पोचलें नव्हतें. सर्वसामर्थ्यानिशीं आम्हीं प्रयत्न केला. परंतु तो कमी पडला. मूकपणानें आम्ही परत फिरलों. एकमेकांशीं एक शब्दहि न बोलतां खालीं उतरलों. आल्या वाटेनें सावकाश सावकाश खालीं येऊं लागलों.

इतर दोन साहेबांनींहि दुसऱ्या दिशेनें शिखरावर पोचण्याचा प्रयत्न केला. पण ते आजारी पडले त्यामुळें तो तसाच अर्धवट सोडावा लागला. तथापि एव्हरेस्टवर आरोहण करण्याचा एक दिव्य प्रयत्न आम्हीं केला होता. त्यांत अपयश आलें असलें तरी लॅंबर्टसारखा एक थोर मित्र मला या प्रयत्नांत लाभला होता.

* *

## पुन्हा एव्हरेस्ट : सहावा धाडसी प्रयत्न : १५ :

शरत्कालांत एव्हरेस्टवर चढून जाण्यासंबंधीं अनेक वेळां चर्चा झाला असली तरी १९५२ पर्यंत तसा प्रयत्न झाला नव्हता. त्या वर्षींच्या उन्हाळ्यांत मीं ज्या स्विस तुकडींतून एव्हरेस्टवर जाण्याचा अपयशी प्रयत्न केला त्याच तुकडींतील डॉ. गॅब्रिअल शेवेली यांच्या नेतृत्वाखालीं एक स्विस तुकडी एव्हरेस्टवर जाण्यासाठीं सिद्ध झाली. तींत माझा दोस्त रेमंड लॅंबर्ट होताच. मलाहि निमंत्रण आलें.

आंग लहामूला या भलत्याच वेळीं मीं हा प्रयत्न करणें पसंत नव्हतें. ती म्हणाली, "हा तर शरदृतु आहे. या दिवसांत तुम्ही पूर्वीं कधीं एव्हरेस्टवर गेलेले नाहींत. मग आतां कशाला जातां ?"



नैऋत्येकडून दिसणारें एव्हरेस्टचें शिखर

परमेश्वरावर माझा विश्वास आहे. मनुष्याला बिकट प्रसंगीं तो मार्ग दाखवितो. मला व लँबर्टला त्यानेंच त्या प्रसंगीं सद्बुद्धि दिली. आम्ही अधिक वर जाऊं शकलों असतों. कदाचित् शिखरमाथ्यावरहि पोचूं शकलों असतों. परंतु परत खालीं मात्र येऊं शकलों नसतों. म्हणून आणखी वर जाणें म्हणजे मृत्यूच्या जबड्यांत आपण होऊन शिरण्यासारखेंच होतें.

आम्ही थांबलों आणि परत फिरलों. २८,२५० फूट उंचीवर आम्ही पोचलों होतों. एव्हरेस्ट शिखरमाथ्याच्या इतकें जवळ आजवर कोणीच पोचलें नव्हतें. सर्वसामर्थ्यानिशीं आम्हीं प्रयत्न केला. परंतु तो कमी पडला. मूकपणानें आम्ही परत फिरलों. एकमेकांशीं एक शब्दहि न बोलतां खालीं उतरलों. आल्या वाटेनें सावकाश सावकाश खालीं येऊं लागलों.

इतर दोन साहेबांनींहि दुसऱ्या दिशेनें शिखरावर पोचण्याचा प्रयत्न केला. पण ते आजारी पडले त्यामुळें तो तसाच अर्धवट सोडावा लागला. तथापि एव्हरेस्टवर आरोहण करण्याचा एक दिव्य प्रयत्न आम्हीं केला होता. त्यांत अपयश आलें असलें तरी लँबर्टसारखा एक थोर मित्र मला या प्रयत्नांत लाभला होता.

* *

## पुन्हा एव्हरेस्ट : सहावा धाडसी प्रयत्न : १५ :

शरत्कालांत एव्हरेस्टवर चढून जाण्यासंबंधीं अनेक वेळां चर्चा झाला असली तरी १९५२ पर्यंत तसा प्रयत्न झाला नव्हता. त्या वर्षीच्या उन्हाळ्यांत मीं ज्या स्विस तुकडींतून एव्हरेस्टवर जाण्याचा अपयशी प्रयत्न केला त्याच तुकडींतील डॉ. गॅब्रिअल शेवेली यांच्या नेतृत्वाखालीं एक स्विस तुकडी एव्हरेस्टवर जाण्यासाठीं सिद्ध झाली. तींत माझा दोस्त रेमंड लँबर्ट होताच. मलाहि निमंत्रण आलें.

आंग लहामूला या भलत्याच वेळीं मीं हा प्रयत्न करणें पसंत नव्हतें. ती म्हणाली, "हा तर शरद्ऋतु आहे. या दिवसांत तुम्ही पूर्वीं कधीं एव्हरेस्टवर गेलेले नाहींत. मग आतां कशाला जातां ?"

" शरद्‌ऋतूंत यापूर्वीं कोणी एव्हरेस्टवर गेलं नव्हतं हें खरं आहे. परंतु म्हणूनच तर तसा प्रयत्न करणं जरूर आहे. एव्हरेस्टवर जाण्याचे सर्व प्रयत्न आपण केलेच पाहिजेत. " मीं निर्धारपूर्वक उत्तर दिलें आणि स्विस तुकडींत दाखल झालों.

या खेपेच्या तुकडींत केवळ सरदार म्हणून मी सामील झालों नव्हतों. प्रत्यक्ष गिर्यारोहण करणाऱ्या तुकडीचा सदस्य होण्याचाहि मान मला मिळाला होता. मला त्याचा अभिमान वाटला.

या वेळच्या जथ्यांत सभासद कमी होते. पण गिर्यारोहणाची साधन-सामग्री व इतर मदतनीस लोक पुष्कळ होते. स्विससाहेब, शेरपा व नेपाळी पोर्टर मिळून सुमारें चारशें माणसांचा भला मोठा तांडा तो होता. युद्धावर निघालेल्या एखाद्या सैन्यासारखा तो दिसत होता.

सप्टेंबरच्या प्रारंभीं आम्ही काटमांडूस पोचलों. सबंध महिनाभर नेपाळच्या टेकड्या व पर्वतांच्या उंचसखल प्रदेशांत आम्हीं प्रवास केला. हवा फारच वाईट होती. प्रचंड पाऊस आणि चिखल होता. त्यामुळें कित्येकजण आजारी पडले. तुकडीचे नेते मि. शेवली हे सुद्धां आजारी झाले. आम्ही सोलाखुंबूस पोचलों तेव्हां तर परिस्थिति अधिकच बिघडली. आम्ही अधिक उंचीवर जसे जाऊं लागलों तसा थंडीचा कडाका वाढत चालला. नेपाळी पोर्टर्सपाशीं गिर्यारोहणाचे वापरण्याचे कपडे नव्हते. त्यामुळें त्यांना ही थंडी हैराण करूं लागली. त्यांच्यापैकीं कित्येकजण अंथरुणाला टेकले. त्यांपैकीं दोघेजण मृत्युमुखीं पडले. आमच्या प्रवासाचा आरंभ अशा रीतीनें एका दुर्दैवी घटनेनें झाला. त्यामुळें कित्येक पोर्टर्स आम्हाला परत निघून सोडून गेले. त्या वेळीं आम्ही १३ हजार फूट उंचीवर पोचलों होतों.

सप्टेंबर महिनाअखेर आम्ही नामचे बझार येथें पोचलों. पाऊस संपला होता आणि आकाश निरभ्र व निळें दिसूं लागलें होतें. एव्हरेस्टचा शिखरमाथा अगदीं स्वच्छपणें दिसत होता. पूर्वीं कधींहि मीं इतक्या स्पष्टपणें तो पाहिला नव्हता. वाऱ्यानें बर्फ वाहून गेल्यामुळें एव्हरेस्टवरील काळा खडक स्पष्ट दिसत होता आणि शिखराचें शुभ्र टोक आकाशांत डोकें खुपसून उंच उभें होतें.

खुंबू ग्लेशियरच्या वरच्या भागांत आम्हीं आमचा तळ टाकला; आणि

एव्हरेस्ट व नप्से शिखरांमधील भागांतून कोसळणाऱ्या बर्फाच्या त्या प्रचंड लोंढ्यांतून मार्ग काढूं लागलों. गेल्या उन्हाळ्यांत आम्ही येथें आलों होतों. त्या वेळीं आम्हांस या लोंढ्यांतून मार्ग काढणें फार त्रासाचें गेलें होतें. परंतु या वेळीं तें कठीण वाटलें नाहीं.

बर्फाच्या त्या प्रचंड लोंढ्यांतून मार्ग काढून आम्ही वेस्टर्न क्वॅमसध्यें पोचलों. तेथें रात्रंदिवस सोसाट्याचा वारा वाहात होता. एखादा रानटी पशु अंगावर चालून यावा त्याप्रमाणें आम्हाला या वाऱ्याचे असह्य तडाखे मिळूं लागले. थंडी कडाक्याची होती. तरीहि आम्ही वर चढत होतों. आमच्याजवळचीं साधनें चांगलीं होतीं, म्हणूनच आम्हांस तें शक्य झालें.

ऑक्टोबरच्या अखेरीस आम्ही ल्होत्से शिखराच्या तोंडाशीं पोचलों आणि साऊथ कोलवर जाण्याच्या कठीण प्रयत्नास प्रारंभ केला. पण सुरुवातीलाच तुकडीचा नेता मि. शेवली आणि मिंगमा दोर्जे व इतर कांहीं शेरपांना एक उंच चढ चढतांना प्राणघातक अपघात झाला. त्यांतील मिंगमा दोर्जे अखेर मरण पावला. त्यामुळें तुकडींतील इतर शेरपा बिथरले. स्विससाहेबांनाहि ती गोष्ट फार लागली. परंतु सर्व शेरपांनीं आपल्या साहेबांना अर्ध्या वाटेंत सोडून न जातां शेवटपर्यंत त्यांच्याबरोबर साथ देण्याचें ठरविलें.

आणखी अपघात होऊं नयेत म्हणून साऊथ कोलकडे जाणारा कमी धोक्याचा रस्ता शोधून काढला. हवा अधिकच वाईट होऊं लागली. त्यामुळें आमच्यांतील कित्येक लोक मनानें आणि शरीरानें थकत चालले. शेरपांचें तर या मोहिमेंतून मन उडालें व माघार घेण्याची भाषा ते बोलूं लागले.

याच वेळीं आमच्यापैकीं एका शेरपा पोर्टरला ' येती ' दिसल्याचें त्यानें सांगितलें. त्या शेरपानें दिलेल्या माहितीनुसार हा येती चार ते पांच फूट उंच होता. त्याचे केस तपकिरी व जाड बटबटीत होते. मागील दोन पायांवर तो ताठपणें चालला होता. मस्तक पुढें निमुळतें, जबडा मोठा व गालफडांचीं हाडें रुंदट होतीं. तो शेरपापासून अगदीं जवळ होता. जबडा क्रूरपणानें वासून तो त्याच्याकडे नजर रोखून पाहात होता. परंतु इतक्यांत सर्पाप्रमाणें जोरानें फुसकारून त्यानें पाठ फिरविली आणि तो पळून गेला.

येती हा एक मोठ्या माकडाप्रमाणें हिमपर्वतावर राहणारा पशु आहे या माझ्या मताला त्या शेरपाच्या या माहितीनें पुष्टीच मिळते.

१९ नोव्हेंबरला सकाळीं आम्ही साऊथ कोलच्या दिशेनें चालूं लागलों; आणि सायंकाळीं तेथें पोंचलों. एकाच वर्षांत दुसऱ्यांदां मी तेथें आलों होतों. रात्र तेथेंच काढली. भयंकर थंडी व झंझावात होता. ताशीं साठ मैलांच्या वेगानें वारा वाहात होता. अशाहि परिस्थितींत दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही पुढें जावयास निघालों. परंतु आमची ही झुंज व्यर्थ होती. वारा दम खाऊं देत नव्हता. हातांत एकावर एक असे तीन तीन मोजे घातले होते तरी बोटें लाकडासारखीं झालीं होतीं. ओठ, नाक आणि सारा चेहरा थंडीनें काळानिळा पडूं लागला. आमच्या-बरोबरच्या पुष्कळांचा धीर सुटला. आम्हीं परत जावयाचें ठरविलें. लॅंबर्ट व माझ्या दृष्टीनें हा निर्णय अधिक दुःखदायक होता. कारण आम्ही दोघांनीं एकत्र एव्हरेस्टवर पोंचण्याचें स्वप्न त्यामुळें कायमचें अपुरें राहिलें. मन इतकें खिन्न झालें होतें कीं, लॅंबर्ट व मी एकमेकांकडे पाहण्याचें धारिष्टहि करूं शकलों नाहीं. मूकपणें आम्ही परत फिरलों आणि खालीं उतरूं लागलों. एव्हरेस्टनें आम्हाला चांगलाच मार दिला.

परंतु आमच्या निराशेंतहि अभिमानाची झांक होती. कारण शरद् ऋतूच्या भीषण थंडींत आणि वादळी हवेंत आम्ही मानवशक्तीच्या मर्यादेबाहेर काम केलें होतें.

आम्ही जणू एव्हरेस्टवर विजय मिळवून आलों आहोंत अशा प्रकारचें आमचें स्वागत काटमांडूंत नेपाळचे राजे त्रिभुवन यांनीं केलें. त्यांनीं 'नेपाळ प्रतापवर्धक ' हें बहुमानाचें पदक मला दिलें.

* *

## आणि शेवटचा सातवा प्रयत्न : १६ :

एका वर्षांत एव्हरेस्टवरील दोन स्वाऱ्यांत भाग घेण्याच्या माझ्या 'आचरट'पणामुळें मी आजारी पडलों. १९५२ च्या डिसेंबरमध्यें एव्हरेस्ट-

वरील माझ्या सहाव्या मोहिमेवरून परत आल्यानंतर मला तापानें पछाडलें. स्विस साहेबांनीं मला काटमांडूहून विमानानें पाटण्यास आणून हॉस्पिटलमध्यें दाखल केलें. खूप अशक्तपणा आला होता. सोळा पौंड वजन घटलें. बोलायचेंहि त्राण उरलें नव्हतें. मी दार्जिलिंगला परत घरीं आलों तेव्हां मला पाहून आंग लहामूला धक्काच बसला.

१९५२ मधील एव्हरेस्टवरील आमच्या दोन मोहिमांचा लौकिक सर्व जगभर पसरला. लौकरच उन्हाळ्यांत पर्वतावर होणाऱ्या निरनिराळ्या परदेशीयांच्या मोहिमेंत सामील होण्याचीं कित्येक निमंत्रणें मला आलीं. ब्रिटिशांच्या एव्हरेस्टवर जाणाऱ्या तुकडींत दाखल होण्याचें असेंच एक आमंत्रण मी आजारी अवस्थेंत असतांनाच मला मिळालें. गेल्या वर्षीं ज्यांनीं एव्हरेस्टवर पोचण्याचे दोन महत् प्रयत्न केले त्या स्विस गिर्यारोहकांबरोबर पुन्हा तिसऱ्यांदा जावयास मिळालें असतें तर मला अधिक आनंद झाला असता. पण स्विस या वर्षीं जाणार नव्हते. आतां ब्रिटिशांची पाळी होती. त्यांनीं खूप जय्यत तयारी केली होती. कारण ब्रिटिशांना पुन्हा एव्हरेस्टवर जाण्याची लवकर संधि मिळणार नव्हती आणि या मुदतींत फ्रेंच किंवा स्विस आणि तिबेटमार्गें रशियन या शिखरावर पोचण्यांत यश मिळवतील अशी त्यांना भीति वाटत होती.

मला निमंत्रण तर आलें होतें. परंतु स्विससाहेबांबरोबर जावयास मिळत नाहीं म्हणून मन उल्हसित नव्हतें. ब्रिटिशांपेक्षां मला स्विस अधिक आवडतात. कारण ते शेरपांशीं बरोबरीच्या नात्यानें व बंधुभावानें वागतात. ब्रिटिश लोक स्वभावानें मायाळू व न्यायी असले तरी एक प्रकारचा तुटकपणा त्यांच्या वागण्यांत अनुभवास येतो आणि त्यांच्यांत व आमच्यांत कांहींतरी दुरावा आहे याची जाणीव ते करून देत असतात.

परंतु ही संधि गमाविली तर कदाचित् पुन्हा कधींच एव्हरेस्टवर जावयास मिळणार नाहीं या भीतीनें मी शेवटीं ब्रिटिशांच्या तुकडींत सामील होण्यास राजी झालों. एव्हरेस्टवर जाण्याची ही माझी सातवी खेप होती. आम्हा शेरपा लोकांत सात हा आंकडा शुभ समजला जातो.

माझ्या प्रकृतीचा प्रश्न होताच. प्रकृतीच्या अशा दुबळ्या अवस्थेंत मी एव्हरेस्टवर निघालों होतों हें आंग लहामूला मुळींच पसंत नव्हतें. तिचें व

माझें या विषयावर फार भांडण झालें. " मरावयाचें असेल तर तुझ्या या झोपडींत मरण्यापेक्षां एव्हरेस्टवर मरण आलें तर त्यांत काय वाईट ? " असें मीं जेव्हां शेवटीं निक्षून सांगितलें तेव्हां तिनें मला परवानगी दिली आणि " विजयी होऊन याल " अशी शुभेच्छाहि व्यक्त केली. ब्रिटिश तुकडींतून जाण्याचा निर्णय घेतला तेव्हांपासून या वेळच्या आपल्या प्रयत्नांत तरी आपणास यश येईल कीं नाहीं या विचारानें मन व्यग्र असे. या सातव्या प्रयत्नांत " करेन किंवा मरेन " असा मनाचा निर्धार केला आणि पुढच्या तयारीस लागलों.

आमच्या बरोबर येण्यासाठीं अनुभवी व निवडक अशा वीस शेरपांची तुकडींत भरती केली. चाळिशी ओलांडलेला माझा जुना दोस्त दावा थोंडुप त्यांत होता. शिवाय माझा तरुण पुतण्या तोपगे व भाचा गोंबू यांनाहि बरोबर घेतलें. तुकडीचा सरदार व प्रत्यक्ष शिखरावर चढणारा गिर्यारोहक हीं दोन्हीं कामें मला या वेळीं करावयाचीं होतीं.

१, मार्च १९५३ रोजीं आम्हीं दार्जिलिंग सोडलें. या वेळीं आम्ही एव्हरेस्ट शिखर निश्चित गांठणार या कल्पनेमुळें आम्हाला थाटानें निरोप देण्यांत आला. माझा बंगाली दोस्त रवि मित्र यानें एक भारताचा छोटासा राष्ट्रध्वज व धाकट्या निमानें एक लाल-निळ्या पेन्सिलीचा तुकडा बरोबर नेण्यासाठीं मजजवळ दिला आणि एव्हरेस्टच्या माथ्यावर तो ठेवून येण्यास बजावून बजावून सांगितलें.

आम्ही काटमांडूस पोचलों तेव्हां आमच्या तुकडींतील ब्रिटिश सहकारी आमच्यांत सामील झाले. कर्नल हंट हा तुकडीचा नेता होता. त्याच्याबरोबर मेजर विली, हिलरी, टॉम बोर्डिलॉन, डॉ. चार्ल्स ईव्हान्स वगैरे नऊ गिर्यारोहक होते. यांपैकीं हिलरी व आणखी एकजण न्यूझीलंडमधील आणि इतर ब्रिटिश प्रजाजन होते. याशिवाय एक डॉक्टर, एक विज्ञानपंडित आणि एक चलत्छाया-चित्रकार होता.

दुर्दैवानें मोहिमेच्या प्रारंभापासूनच शेरपा व आमच्या तुकडींतील साहेब यांच्यांत गैरसमज व वाद सुरू झाला. काटमांडू येथें शेरपांची झोपण्याची व्यवस्था एका मोटर गॅरेजमध्यें करण्यांत आली होती आणि साहेबांनीं आपली व्यवस्था ब्रिटिश वकिलातीच्या जागेंत केली होती. त्याबद्दल कुरबूर सुरू

झाली. मीं कशीबशी त्यांची समजूत काढली आणि त्यांना गप्प केलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर तोंड धुण्याची वगैरे व्यवस्था चांगली नव्हती म्हणून त्यावरून कटकट झाली. गिर्यारोहकास देण्यांत येणारे कपडे, गॉगल्स इत्यादि वस्तु पुढें सोलोखुंबूस पोंचल्यावर देण्यांत येतील असें कर्नल हंटनें सांगितलें तेव्हां तर शेरपांमध्यें फारच असंतोष माजला. अन्नावरूनहि तक्रारी होत होत्या. मी या कटकटींना अगदीं विटलों होतों.

हा मनःस्ताप जरी चालू होता आणि प्रकृति जरी दुबळी झाली होती तरी पर्वत चढतांना मला नेहमींइतकाच उत्साह वाटत होता. जसजसे दिवस जात होते तसतसा अधिक जोम मला अनुभवास येत होता.

२५ मार्चला आम्ही नामचे बझारला पोंचलों तेव्हां थामेहून माझी आई आणि इतर आप्तेष्ट मला निरोप देण्यासाठीं आले होते. त्या दिवशीं आम्हीं सर्वांनीं खूप गंमत केली. नाच, गाणीं आणि थोडी चँग (शेरपा दारू) यांचा मनमुराद आस्वाद सर्वांनीं घेतला.

थ्यांगबोचे मठापाशीं आम्ही पोंचलों तेव्हां पुन्हा एकदां शेरपांनीं साहेबांशीं कपडे आणि गिर्यारोहणाच्या इतर वस्तूंवरून हुजत घातली. शेवटीं कांहींतरी तोड निघाली आणि वाद मिटला. परंतु आमच्यांतील दोन शेरपांचें समाधान होऊं शकलें नाहीं आणि ते परत निघून गेले.

माझें या क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष लागेना. मला एव्हरेस्टचा ध्यास लागला होता. त्याचें आव्हान मीं स्वीकारलें होतें. या वेळेस आपण एव्हरेस्टवर पोंचूं शकलों नाहीं तर तें पुनरपि कधींहि जमणार नाहीं अशी माझी खात्री होती. म्हणून माझें सर्व ध्यान त्या शिखराकडे लागलें होतें.

* *

## बस्स, आतांच नाहीं तर कधींच नाहीं ! : १७ :

साहेब व मोहिमेंत सामील झालेले इतर शेरपा यांच्यांत प्रारंभीं थोड्या कटकटी झाल्या तरी पुढें त्या मिटल्या आणि वातावरण शांत झालें. आमची तुकडी प्रचंड होती आणि तिची व्यवस्थाहि उत्तम होती. एखाद्या

लष्करी तुकडीसारखें करड्या शिस्तीनें आपलें काम चालावें असें कर्नल हंटला वाटे. परंतु हंटची वागणूक समजदार व न्यायाची असे. इतर गिर्यारोहक साहेबहि स्वभावानें मायाळू व चांगले होते.

एखाद्या लहानशा चालत्या गांवाएवढी आमची तुकडी होती. गिर्यारोहकाच्या जोडीला शेंकडों शेरपा व शेरपाणी तुकडींत होत्या. तंबू, वैद्यकीय साधनें, ऑक्सिजनचीं सिलिंडर्स, रेडियो व फोटोग्राफीचें सामान, अन्न आणि गिर्यारोहणाचीं अनेक साधनें यांचे कित्येक बोजे आम्ही वर वाहून नेत होतों.

आंग लहामू आणि माझा दोस्त श्री. मित्र यांचीं बहुधा दर आठवड्यास पत्रें येत असत. पण तीं मनाला बेचैन करणारीं असत. घरच्या दारिद्र्याची रडकथा त्यांत असे. “ पैसा ! पैसा ! ” जगाच्या सर्वोच्च माथ्यावरसुद्धां या पैशानें माझा पिच्छा पुरविला होता. परंतु एकदां पर्वतावर गेलों कीं, मला घरदार, बायको-मुलें या सर्वांचें विस्मरण होतें. म्हणून त्या पत्रांचें मला कांहीं वाटलें नाहीं. मला एकच गोष्ट दिसत होती. एव्हरेस्ट !

माझी वैद्यकीय तपासणी झाली आणि मला प्रत्यक्ष गिर्यारोहकांत सामील होण्यास लायक ठरविण्यांत आलें व एव्हरेस्ट शिखरावर जाण्याची मला संधि मिळाली. डॉ. ईव्हान्स व बोर्डिलॉन यांची एक व हिलरी व मी अशी दुसरी तुकडी बनविण्यांत आली. आम्ही एव्हरेस्टवर पोचण्यांत अयशस्वी झालों तर मग तिसऱ्या तुकडीनें प्रयत्न करावा असें ठरलें.

मला मिळालेल्या संधीमुळें मी कमालीचा खुष झालों. परंतु आमच्या इतर शेरपांनीं मात्र मला वेड्यांत काढलें. मी एव्हरेस्टमाथ्यावर जाण्याचें धाडस करूं नये असें त्यांना वाटत होतें. मी त्यांत मरेन असा त्यांनीं मला धाक घातला. त्यांना अशीहि दुसरी भीति वाटत होती कीं, या वेळीं एव्हरेस्टवर चढण्यांत यश मिळालें तर यापुढें साहेब लोकांच्या अधिक तुकड्या त्यावर चढण्यास येणार नाहींत आणि आपला शेरपांचा धंदा मात्र बसेल. मीं त्यांच्याशीं अधिक वाद घातला नाहीं. “ तुम्ही मूर्ख आहांत; मृत्यूची बायकांसारखी काळजी काय करीत बसतां ? आणि धंदा बुडणार नाहीं. उलट एव्हरेस्टची कीर्ति जगभर पसरेल आणि कित्येक नवे लोक येथें येऊं लागतील. ” एवढें म्हणून मी माझ्या कामास लागलों.

हिलरी व मी एकत्र होतों. हिलरी एक जबरदस्त गिर्यारोहक आहे. प्रचंड ताकद व चिवटपणा त्याच्या अंगीं आहे. तो इंग्रजांप्रमाणें कमी बोलणारा आहे; पण स्वभावानें मोठा छान व उत्साही आहे. शेरपांत तो प्रिय होता. कारण त्यांच्याबरोबर तो जेवत व राहात असे. आमची जोडी मोठी गंमतीदार दिसे. सहा फूट तीन इंच उंचीचा हिलरी आणि फक्त पांच फूट आठ इंच उंचीचा मी !

ल्होत्से शिखर ओलांडून तीन आठवड्यांनंतर जिनेव्हा स्परच्या मार्गाला आम्ही लागलों. उंच, अधिक उंच आम्ही जात होतों. आमच्या-पैकीं मायकेल वेस्ट मॅकॉट व जॉर्ज बँड हे दोन नवे तरुण गिर्यारोहक होते. त्यांना उंचीवरील वातावरणाचा त्रास होऊं लागला म्हणून ते पुन्हा खालीं येऊन थांबले. नवे गिर्यारोहक कितीहि वाकबगार आणि सशक्त असले तरी प्रथम त्यांना असा त्रास होतोच.

मला असलेल्या ‘ तिसऱ्या ’ फुफ्फुसामुळें मी मात्र व्यवस्थित होतों. पर्वतावर उंच ठिकाणीं होणारा त्रास मला फारसा होत नाहीं याचें कारण मी तेथें कांहीं ना कांहीं तरी धडपड करीत असतों. एक मिनिट स्वस्थ बसत नाहीं. त्यामुळें माझ्या धमन्यांतील रक्तप्रवाह सतत जोरानें चालू राहतो. म्हणून इतरांप्रमाणें मला कधीं ओकाऱ्या होत नाहींत किंवा माझें डोकें दुखत नाहीं कीं झोपेची तक्रार नसते. इतरांप्रमाणें तहान मात्र सपाटून लागते. पण बर्फ किंवा बर्फाचें पाणी पिऊन मी ती भागवीत नाहीं. कारण त्यामुळें घशाला अधिकच कोरड पडते. लिंबरसाची भुकटी गरम पाण्यांतून मी घेतों.

ल्होत्से फेसच्या दिशेनें आम्हीं बरेंच अंतर काटलें आणि साऊथ कोलच्या वाटेवर नंबर सहा व सातच्या छावण्या टाकल्या. एकंदरीनें आमचा प्रवास ठीक चालला होता. २० मे ला प्रत्यक्ष साऊथ कोल ओलांडण्यासाठीं एक तुकडी पुढें निघाली.

बोर्डीलिन व ईव्हान्स यांची तुकडी २३ मे रोजीं वेस्टर्न क्वासमधून एव्हरेस्ट शिखरमाथ्यावर जाण्यासाठीं निघाली. त्यांच्या मदतीस कर्नल हंटची तुकडीहि निघाली. ती तेथें पोचण्यांत अयशस्वी झाली तर हिलरी, मी, लो व ग्रेगरी यांच्या तुकडीनें तो प्रयत्न पुन्हा करावयाचा असें ठरलें

होतें. म्हणून बोर्डोलिनच्या तुकडीनंतर दोन दिवसांनीं आम्हीहि निघालों.

बर्फ खोदण्याच्या माझ्या कुऱ्हाडीभोंवतीं इंग्लंड, यूनो, नेपाळ व भारत अशीं चार निशाणें गुंडाळून घेतलीं. दिवसभर चढून गेल्यावर रात्रीं सातव्या छावणींत आम्हीं मुक्काम केला. सकाळीं उठलों तेव्हां हवा निवळ आणि चांगली होती. बोर्डोलिन व ईव्हान्स आमच्यापेक्षां अधिक उंचीवर दक्षिण एव्हरेस्टच्या शिखराखालीं पोंचले होते. दोन काळे लहानसे ठिपके त्यांचें तेथील अस्तित्व दाखवीत होते. थोड्या वेळानें ते ठिपके दिसेनासे झाले. आम्ही आमचा मार्ग आक्रमीत होतों. ल्होत्से फेस, जिनेव्हा स्परचें उंच टोक आणि त्यानंतर साऊथ कोलच्या खालीं थोड्या अंतरावर आमची तुकडी पोंचली. तेथें आठवी छावणी होती. थोड्या वेळानें साऊथ कोलवर आम्ही पोंचलों. तेथें कर्नल हंट भेटले. ते भयंकर थकले होते. बोर्डोलिन व ईव्हान्सच्या तुकडीसाठीं आणि मागाहून येणाऱ्या हिलरी व माझ्यासाठीं २७,३५० फूट उंचीवरील नवव्या छावणींत त्यांनीं ऑक्सिजनचीं साधनें आणि इतर सामान वाहून नेलें होतें. परंतु अधिक उंचावर जाणें त्यांना अशक्य झालें आणि ते तेथूनच परत फिरले. परत येतांना त्यांच्याजवळ ऑक्सिजन नव्हता. म्हणून ते अतिशय थकून गेले होते. बोर्डोलिन व ईव्हान्स त्यामुळें आतां एकटेच वर राहिले होते.

आम्ही त्या दोघांच्या वाटेकडे डोळे लावून खालीं बसलों होतों. शेवटीं दोन प्रहरीं आमच्या छावणीच्या दिशेनें पर्वताच्या उतारावरून कोणी तरी दोन आकृति येतांना आम्हीं दूर अंतरावर पाहिल्या. ते बोर्डोलिन व ईव्हान्स होते. खालीं आल्यावर आपण मुख्य एव्हरेस्ट शिखरावर पोंचूं शकलों नाहीं असें मोठ्या खेदानें त्यांनीं सांगितलें. दक्षिण एव्हरेस्ट शिखरावर ते पोंचूं शकले. तेथून मुख्य शिखरमाथा केवळ तीन-चारशें फूट अंतरावर असेल. परंतु रात्र झाली होती. ते त्या शिखरावर पोंचूं शकले असते; मात्र जिवंत परत आले नसते. "ठीक आहे. आम्ही नाहीं तरी तूं व हिलरी निश्चितपणें तेथें पोंचाल" असें म्हणून त्या दोघांनीं आम्हाला प्रोत्साहन दिलें. ते कमालीचे निराश झाले होते. पण माणसाचें मन पर्वतावर मोठें होतें. त्यांनीं आमचें शुभचिंतन केलें आणि ते दोघे परत खालीं गेले.

त्यांच्या शुश्रूषेसाठीं हंटहि खालीं गेला. आतां मी, लो, हिलरी, ग्रेगरी आणि नियमा व पेम्बा असे सहाजण फक्त राहिलों.

हवा खराब होती म्हणून आम्ही त्या दिवशीं पुढें जाऊं शकलों नाहीं. सोसाट्याच्या वाऱ्यांत व कडाक्याच्या थंडींत आम्हीं ती रात्र तंबूत काढली. अर्धवट जागृत व अर्धवट झोपेच्या अवस्थेंत ती रात्र गेली. मनांत जुन्या स्मृति आणि अनेक विचार यांची गर्दी झाली होती... "सातव्यांदा मी एव्हरेस्टवर येत आहें. आतां मात्र पुरें. या वेळीं तेथें पोचलेंच पाहिजे. माझें प्रिय एव्हरेस्ट...जणू तें एक रणक्षेत्र आहे. आजवर कित्येक शूर गिर्यारोहकांनीं तेथें आत्मार्पण केलें आहे..." मला माझ्या मातापित्यांची, आंग ल्हामूची आणि लाडक्या लेकरांची आठवण झाली. मी परमेश्वराची प्रार्थना करीत असल्याचाहि मला भास झाला...आणि अखेर सोलोखुंबूं-तील माझें घर, त्या यॅक गाई यांच्या आकृति नजरेसमोर तरळूं लागल्या. एक पांढरा शुभ्र अश्व मला दिसला. शेरपा समजुतीप्रमाणें तें शुभचिन्ह होतें. आणि त्या अश्वामागें उंच अवकाशांत तें उत्तुंग धवल स्वप्न—एव्हरेस्ट—दिसूं लागलें आणि २८ मेला सकाळीं जागा झालों तेव्हां खरोखरीचें एव्हरेस्ट समोर दिसत होतें. आम्हीं एकमेकांकडे पाहिलें आणि मूकपणानें म्हटलें, " आज तेथें गेलेंच पाहिजे ! "

* *

## स्वप्नपूर्ति ! : १८ :

मे २८.....एक वर्षापूर्वीं बरोबर याच दिवशीं मी व लॅबर्टनें एव्हरेस्ट-माथ्यावर पोचण्याचा अखेरचा प्रयत्न केला होता. पुन्हा त्याच दिवशीं एक वर्षानंतर आम्ही तोच प्रयत्न करीत होतों. आतां फक्त एक दिवसाचा प्रवास शिल्लक होता. परंतु एक दुःखद घटना घडली. आमच्या बरोबरच्या तीन शेरपांपैकीं पेम्बा आजारी पडला आणि तो माघारीं गेला. दुसरा एकजण आदल्या दिवशींच गेला होता. आतां फक्त एक शेरपा — आंग नियमा शिल्लक राहिला होता.

त्यामुळें तो शेरपा, मी, हिलरी, ग्रेगरी, लो असे पांचजण शेवटीं राहिलों. सर्व सामानाचे बोजे आम्हालाच वाहून न्यावे लागणार होते आणि त्यामुळें आमचें काम अधिक कष्टदायी आणि आमची गति अधिक सावकाश होणार होती. पण आतां दुसरा मार्ग नव्हता. सकाळीं ९ वाजतां आम्ही प्रवासास निघालों. लो, ग्रेगरी व आंग नियमा यांनीं प्रत्येकीं चाळीस-चाळीस पौंडांचे बोजे व ऑक्सिजन सिलिंडर्स पाठीवर घेतले आणि ते पुढें गेले. त्यांच्या मागोमाग एक तासानें हिलरी व मी निघालों. प्रत्येकीं पन्नास पौंड वजनाचे सामानाचे बोजे पाठीवर घेऊन आम्ही चाललों होतों.

आमच्या पुढें गेलेल्या लो, ग्रेगरी यांच्या तुकडीनें बर्फाच्छादित खडकावर कुऱ्हाडीनें पायऱ्या खोदून ठेवल्या होत्या. यामुळें आम्हाला वर चढतांना कमी त्रास होत होता. दुपारच्या सुमारास आम्हीं पहिल्या तुकडीला गांठलें. एका उंच डोंगररांगेच्या कड्याशीं आम्ही पोंचलों. आम्ही मार्ग आक्रमीत होतों. त्या कड्याचा चढ अधिकच वाढत होता. त्यामुळें आमची गति मंदावली होती. पायाखालचा बर्फाचा थर अधिकच टणक होत होता. त्यामुळें आम्ही फार थकून गेलों. कुठेंतरी विश्रांतीसाठीं थांबावें असें आम्हीं ठरविलें. आम्ही एके ठिकाणीं थांबलों.

२७,००० फूट उंचीवर आम्ही आलों होतों. लो, ग्रेगरी व आंग नियमा यांनीं येथें आमचा निरोप घेतला आणि ते खालीं परतले. आतां मी व हिलरी दोघेच उरलों. जगांतील चौथ्या क्रमांकाचें उच्च शिखर–ल्होत्से आमच्या खालीं दिसत होतें. तिकडे आग्नेय दिशेला खालीं मकालू दिसत होतें. दूर पूर्वेकडे दिसणारें उंच कांचनगंगा शिखर सोडलें तर आमच्या आसमंतांतील शेंकडों मैलांवरील सर्व कांहीं आम्ही जेथें होतों त्याच्या कितीतरी खालीं होतें.

काळोख पडूं लागला तेव्हां आम्ही रात्रीच्या मुक्कामासाठीं जागा शोधूं लागलों. एका ठिकाणीं मोठ्या मुष्किलीनें तंबू ठोकला. सुदैवानें वारा फार सोसाट्याचा नव्हता. आम्ही रांगत रांगत तंबूंत शिरलों. आमच्याजवळचा छोटासा स्टोव्ह पेटवला आणि गरम कॉफी व लिंबाच्या भुकटीचें गरम

सरबत बनविलें. आम्हांला भयंकर तहान लागली होती. आम्ही गटागटा सरबत व कॉफी प्यालों.

अर्धवट झोपेंत आणि जागेपणांत रात्र काढली. बाहेर निवान्त वातावरण होतें. वारा मुळींच नव्हता. मनांत परमेश्वराचे आणि चोमोलुंगमाचे आभार मानले.

२९ मे उजाडली. याच दिवशीं एक वर्षापूर्वी लॅंबर्ट व मी पराभव पत्करून एव्हरेस्टवरून परतलों होतों याची मला आठवण झाली.

पहाटे साडेतीन वाजतां आम्ही अंथरुणावरून उठलों; स्टोव्ह पेटवला आणि कॉफी व सरबतासाठीं बर्फ वितळवून पाणी केलें.

तंबूच्या बाहेर पाहिलें तों आकाश निरभ्र व शांत होतें. अजून वारा वाहूं लागला नव्हता. खालीं थ्यांगबोचेचा मठ दिसत होता. हिलरीला तो दाखविला आणि मनांत प्रार्थना केली, “ आज आमच्यावर कृपा कर. ”

आम्ही पुढील प्रवासासाठीं सिद्ध झालों. पण हिलरीचे बूट टणक बर्फानें पार आच्छादून गेले होते. रात्रीं त्यानें ते उशाशीं ठेवले होते तेव्हां त्यावर बर्फ दाटलें होतें. पेटत्या स्टोव्हवर ते एक तासभर धरले तेव्हां त्यावरचें बर्फ वितळलें.

सकाळीं साडेसहा वाजतां तंबूबाहेर आम्ही पडलों. आकाश अजूनहि स्वच्छ होतें. वारा वाहात नव्हता. एकावर एक असे तीन हातमोजे आम्हीं हातावर घातले. बुटाच्या तळाला क्रॅम्पनूस ( तीक्ष्ण खिळे असलेलें पोलादी आवरण ) चढविलें. पाठीवर चाळीस पौंड वजनाचें ऑक्सिजनचें यंत्र घेतलें. हातांत बर्फ खोदण्याची कुऱ्हाड होती. त्याभोंवतीं चार निशाणें घट्ट बांधलेलीं होतीं. जाकिटाच्या खिशांत निमानें दिलेली लाल निळी पेन्सिल घेतली.

“ चला, झाली सारी तयारी ? ” आम्हीं एकमेकांना विचारलें आणि चालूं लागलों.

हिलरीच्या बुटांचा टणकपणा अजून गेला नव्हता आणि त्याचे पायहि थंडीनें गारठलेले होते, म्हणून मी पुढें झालों. तो माझ्या हातांत धरलेल्या दोरखंडाला पकडून माझ्यामागून चढत होता. आग्नेयीकडील डोंगररांगेच्या वरील टोकावरून आम्ही एव्हरेस्टच्या दक्षिणशिखराच्या दिशेनें पुढें जात

होतों. एका वर्षापूर्वी लॅम्बर्ट व मी येथपर्यंत पोंचलों होतों. त्या वेळीं हवा किती तरी खराब आणि कडाक्याची थंड होती. परंतु या वेळीं मात्र दैवानें खैर केली. स्वच्छ चकचकीत ऊन पडलें होतें. हिलरीचे बूट आतां नरम झाले होते. त्यामुळें तो आतां पुढें झाला व मी मागें गेलों. आळीपाळीनें आम्ही अशा प्रकारें जागा बदलत होतों.

एव्हरेस्टच्या दक्षिण शिखरमाथ्याच्या टोकावर ता. २९ ला सकाळीं ९ वाजतां आम्ही पोंचलों. बोर्डोलिन व ईव्हान्स येथपर्यंत पूर्वी पोंचले होते. दहा मिनिटें आम्ही तेथें थांबलों. तेथून फक्त ३०० फुटांचा डोंगर-रांगेचा कडा चालून गेल्यावर आम्ही एव्हरेस्टच्या मुख्य शिखरावर पोंचणार होतों. परंतु ते ३०० फूटच अवघड होते. अति अरुंद आणि चढ असलेल्या कड्यावरून चालावयाचें होतें. उजव्या किंवा डाव्या बाजूस किंचित् जरी तोल गेला तरी कपाळमोक्ष झाला असता असा तो कडा होता.

आम्ही दक्षिण शिखरावरून प्रथम थोडें खालीं उतरून नंतर मुख्य शिखराच्या दिशेनें वर चढूं लागलों. पायाखालील बर्फ घसरण्याचें सतत भय वाटत होतें. हवा अजून तरी छान होती. आम्ही थकलों नव्हतों. परंतु श्वासोच्छ्वासास मात्र दोघांनाहि त्रास होत होता. हिलरीनें नंतर एके ठिकाणीं सांगितलें त्याप्रमाणें मला अधिक त्रास होत होता हें मात्र खरें नाहीं.

हळूहळू थांबत थांबत आम्ही तो कडा ओलांडून जात होतों. प्रत्यक्ष मुख्य शिखरमाथ्यावर पोंचण्याच्या मार्गांत आतां फक्त एकच अडथळा उरला होता. खडकाचा एक उंच सुळका आमच्या वाटेंत उभा होता. तो ओलांडून किंवा त्यास वळसा घालून गेलों कीं, आम्ही शिखरावर पोंचणार होतों. सुळक्याच्या आणि आमच्यामध्यें एक अति अरुंद व चढ असलेली वाट होती. हिलरी पुढें झाला. अतिशय काळजीपूर्वक व सावकाश चढून तो त्या वाटेवरील एका उंचवट्यावर चढला व त्यानें धरलेल्या दोरखंडाला धरून मीहि त्या उंचवट्यावर चढलों. एव्हरेस्ट विजयानंतर हिलरीनें एके ठिकाणीं सांगितलें कीं, त्यानें मला वर जवळ जवळ ओढून घेतलें आणि



एव्हरेस्टच्या शिखरावर तेनसिंग. २९ मे १९५३

मी तेथें गेलों तेव्हां माझी अगदीं दमछाट झाली होती. परंतु तें खरें नाहीं. मी स्वतः त्याच्या हातांतील दोरखंडावरून चढून वर गेलों होतों.

मोठ्या प्रयासानें शेवटीं आम्हीं तो सुळका पार केला. आम्ही दोघेहि चांगलेच थकलों होतों. श्वासोच्छ्वास करतांना आम्हाला आतां त्रास होऊं लागला. परंतु थोडा ऑक्सिजन घेतल्यावर पुन्हा निर्वेधपणें श्वास घेतां येऊं लागला. मीं वर नजर टाकली. आतां शिखर अगदीं समीप आलें होतें. माझें हृदय आनंदानें धडधडूं लागलें. आम्ही आणखी वर चढूं लागलों. वाटेंत अजूनहि मोठमोठ्या हिमराशी होत्या. त्या एकामागून एक ओलांडून आम्ही वर, अधिक वर चढत होतों. बस्स. आतां फक्त एक हिमराशी वाटेंत होती. शिखराच्या किंचित् खालीं म्हणजे केवळ ३० फूट आम्ही उभे होतों. तेथें क्षणभर थांबलों. हिलरी व मी एका दोरखंडाला धरून वर चढत होतों. हिलरी पुढें आणि मी त्याच्यामागें. फक्त सहा फुटांचें अंतर आमच्यांत असेल. सावधपणें आणि सावकाश आम्ही शिखराच्या दिशेनें वर जात होतों...आणि अखेर आम्ही तेथें पोचलों. हिलरी प्रथम आणि मी त्याच्या लगेच मागोमाग.

अखेर सातव्या खेपेस एव्हरेस्टवर पोचण्यांत मी यशस्वी झालों. "थुजीचे, चोमोलुंगमा !—चोमोलुंगमा मी तुझा ऋणी आहें !"

खालीं परत जाण्याच्या आधीं पुन्हा एकदां आम्ही सभोंवार नजर टाकली. मेलरी व आयर्व्हिनची साहजिकच आठवण झाली. १९२४ मध्यें झालेल्या एव्हरेस्टवर जाण्याच्या प्रयत्नांत ते कुठें तरी बेपत्ता झाले होते. त्यांचीं कुठें कांहीं चिन्हें दिसताहेत का पाहिलें. पण कांहीं नजरेस पडलें नाहीं. आमच्या आधीं जगांतील त्या सर्वोत्तुंग हिमशिखरावर-एव्हरेस्टवर गेल्या तेहतीस वर्षांत कित्येक शूर आणि थोर गिर्यारोहकांनीं चढून जाण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनीं निकराची झुंज दिली. परंतु त्यांना यश येऊं शकलें नाहीं. त्या सर्वांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण झालें. त्यांचे प्रयत्न, अनुभव व ज्ञान यांची शिदोरी आमच्या पाठीशीं होती म्हणूनच आम्ही हें भव्य यश मिळवूं शकलों होतों. खालीं पायथ्याशीं आमच्या तुकडींतील जे अनेक सहकारी आमची वाट पाहात थांबले होते त्यांचीहि आठवण त्या क्षणीं आम्हांस झाली. कारण त्यांच्या मदतीशिवाय

व त्याग आणि कष्टाशिवाय आम्ही येथें पोचूंच शकलों नसतों. आणि प्रिय लँबर्टची तर त्या क्षणीं विलक्षण तीव्रतेनें आठवण झाली. त्यानें दिलेला लोकरीचा स्कार्फ मीं गळ्याभोंवतीं गुंडाळला होता. त्याचें स्मरण झालें तेव्हां माझा हात सहजच त्या स्कार्फकडे गेला.

आम्ही परत खालीं जावयास निघालों. खालीं लौकर पोचण्यास आम्ही अगदीं आतुर झालों होतों. परंतु अतिशय सावधगिरीनें आम्ही उतरत होतों. कारण हिमपर्वतावरील बरेचसे अपघात परत खालीं उतरत असतांनाच होत असतात. कारण शरीर थकलेलें असतें.

खालीं उतरत असतांना जॉर्ज लो प्रथम आम्हांस भेटला. आमच्या मानेभोंवतीं दोन्ही हात टाकून आनंदातिशयानें त्यानें आम्हांस मिठी मारली. गरम गरम कॉफी तयार करून दिली. त्याच्या पाठोपाठ ग्रेगरी, नॉईस, पासांग फुटार आणि शेवटीं हंट हे आमचे सहप्रवासी भेटले. हंटनें आम्हां दोघांना कडकडून आलिंगन दिलें. आणि हर्षयुक्त आश्चर्यानें विचारलें, "तुम्ही सांगतां हें खरें का? खरंच तुम्ही शिखरावर पोचलांत?" हंटनें आनंदातिशयानें मला पुन्हा गदगदून हालविलें. शेरपा आणि साहेब असा भेद जणू नाहींसा झाला होता. आम्ही सर्वजण एकाच जातीचे, गिर्यारोहक जमातीचे म्हणून एव्हरेस्टवर पोचलों होतों.

ती संध्याकाळ माझ्या जीवनामधील सर्वांत सुखद संध्या होती. आमच्या विजयाबद्दल आम्ही सारखे बोलत होतों. आनंदानें पीत होतों, खात होतों, विसावत होतों.

परंतु पुढें ज्यांतून कटकटी व गैरसमज निर्माण होणार होते अशा कांहीं घटना याच वेळीं घडत असल्याची मला जाणीव नव्हती. इंडियन वायरलेसवरून थोड्याच वेळापूर्वी एव्हरेस्टवर पोचण्याचा आमचा प्रयत्न फसला अशी बातमी प्रसृत झाली होती. तथापि नंतर खरी बातमी पाठविण्यांत आली. पण प्रथम ती काटमांडू येथील ब्रिटिश वकिलामार्फत लंडनला पाठविण्यांत आली. त्यामुळें भारतांत आणि इतरत्र एक दिवस ती उशीरा समजली. त्या वेळीं इंग्लंडमध्यें एलिझाबेथ राणीच्या राज्यारोहण–समारंभाची तयारी चालू होती. राणीला ही गोड वार्ता सर्वप्रथम कळावी आणि राज्यारोहणाच्या दिवशीं ती प्रथम जाहीर व्हावी यासाठीं हा सर्व खटाटोप करण्यांत आला



हिलरी आणि तेनसिंग
विजेत्यांची परतीची वाटचाल ३० मे १९५३

असावा. त्यामुळें हिंदुस्थानांतील जनतेस, एवढेंच काय तर ज्यांच्या राज्यांत एव्हरेस्ट आहे त्या नेपाळचे राजे त्रिभुवन यांनाहि ही शुभवार्ता इंग्लंडहून ऐकावी लागली.

मला या प्रकरणाची जाणीव नव्हती. मनांत आणलें असतें तर एखाद्या शेरपाबरोबर आमच्या विजयाची बातमी मी नामचे बझार येथें सर्वांत आधीं पाठवूं शकलों असतों. परंतु मीं तसें केलें नाहीं. कारण मी ब्रिटिशांनीं संघटित केलेल्या तुकडींत होतों. त्यांनीं जोंपर्यंत ती बातमी दिली नाहीं तोंपर्यंत मीं ती फोडणें कधींहि युक्त झालें नसतें. माझ्याबरोबरच्या इतर शेरपांनाहि मीं तसें बजाविलें. माझ्या या 'सभ्यपणा' बद्दल मला नंतर कित्येकांनीं दोष दिला. एव्हढेंच नव्हे तर ब्रिटिशांकडून ही बातमी दाबून ठेवण्यासाठीं मला लांच देण्यांत आली होती असेंहि उठविण्यांत आलें. याहिपेक्षां आणखी एक भयंकर अफवा उठविण्यांत आली होती. ती अशी कीं, आम्ही खरोखर एव्हरेस्टवर पोचलों नव्हतों आणि मीं लांच घेऊन इतर साहेबांबरोबर तेथें पोचल्याची खोटीच बातमी उठविली.

एवढ्या घाईगडबडींत सुद्धां आंग लहासू आणि माझ्या इतर आप्तेष्टांची मला आठवण झाली. "मी आणि एक साहेब एव्हरेस्टवर पोचल्याची वार्ता ऐकून तुम्हाला आनंद होईल अशी आशा आहे" अशा अर्थाचें एक पत्र एका शेरपाबरोबर आंग लहामूला नामचे बझार येथें पाठविलें.

तीस मैल खालीं उतरून आल्यावर थमि येथें पोचलों. माझी आई तेथें माझी वाट पाहात होती. माझ्या विजयाच्या बातमीनें ती खुष झाली. परंतु माझ्या चेहऱ्यावर नजर रोखून तिनें मला विचारलें, "आतां नाहीं ना पुन्हा तेथें जाणार?" तिला चोमोलुंगमाची भीति वाटत असे. कारण त्या शिखराच्या माथ्यावर आकाशी निळ्या रंगाचा व सोनेरी आयाळ असलेला एक सिंह आणि एक सोनेरी रंगाची चिमणी राहते अशी तिची इतरांप्रमाणें समजूत होती.

* *

# थोडें कडू व पुष्कळ गोड : १९ :

थ्यांगबोचे येथें मी पोचलों तेव्हां सर विन्स्टन चार्चिलचा अभिनंदनपर संदेश मला मिळाला. त्यानंतर अभिनंदनाचा माझ्यावर वर्षाव होऊं लागला. नेपाळमधील डोंगरकपारी आणि दऱ्याखोऱ्या पार करून आम्ही दहा दिवसांनीं काटमांडूपासून पन्नास मैल अंतरावर येऊन पोचलों. वाटेंत प्रत्येक ठिकाणीं शेंकडों लोक आमच्या स्वागतासाठीं उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावर प्रचंड उत्साह व आनंद दिसत होता.

वाटेंत कित्येक ठिकाणीं देशी व परदेशी वार्ताहरांच्या टोळक्यांत मी सांपडलों. नाहीं नाहीं त्या प्रश्नांचा माझ्यावर ते भडीमार करीत असत. वार्ताहराशीं सावधपणें बोलण्याची सूचना मला आमच्या तुकडींतील विली-साहेबानें दिली होती. परंतु मी भांबावून जात असें. माझें राष्ट्रीयत्व आणि माझीं राजकीय मतें याबद्दल स्वत:ला हवीं तशीं उत्तरें मिळविण्याचा त्या वार्ताहरांचा प्रयत्न असे. मला वेड लागायची पाळी आली. काटमांडू-पासून जवळ असलेल्या धौलाघाट या गांवीं तर लोकांनीं कहर केला. तेथें नेपाळी लोकांची एक झुंडची झुंड मला भेटायला आली आणि तिनें मला माझ्या सहकाऱ्यांपासून जवळजवळ पळवून नेलें. त्या जमावांतील लोक कम्युनिस्ट होते कीं नाहीं तें मी सांगूं शकत नाहीं. परंतु ते कडवे राष्ट्रवादी मात्र असले पाहिजेत. त्यांनीं मला आमच्या प्रवासासंबंधीं किंवा आम्ही एव्हरेस्टवर कसे चढलों, आम्हांला काय अडचणी आल्या याबद्दल एक प्रश्न विचारला असेल तर शपथ. फक्त माझीं राजकीय मतें व राष्ट्रीयत्व यासंबंधीं मीं कांहींतरी, म्हणजे त्यांच्या इच्छेप्रमाणें सांगावें अशी त्यांची इच्छा होती. मी हिंदी नागरिक नसून नेपाळचा नागरिक आहे व हिलरीच्या अगोदर मी एव्हरेस्ट माथ्यावर पोचलों असें मीं सांगावें असा त्यांचा आग्रह होता. शेवटीं मीं त्यांना खडसावलें, “ आजपर्यंत मी नेपाळी आहें कीं हिंदी आहें याची नाहीं तुम्ही चौकशी केलीत ? आतां कशाला पाहिजे आहे तुम्हांला ही पंचाईत ? माफ करा, आणि मला मोकळे सोडा. मला तुमच्या राजकारणाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. ” पण जमावांतील ते लोक

 क्रमांक ....८४८.... नों. दि. २०/७/२४
२३३४३ आरि २१
९९

ऐकेनात. लोकांची झुंड वाढतच होती. मला अक्षरशः धक्के देऊन, बाजूला ओढून त्यांनीं जमावापासून दूर केलें, आणि माझ्या तोंडीं त्यांना हवीं होतीं तशीं विधानें घालून कांहीं कागदांवर माझ्या सह्या घेतल्या. कागदावर काय लिहिलें होतें याचा मला कांहीं पत्ता नव्हता. मी अक्षरशः वैतागलों आणि ओरडलों, " जर मला असें होणार आहे हें अगोदर माहीत असतें तर यशस्वी गिर्यारोहक होण्यापेक्षां सोलोखुंबूंत गुरें वळत बसलों असतों. "

बोनेपा गांवाजवळ पोचलों तेव्हां तेथें तर लोकांच्या माझ्यावरील त्या भयंकर प्रेमाचा कडेलोट झाला. माझ्या अंगावरचे कपडे उतरवून त्यांनीं नेपाळी कपडे माझ्या शरीरावर चढविले आणि एका जीपमध्यें घालून मला मिरवीत नेलें. मी इतका थकून आणि गोंधळून गेलों होतों कीं, त्यांना हें सारें अविरोधानें करूं दिलें. त्यानंतर प्रत्येक गांवीं प्रचंड जमाव स्वागतासाठीं येत; झेंडे फडकवीत आणि घोषणा देत—"तेनझिंग झिंदाबाद ! तेनझिंग झिंदाबाद !"

या घोषणांनीं आणि स्वागतानें मला बरें वाटत असे यांत शंका नाहीं. परंतु कांहींहि समारंभ व स्वागत न होतां मी शांतपणें परत माझ्या घरीं जाऊं शकलों असतों तर मला अधिक आनंद झाला असता.

काटमांडूपाशीं माझी बायको आंग लहामू आणि मुली पेम पेम व निमा भेटल्या. आंग लहामूनें माझ्या मानेभोंवतीं शुभघटनेची खूण म्हणून एक स्कार्फ बांधला आणि पेम पेम व निमानें गळ्यांत पुष्पहार घातले. निमाला तिची लाल-निळी पेन्सिल मीं एव्हरेस्टवर ठेवून आल्याचें सांगितलें. माझ्या गैरहजेरींत माझ्या कुटुंबाचे आर्थिकदृष्ट्या फार हाल झाले होते. पण त्या कहाणीसंबंधीं विचार करण्यास मला त्या वेळीं सवड कोठें होती ?

काटमांडूंत आमचें भव्य स्वागत झालें. हंट, मी व हिलरी यांना एका रथांत बसवून शहरभर मिरवणूक काढण्यांत आली. गुलाल व बुक्का आणि नाणीं व भात यांचा आमच्यावर रस्त्यांतून जात असतांना नुसता वर्षाव होत होता. नेपाळचे राजे त्रिभुवन यांच्या प्रासादांत आम्हांस नेण्यांत आलें आणि तेथें राजेसाहेबांनीं आमचा समारंभपूर्वक सत्कार केला. 'नेपाळतारा' हें बहुमानाचें पदक मला व हंट आणि हिलरी यांना दुसरीं मानपदकें देण्यांत आलीं.

राजकारण ! राजकारण ! या राजकारणानें तर कटकटी निर्माण केल्या होत्या. नेपाळी जनतेनें माझें अपूर्व स्वागत केलें आणि शूर पुरुष म्हणून तिनें मला डोक्यावर घेतलें खरें; परंतु माझ्या सहकारी ब्रिटिश गिर्यारोहकांकडे तिनें दुर्लक्ष केलें. अनेक खोट्यानाट्या बातम्या राजकीय हेतूनें पसरावण्यांत आल्या. खरें म्हणजे मी एकटाच एव्हरेस्टच्या शिखरावर पोचूं शकलों; हिलरीला मीं जवळ जवळ वर ओढून घेतलें ही त्यांपैकींच एक अफवा होती. या अफवांनीं सारें वातावरण गैरसमज आणि कटकटींनीं गढूळ होऊन गेलें होतें. कर्नल हंट या प्रकारानें चिडून गेला आणि एकदां तर तो रागानें बोलून गेला कीं, तेनझिंग शूर पुरुष तर काय पण चांगला गिर्यारोहकसुद्धां नाहीं. मीहि त्यामुळें थोडा बिथरलों. माझ्या कानाशीं नेहमीं नेपाळी व हिंदी पत्रकार असत. कांहीं राजकीय मंडळीहि असत. ब्रिटिशांविरुद्ध माझ्याकडून कांहींतरी विधानें करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मी त्याला बळी पडलों आणि चिडून कांहीं विधानेंहि केलीं.

एव्हरेस्टवर पहिलें पाऊल कोणीं टाकलें, मीं कीं हिलरीनें असा एक मूर्खपणाचा प्रश्न मला सतत विचारण्यांत येऊं लागला. एवढेंच नव्हे तर हिलरीच्या आधीं मी पोचलों असें मीं जाहीर करावें असा कांहींजणांनीं आग्रह धरला आणि त्यावर उलटसुलट जाहीर चर्चाहि चालू झाली. शिखरावर आधीं कोण पोचलें हा प्रश्न मूर्खपणाचा व अर्थशून्य आहे. एक सत्य सोडलें तर एव्हरेस्टइतकें उत्तुंग आणि मनोहारी दुसरें काय असूं शकेल ? त्यापुढें असले वाद क्षुद्र होत. पण वस्तुस्थिति सांगितलीच पाहिजे. एव्हरेस्टच्या शिखरटोंकाखालीं थोड्या अंतरावर मी व हिलरी पोचलों. एका दोरखंडास धरून आम्ही शिखर चढूं लागलों. हिलरी पुढें व मी त्याच्यामागें. आमच्यांत फक्त सहा फुटांचें अंतर असेल. आम्ही सावकाश वर चढत होतों. अखेर हिलरी तेथें प्रथम पोचला आणि लगेच पाठोपाठ मीं तेथें पाऊल टाकलें. ही वस्तुस्थिति आहे. हिलरीला मागें ढकलून मी पुढें जावयाचें असें तर मी करूं शकलों नसतों ? मी एव्हरेस्टवर 'प्रथम' पोचलों असें मीं सांगावें असें ज्यांना वाटतें त्यांची या सत्यकथनानें निराशा होईल. परंतु मी एव्हरेस्टच्या प्रतिष्ठेला आणि सत्याला अधिक किंमत देतों.

या वादावर अखेरचा पडदा पाडण्यासाठीं शेवटीं काटमांडूहून मीं व

मराठी ग्रंथ संग्रहालय ८८५० ता. क्र.

हिलरीनें एक पत्रक प्रसिद्ध केलें व त्यांत जाहीर केलें कीं, " आम्ही दोघे जवळ जवळ बरोबरच एव्हरेस्टवर पोचलों." परंतु आमच्या या निवेदनानेंहि लोकांचें समाधान झालें नाहीं. " जवळ जवळ बरोबरच " या शब्दांचा अर्थ काय अशी लोक शंका घेऊं लागले. गिर्यारोहकांना या शब्दाचा अर्थ समजूं शकेल. एकाच दोरखंडाला धरून चढणारे गिर्यारोहक ' एकमेकांच्या जवळ जवळ बरोबर 'च चढत असतात ही साधी गोष्ट लोकांना कां समजूं शकत नाहीं याचें आश्चर्य वाटतें. मी नेपाळी कीं हिंदी याबद्दल जी चर्चा चालू होती तीहि ऐकून मला खेद झाला. गिर्यारोहकाचीं राजकीय मतें कोणतीं व राष्ट्रीयत्व कोणतें हा प्रश्न येतो कोठें तें मला समजत नाहीं. मी नेपाळच्या कुशींत जन्मलों आणि भारताच्या मांडीवर वाढलों म्हणूने मी नेपाळ व भारत या दोन्ही मातांचा पुत्र आहें.

एव्हरेस्टवरून आल्यावर ज्यांचा राजकारणाशीं संबंध नाहीं असें कांहीं मजेदार प्रश्न मला विचारण्यांत आले. " तुम्हीं तेथें भगवान् बुद्धाला पाहिलें काय ? " असें कांहींनीं विचारलें तर कांहींनीं मला तेथें शिवशंकर कैलासपतीचें दर्शन झालें काय ? असा प्रश्न केला. कांहीं सनातनी मंडळींनीं मात्र चोमोलुंगमावर कांहीं तरी दिव्यशक्तीचा साक्षात्कार झाला असें मीं खोटेंच सांगावें म्हणून सुचविलें. परंतु चोमोलुंगमावर मला कोणत्याहि अलौकिक व अमानुष शक्तीचें किंवा परमेश्वराचें दर्शन झालें नाहीं. मात्र त्या परम पवित्र आणि गगनस्पर्शी ठिकाणीं गेल्यावर परमेश्वराच्या निकट सान्निध्यांत आपण असल्याची जाणीव मला होत होती. ही अनुभूति विलक्षण होती. याशिवाय मला आणखी काय हवें होतें ! त्याबद्दल मीं ईश्वराचे अंतःकरणपूर्वक आभार मानले.

काटमांडूंत एक आठवडा आमचा मुक्काम होता. रोज कोठें ना कोठें तरी आमचा सत्कार होत असे. एक दिवस तेथील ब्रिटिश वकिलातीनें आमचा सत्कारसमारंभ योजिला. मीं मात्र त्या समारंभास जाण्याचें नाकारलें. कारण त्या ब्रिटिश वकिलातींत मला पूर्वी एकदां वाईट रीतीनें वागविण्यांत आलें होतें. १९५२ सालीं स्विस तुकडीबरोबर मी एव्हरेस्टवर गेलों होतों त्या वेळीं काटमांडूंत उतरलों होतों. एक दिवस कांहीं अडचणींमुळें मला रात्रीं झोपण्यास कोठें जागा मिळेना म्हणून मी ब्रिटिश

वकिलातींत निवाऱ्यासाठीं गेलों. परंतु वकिलातीच्या सेक्रेटरींनीं मला निवाऱ्यासाठीं जागा देण्याचें नाकारलें होतें.

राजे त्रिभुवन यांच्या खाजगी विमानानें मी व माझें कुटुंब कलकत्त्यास पोचलों. बंगाल सरकारचे पाहुणे म्हणून आम्ही तेथें होतों. माझ्याबरोबरचे माझे इतर सहकारी निरनिराळ्या मार्गानें हिंदुस्थानांत गेले होते. कलकत्त्यांत सत्कार-समारंभामागून समारंभ होत होते. नंतर मी दिल्लीला गेलों. तेथील विमानतळावर प्रचंड जनसमुदाय स्वागतासाठीं आला होता. एवढा प्रचंड जमाव पूर्वीं कधीं माझ्यासाठीं जमला नव्हता.

त्या दिवशीं सायंकाळीं पंतप्रधान नेहरूंनीं माझ्या सत्काराचा समारंभ योजिला. माझ्या जीवनांतील तो एक महान् आणि सुखद क्षण होता. एव्हरेस्टवर पोचावयाच्या आदल्या दिवशीं रात्रीं तंबूंत आंथरुणावर पडलों असतांनासुद्धां मीं या क्षणाचें कल्पनाचित्र मनासमोर चितारलें होतें. पंडितजी मला माझ्या वडिलांइतके प्रथमपासून प्रिय व आदरणीय वाटत असत. मोठे सहृदय आणि कृपाळू असें त्यांचें व्यक्तित्व मला वाटे. सत्कार-समारंभानंतर त्यांनीं मला आपल्या कचेरींत नेलें. एव्हरेस्टवर कोण आधीं पोचलें यांतून जे गैरसमज निर्माण झाले आहेत ते दूर होण्यास मी लंडनला गेलों तर साहाय्य होईल म्हणून मीं जावें असा त्यांनीं मला आग्रहपूर्वक सल्ला दिला. कर्नल हंटनें मला लंडनला घेऊन जाण्याचें ठरविलें होतें. पण आंग लहामू व मुलींशिवाय लंडनला जाणें मला पसंत नव्हतें, आणि कर्नल हंटला सर्वांचा खर्च करावयास सांगणें योग्य नव्हतें. परंतु पंडितजींनीं माझी ही काळजी दूर केली. त्यांनीं माझी पत्नी व मुलींना माझ्याबरोबर लंडनला पोचतें करण्याचें आश्वासन दिलें. एव्हढेंच नव्हे तर आपल्या घरीं नेऊन त्यांनीं मला आपले अनेक कपडे दिले. कारण मजजवळ चांगले कपडे नव्हते. त्यांनीं आपली गांधी टोपी मात्र दिली नाहीं. कारण ती एका राजकीय विचारांचें चिन्ह होतें; आणि मी राजकारणापासून दूर राहावें या माझ्या मताशीं पंडितजी पूर्णपणें सहमत होते.

दिल्लीहून विमानानें मी, आंग लहामू आणि माझ्या मुली असे सर्वजण लंडनच्या प्रवासास निघालों. आमच्या तुकडींतील क. हंट व इतर बहुतेक सर्व ब्रिटिश गिर्यारोहकहि माझ्याबरोबर होते. कराचीला प्रथम आमचें विमान

थांबलें. विमानतळावर स्वागतासाठीं मोठा जनसमुदाय जमला होता. एक तास तेथें थांबून आम्ही पुढें निघालों. बगदाद, काहिरा आणि नंतर रोम येथें आमचें विमान थांबलें. भारत व पाकिस्तानपलीकडील विशाल जग मी प्रथमच पाहात होतों.

रोमच्या विमानतळावर भारतीय व ब्रिटिश वकिलातीतर्फे आमचें स्वागत झालें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं पुन्हा प्रवासास प्रारंभ केला. त्या दिवशींच्या प्रातःदैनिकांत मीं युनायटेड प्रेसला सांगितलेला आमच्या एव्हरेस्ट विजयाचा वृत्तान्त आला होता. तो वाचून हंट जरा नाराज झाला होता. कारण त्या वृत्तान्तांत ब्रिटिश गिर्यारोहक व शेरपा यांच्यांत एव्हरेस्ट प्रवासांत कांहीं वेळां जो वाद व कटकटी झाल्या होत्या त्यासंबंधींचा उल्लेख होता. क. हंट मजजवळ आला आणि त्यानें मला त्याविषयीं विचारलें. "तेनझिंग चांगला गिर्यारोहकहि नाहीं" असे तुम्हीं जे उद्गार काढले होते ते माझ्या मनाला फार लागले होते असें मीं त्याला सांगितलें. आपणांस फारच कठीण अडचणींना तोंड द्यावयाचें होतें वगैरे हंटनें खुलासा केला. आम्ही एकमेकांशीं खूप बोललों आणि त्यामुळें आमचीं मनें हलकीं झालीं. एव्हरेस्टवरील प्रवासांत शेरपा व ब्रिटिशांत कांहीं संघर्ष निर्माण झाला होता हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. परंतु मला त्यांचा राजकीय उद्देशासाठीं उपयोग करून घ्यावयाचा नव्हता. तथापि वस्तुस्थिति लपवून ठेवण्याचीहि माझी इच्छा नव्हती.

पुढें झूरिचला माझा परम मित्र व सहप्रवासी लॅंबर्ट भेटला. आम्हां दोघांना या भेटीनें अतिशय आनंद झाला. लंडनच्या विमानतळावर आमचें विमान आलें. हातांत ब्रिटिशांचें युनियन जॅक घेऊन कर्नल हंट सर्वांत प्रथम खालीं उतरला. याबद्दल मला त्यानें आधीं विचारलें होतें. मीं त्याला मान्यता दिली होती. नंतर आम्ही इतर सर्वजण खालीं उतरलों आणि स्वागतासाठीं जमलेल्या विशाल जनसमुदायांत मिसळलों.

सोळा दिवस लंडनमध्यें आमचा मुक्काम होता. भेटीगांठी, वार्ताहरांना मुलाखती देणें, छायाचित्रांसाठीं उभे राहणें आणि लंडनमध्यें भटकणें यांत आणि स्वागतसमारंभांत हे सर्व दिवस कसे निघून गेले तें समजलें नाहीं. ब्रिटिशांनीं मला अतिशय प्रेमानें वागविलें. आपल्या देशांतील गिर्या-

रोहकांशीं जेवढ्या आपुलकीनें व कौतुकानें ते वागले तेवढीच आपुलकी व कौतुक त्यांनीं माझ्या बाबतींतहि दाखविलें. कित्येक वस्तु भेटीदाखल दिल्या. कर्नल हंटनें आणि मेजर विलीनें पाहुणचारासाठीं आपल्या घरीं बोलाविलें.

राणी एलिझाबेथच्या बकिंगहॅम राजवाड्यावर आमचा झालेला सत्कार अविस्मरणीय होता. राणीनें आमच्या एव्हरेस्ट विजयाबद्दल कुतूहलानें अनेक प्रश्न विचारले. अनेक पदकें व देणग्या दिल्या. अल्पोपाहाराचा कार्यक्रमहि झाला. त्या वेळीं थंड लिंबू-सरबत देण्यांत आलें होतें. एव्हरेस्टची आठवण क्षणभर त्या वेळीं झाली. कारण असेंच सरबत आम्ही तेथें पीत असूं !

लंडन सोडतांना विमानतळावर हंट पतिपत्नी, विली पतिपत्नी आणि इतर अनेक ब्रिटिश आले. त्यांनीं ज्या प्रेमानें आम्हांस निरोप दिला तो प्रसंग कोणीं पाहिला असता तर ब्रिटिश व आमच्यांत किती सौहार्द होतें याची प्रचीति त्याला आली असती.

परत येतांना वाटेंत दोन आठवडे मीं स्वित्झर्लंडमध्यें काढले. माझे अनेक स्विस गिर्यारोहक सहकारी व मित्र भेटले. वेळांत वेळ काढून आल्प्स पर्वतावर चढण्याची हौसहि मीं पुरी केली. त्या पर्वतांतील दऱ्या-खोऱ्या मीं पाहिल्या तेव्हां मला माझ्या मातृभूमीची—सोलोखुंबूची आठवण झाली. मला स्विस लोकांचें फार कौतुक वाटलें. वृद्ध व युवक, स्त्री व पुरुष एवढेंच नव्हे तर लहान लहान मुलें यांनासुद्धां मोठ्या हौसेनें आणि उत्साहानें आल्प्समध्यें गिर्यारोहण करण्याचा छंद आहे.

फ्रान्समध्यें एक दिवस थांबून आम्ही परत भारतास जावयास निघालों. मी आतां दार्जिलिंगला माझ्या घरीं जाणार होतों. घर सोडून पांच महिने लोटले होते. एव्हरेस्ट पाहिलें, जिंकलें आणि परत आलों. हजारों लोकांनीं ‘ तेनझिंग झिंदाबाद ’ म्हणून स्वागत केलें. अनेक देशांचे पंतप्रधान आणि राजेराण्यांनीं गौरविलें. देशविदेश पाहून आलों.

घरीं परत जातांना मनांत विचार आला, “ ‘ तेनझिंग ’ बदलला तर नाहीं ? ” लगेच आंतून या प्रश्नाला उत्तरहि मिळालें, “ नाहीं, बाहेर कांहीं बदल झाला असला तरी अंतर्यामांतील तेनझिंग अजून पूर्वींचाच आहे. ”

* *

अनु. क्र. २४३४३ दि. : २० : क्रमांक ४५८ नों. दि.

# नवीन जीवनक्रम

आणि तीन आठवड्यांच्या परदेशपर्यटनानंतर भारतास परत आलों.

दिल्लीला पंडित नेहरू आणि राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांची पुन्हा भेट घेतली. भावी जीवनासंबंधीं त्यांनीं मला बहुमोल सल्ला दिला.

कित्येक महिन्यांच्या व मैलांच्या प्रवासानंतर अखेर माझ्या घरीं— दार्जिलिंगला पोचलों. सत्कार, भेटीगांठी, मुलाखती यांचें सत्र पुन्हा सुरू झालें.

पण आतां भविष्य कालाविषयींचे विचार मनांत गर्दी करूं लागले. पुढें काय करावयाचें ? जगायचें कसें ? या प्रश्नांचीं उत्तरें मी शोधूं लागलों.

मी एव्हरेस्टहून परत येत असतांना माझा दार्जिलिंगमधील स्नेही रवि मित्र यानें बंगालचे मुख्य मंत्रि डॉ. बी. सी. रॉय यांच्याशीं पत्रव्यवहार करून माझ्यासाठीं एक योजना आंखून ठेविली होती. मी हिंदुस्थानांत परत आल्यावर डॉ. रॉयना भेटलों आणि ती योजना पक्की केली. गिर्यारोहण शिक्षणाची एक संस्था काढण्याची ती योजना होती. ‘ हिंदुस्थान इन्स्टिटयूट ऑफ माऊंटनीअरिंग ’ असें या संस्थेचें नांव ठेवावें आणि तिची मुख्य कचेरी दार्जिलिंगला असावी असें ठरलें. मी या संस्थेचा प्रमुख शिक्षक आणि श्री. एन्. डी. जायल यांनीं सुपरिंटेंडेंट म्हणून काम करावें असें ठरलें. मला त्याबद्दल वेतन मिळणार होतें. पुढील वर्षीं या संस्थेची रीतसर सुरवात करावयाचें ठरलें. त्याच्या पूर्वतयारीस मी लागलों.

दार्जिलिंग येथें गांवाबाहेर मीं एक नवीन घर खरेदी केलें. तेथें मी व माझें कुटुंब आतां राहूं लागलों. भेटीगांठी आणि मुलाखतींचा तडाखा अद्याप चालू होता. सतत माणसें, माणसें, माणसें !-कधीं कधीं जीव अगदीं उबून जात असे. रस्त्यांतून दिवसाउजाडीं फिरायला जायचीसुद्धां सोय उरली नाहीं. कारण झुंडीच्या झुंडी मागें लागत. माझ्या घरीं मला भेटायला कोणीं कधीं यावें याला धरबंध उरला नाहीं. एखाद्या प्राणिसंग्रहालयांतील प्राण्यासारखी माझी अवस्था झाली.

युनायटेड प्रेस संस्थेला मीं एव्हरेस्ट विजयाची कथा सांगितल्याबद्दल मला चांगली रक्कम मिळाली. भारतांतील निरनिराळ्या शहरांतून आणि संस्थांकडून मला थैल्या मिळाल्या. त्यामुळें आतां आमचें दैन्य संपलें. नवीन घरांत फर्निचर वगैरे आणून तें सजविलें. मुलींना नेपाळी शाळेंतून काढून कॉन्व्हेंटमध्यें घातलें. कांहीं लोक मात्र माझ्या राहणींत झालेल्या या परिवर्तनामुळें माझी असूया करूं लागले.

देशांतून आणि परदेशांतून भेटीचीं अनेक निमंत्रणें मला आलीं. अमेरिकेचें आमंत्रण त्यांत होतें. मीं तें साभार नाकारलें. कारण घरची कांहीं अडचण होती आणि हिमालयन इन्स्टिटयूटच्या पूर्वतयारीचेंहि काम मला येथें राहून करावयाचें होतें. परंतु यावरून मोठें वादळ झालें. अमेरिकेनें पाकिस्तानशीं लष्करी साहित्य पुरविण्याचा नुकताच करार केला होता. भारतानें त्यास विरोध दर्शविला होता. या कारणास्तव मी अमेरिकेस जाऊ नये असें माझ्यावर दडपण आणण्यांत आलें अशी अफवा उठविण्यांत आली. वस्तुस्थिति तशी नव्हती.

१९५४ च्या २९ मे रोजीं दार्जिलिंग येथें 'एव्हरेस्टवरील विजय' हा चलत् चित्रपट दाखविण्यांत आला. त्या वेळचा प्रसंग सांगण्यासारखा आहे. त्या दिवशीं एव्हरेस्ट विजयाचा पहिला वाढदिवस होता. मोठ्या थाटानें तो साजरा करण्यांत येणार होता. इतक्यांत त्याच सुमारास न्यूझीलंडच्या गिर्यारोहकांची एक तुकडी घेऊन मकालू पर्वतावर गेलेला माझा एव्हरेस्टवरील सह — विजेता हिलरी एकाएकीं पर्वतावर आजारी पडल्याची बातमी आली. मी बेचैन झालों. ज्या विजयाचा हिलरी वाटेकरी आहे त्या विजयाचा वाढदिवस तो आजारी असतांना साजरा करणें मला बरें वाटलें नाहीं. मीं थिएटरमध्यें चित्रपट सुरू होण्यापूर्वीं श्रोत्यांना उद्देशून भाषण केलें आणि सांगितलें, "हा दिवस समारंभ करावयाचा नाहीं. हिलरी आजारी आहे. त्याच्यासाठीं आपण प्रार्थना करूं या. एव्हरेस्टवरील विजयांत तो व माझे इतर सर्व साथीदार सहभागी आहेत." सुदैवानें हिलरीच्या तब्येतींत सुधारणा होत असल्याचें वृत्त मागाहून कळलें.

१९५४ च्या उन्हाळ्यांत मी व मेजर जायल कांहीं महिने स्वित्झर्लंडमध्यें जाऊन राहिलों होतों. गिर्यारोहणकलेचें शिक्षण कसें द्यावयाचें याचा

आणि त्या कलेंतील अद्यावत् पद्धतींचा आम्हीं तेथें अभ्यास केला. आणखी सहा शेरपांनाहि तेथें शिक्षणासाठीं नेलें होतें. आम्ही परत आलों. नोव्हेंबर १९५४ मध्यें पं. नेहरूंच्या हस्तें हिमालयन इन्स्टिटयूटची स्थापना झाली.

वर्षअखेर संस्थेच्या कामांतून थोडी सवड काढून मी माझ्या कुटुंबियांना घेऊन माझ्या मायभूमीस—सोलोखुंबूस गेलों होतों. तेथें माझी चौऱ्याऐंशी वर्षांची आई होती. आपल्या आजीला पेम पेम व निमानें कधीं पाहिलें नव्हतें. मलाहि माय आणि मायभूमीची ओढ लागली होती म्हणून गेलों. माझ्या भाईबंदांनीं—साऱ्या शेरपांनीं मोठ्या प्रेमभरानें माझें स्वागत केलें. जेवणखाण, गायननृत्य यांनीं वातावरण भारून गेलें.

या वेळीं सोलोखुंबूंत आयुष्यामध्यें प्रथमच येतीच्या म्हणजे हिममानवाच्या शरीराचे अवशेष दोनदां पाहावयास मिळाले. ते अवशेष त्याच्या डोक्याच्या कवट्या होत्या. त्या आकारानें टोकदार होत्या. केसाचे झुपके तसेच कवटीस चिकटलेले अद्याप होते. एक कवटी दिसायला काळीकुट्ट, ओबडधोबड आणि डुकराच्या कवटीसारखी होती. दुसरी कवटी वयानें तरुण असलेल्या येतीची असावी. कारण ती वजनानें हलकी वाटत होती.

माझी आत्मकथा आतां संपली. माझ्या भविष्यकाळाविषयीं मी कांहींच सांगूं शकत नाहीं. हिमालयन इन्स्टिटयूटमध्यें मी काम करीत राहीन आणि तरुणांत पर्वताविषयींचें प्रेम निर्माण करण्यासाठीं व पर्वतारोहणाचें त्यांना शिक्षण देण्यासाठीं मी झटेन. माझ्या शेरपा बांधवांसाठीं माझा जेवढा उपयोग होईल तेवढा करून द्यावयाची माझी मनीषा आहे. मी अतिशय गरिबींतून आजच्या महान् स्थानावर पोचलों आहें. दारिद्र्याचें दुःख आणि अज्ञानाचे परिणाम मीं स्वतः अनुभविले आहेत. माझ्या बांधवांना शहाणे करून त्यांची सुधारणा करावी आणि अधिक सुखी व प्रगत जीवनाकडे त्यांना न्यावें असा प्रयत्न करण्याची माझी इच्छा आहे. मी जीवनांत खूप शिकलों आहें. आपण कितीहि कर्तृत्ववान् असलों तरी सतत समाधानी राहण्यास शिकल्याशिवाय आणि इतरांशीं बंधुभावानें वागल्याशिवाय चांगले गिर्यारोहक होऊं शकणार नाहीं असा माझा अनुभव आहे. जेवढें आपण देतों तेवढेंच आपणांस परत मिळतें हा माझ्या जीवनांतील एक धडा आहे. आपण मोठें व्हावें आणि इतरांनाहि आपणांबरोबर मोठें करावें ही शिकवण

आपण शिकली पाहिजे. त्या थोर चोमोलुंगमाचा हाच संदेश आहे.

एव्हरेस्टवर पुन्हा जाणें शक्य आहे का असा एक प्रश्न नेहमीं विचारला जातो. तें निश्चित शक्य आहे, एवढेंच मी सांगू शकतों. मी मात्र पुन्हा एव्हरेस्टवर जाणार नाहीं. कारण १९५३ सालीं एक तर एव्हरेस्टवर पोचेन, नाहीं तर त्या प्रयत्नांत मृत्यु पत्करीन अशी जिद्द माझ्या ठिकाणीं होती. आतां एव्हरेस्टवर एकदां जाऊन पोचल्यानें तशी ईर्षा राहिलेली नाहीं. शिवाय आतां मीं चाळिशी गांठली आहे. हें वय कांहीं फार नाहीं; परंतु अगदीं कांहीं तरुणहि नाहीं.

खूप प्रवास करावयाची मात्र माझी इच्छा आहे. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर अमेरिकेला जावयाची मनीषा आहे. इंग्लंड व स्वित्झर्लंडलाहि पुन्हा जावेसें वाटत आहे.

पुढील आयुष्य स्वाभिमानानें जगावें आणि एव्हरेस्टच्या प्रतिष्ठेला काळिमा लागेल असें आपल्या हातून कांहींहि होऊं नये असें मला फार वाटतें. एव्हरेस्ट हा कांहीं एकाच देशाचा माथा नाहीं; साऱ्या जगाचें तें मस्तक आहे. तें सर्वांचें आहे. पूर्व व पश्चिमेकडील देशांतील गिर्यारोहकांचा त्यावरील विजयाचा वाटा आहे. मी कोणा एका धर्माचा किंवा वंशाचा स्वतःला समजत नाहीं. मीं सर्वांचा व्हावें अशी माझी इच्छा आहे. आयुष्यभर हृदयांत वागविलेली आकांक्षा पुरी झाली आहे. परमेश्वरानें केलेल्या कृपेला मीं पात्र व्हावें एवढीच माझी आतां इच्छा आहे. मला माझे मित्र विचारतात, "आतां तुला एव्हरेस्टविषयीं काय वाटतें?" मला त्याचें उत्तर देतां येत नाहीं. त्याचें खालील उत्तर माझ्या हृदयांत सांठविलेलें आहे,

" थुजी चे, चोमोलुंगमा—
चोमोलुंगमा मी तुझा ऋणी आहे !"

★ ★ ★

REFBK-0009850

ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. ९८५०
30/7/58

[illegible]